बैठकीसाठी १६० प्रत

बैठकीसाठी

१६०

भारत सरकार

विधि व न्याय मंत्रालय

सत्यमेव जयते

# अंमली औषधिद्रव्ये व मनःप्रभावी पदार्थ अधिनियम, १९८५

**(सन १९८५ चा अधिनियम क्रमांक ६१)**

[ ६ ऑगस्ट, २००६ रोजी यथाविद्यमान ]

# The Narcotic Drugs and Psychotropic Substances Act, 1985

**(Act No. 61 of 1985)**

[ *As in force on the 6th August, 2006* ]

संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले

२००८

**[किंमत :** रुपये ८८.००]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक ६ ऑगस्ट, २००६ रोजी यथाविद्यमान असलेला दि नार्कोटिक ड्रग्ज अ‍ॅण्ड सायकोट्रोपिक सबस्टन्सेस अ‍ॅक्ट, १९८५ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र,** असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १५, अंक २, दिनांक ९ नोव्हेंबर २००६ यात पृष्ठ २८ ते ७७ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता.

हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधी) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक ९ नोव्हेंबर २००६.

**टी. के. विश्वनाथन्,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the Narcotic Drugs and Psychotropic Substances Act, 1985 as on the 6th August 2006 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary Part XII, Section 1, No. 2, Vol. 15, dated 9th November 2006, on pages 28 to 77.

This authoritative text was published under the authority of the President under section 2, clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Date 9th November 2006.

T. K. VISHWANATHAN,
Secretary to the Government of India.

# अंमली औषधिद्रव्ये व मन:प्रभावी पदार्थ अधिनियम, १९८५

## कलमांचा क्रम

कलमे

प्रकरण एक

**प्रारंभिक**

१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.
२. व्याख्या.
३. मन:प्रभावी पदार्थांच्या सूचीत भर घालण्याची किंवा त्यातून वगळण्याची शक्ती.

प्रकरण दोन

**प्राधिकरणे आणि अधिकारी**

४. अंमली औषधिद्रव्ये इत्यादींचा गैरवापर आणि त्यांचा निषिद्ध व्यापार यांस प्रतिबंध आणि प्रतिरोध करण्यासाठी केंद्र सरकारकडून उपाययोजना.
५. केंद्र सरकारचे अधिकारी.
६. अंमली औषधिद्रव्ये आणि मन:प्रभावी पदार्थ सल्लागार समिती.
७. राज्य सरकारचे अधिकारी.

प्रकरण ~~दोन—~~क

**औषधिद्रव्याच्या दुरुपयोगावरील नियंत्रणासाठी राष्ट्रीय निधी**

७क. औषधिद्रव्याच्या दुरुपयोगावरील नियंत्रणासाठी राष्ट्रीय निधी.
७ख. निधीमधून वित्तव्यवस्था करण्यात आलेल्या कार्यक्रमांचा वार्षिक अहवाल.

प्रकरण तीन

**प्रतिबंध, नियंत्रण आणि विनियमन**

८. विवक्षित क्रियांना प्रतिबंध.
८क. अपराधामधून प्राप्त झालेल्या मालमत्तेच्या संबंधातील विवक्षित कृतीस प्रतिबंध.
९. परवाना देण्याची, नियंत्रण ठेवण्याची आणि विनियमन करण्याची केंद्र सरकारची शक्ती.
९क. नियंत्रित पदार्थांचे नियंत्रण व विनियमन करण्याची शक्ती.
१०. परवाना देण्याची, नियंत्रण ठेवण्याची व विनियमन करण्याची केंद्र सरकारची शक्ती.
११. अंमली औषधिद्रव्ये व मन:प्रभावी पदार्थ, इत्यादी अटकावणीस किंवा जप्तीस पात्र असणार नाही.
१२. अंमली औषधिद्रव्ये व मन:प्रभावी पदार्थ यांच्या बाह्य व्यवहारांवर निर्बंध.
१३. स्वादकारके बनविताना कोका वनस्पती व कोका पाने यांचा वापर करण्यासंबंधातील विशेष तरतूद.
१४. कॅनाबिसच्या संबंधातील विशेष तरतूद.

प्रकरण चार

**अपराध आणि शास्ती**

१५. खसखशीच्या गवतासंबंधातील व्यतिक्रमणाबद्दल शिक्षा.
१६. कोका वनस्पती आणि कोका पाने यासंबंधातील व्यतिक्रमणाबद्दल शिक्षा.
१७. सिद्ध अफू संबंधातील व्यतिक्रमणाबद्दल शिक्षा.
१८. अफुचे झाड आणि अफू यांच्या संबंधातील व्यतिक्रमणाबद्दल शिक्षा.
१९. लागवडदाराकडून करण्यात आलेल्या अफूच्या अपहाराबद्दल शिक्षा.

२०. कॅनॉबिस वनस्पती आणि कॅनाबिस यांच्या संबंधातील शिक्षा.
२१. निर्मित औषधिद्रव्ये आणि सिद्ध पदार्थ यासंबंधातील व्यतिक्रमणाबद्दल शिक्षा.
२२. मन:प्रभावी पदार्थासंबंधातील व्यतिक्रमणाबद्दल शिक्षा.
२३. अंमली औषधिद्रव्ये आणि मन:प्रभावी पदार्थ यांची अवैधरीत्या भारतात आयात किंवा भारतातून निर्यात किंवा वाहनांतरण यासाठी शिक्षा.
२४. कलम १२ चे व्यतिक्रमण करून अंमली औषधिद्रव्ये व मन:प्रभावी पदार्थ यांच्या बाह्य व्यवहाराबद्दल शिक्षा.
२५. अपराध करण्याच्या कामी वास्तू इ. चा वापर करण्यास परवानगी देण्याबद्दल शिक्षा.
२५क. कलम ९क अन्वये देण्यात आलेल्या आदेशांच्या व्यतिक्रमणाबद्दल शिक्षा.
२६. अनुज्ञप्तिधारक किंवा त्याचा नोकर यांच्या विवक्षित कृतीबद्दल शिक्षा.
२७. अंमली औषधिद्रव्ये किंवा मन:प्रभावी पदार्थ यांचे सेवन केल्याबद्दल शिक्षा.
२७क. विधिनिषिद्ध क्रयविक्रयासाठी वित्तव्यवस्था करण्याबद्दल आणि अपराध्यांना आसरा देण्याबद्दल शिक्षा.
२८. अपराध करण्याच्या प्रयत्नांसाठी शिक्षा.
२९. अपप्रेरणा आणि दंडनीय कट यांसाठी शिक्षा.
३०. सिद्धता.
३१. पूर्वीच्या दोषसिद्धीनंतरच्या अपराधांसाठी वाढीव शिक्षा.
३१क. मृत्युदंड.
३२. ज्यासाठी कोणत्याही शिक्षेची तरतूद करण्यात आलेली नाही अशा अपराधांसाठी शिक्षा.
३२क. या अधिनियमान्वये देण्यात आलेली कोणतीही शिक्षा निलंबित केली जाणार नाही किंवा त्यात सूट मिळणार नाही किंवा ती सौम्य केली जाणार नाही.
३२ख. किमान शिक्षेपेक्षा अधिक शिक्षा लादताना विचारात घ्यावयाच्या बाबी.
३३. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३६० आणि अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९५८ लागू करणे.
३४. अपराध करण्यापासून अप्रवृत्त राहण्यासाठी प्रतिभूती.
३५. सदोष मानसिक अवस्था गृहित धरणे.
३६. विशेष न्यायालये घटित करणे.
३६क. विशेष न्यायालयांकडून संपरीक्षायोग्य अपराध.
३६ख. अपील व पुनरिक्षण.
३६ग. विशेष न्यायालयापुढील कार्यवाहींना संहिता लागू करणे.
३६घ. संक्रमणकालीन तरतूद.
३७. अपराध दाखलपात्र व बिनजामिनी असणे.
३८. कंपन्यांकडून अपराध.
३९. विवक्षित अपराध्यांना परिवीक्षेवर सोडण्याची न्यायालयाची शक्ती.
४०. विवक्षित अपराध्यांची नावे, व्यवसायाची ठिकाणे इ. प्रकाशित करण्याची न्यायालयाची शक्ती.

प्रकरण पाच

**कार्यपद्धती**

४१. अधिपत्र आणि प्राधिकारपत्र काढण्याची शक्ती.
४२. अधिपत्र किंवा प्राधिकारपत्र या विना प्रवेश करण्याचा, झडती घेण्याचा, ताब्यात घेण्याचा, अटक करण्याचा अधिकार.
४३. सार्वजनिक ठिकाणी सक्तीने ताब्यात घेण्याचा व अटक करण्याचा अधिकार.
४४. कोका वनस्पती, अफूचे झाड आणि कॅनाबिस वनस्पती यांच्याशी संबंधित अपराधांबाबत प्रवेश करण्याचा, झडती घेण्याचा, सक्तीने ताब्यात घेण्याचा आणि अटक करण्याचा अधिकार.
४५. जप्ती पत्र माल सक्तीने ताब्यात घेणे व्यवहार्य नसेल त्याबाबत कार्यपद्धती.
४६. बेकायदेशीर लागवडीबद्दल माहिती देण्याचे जमीनधारकाचे कर्तव्य.
४७. बेकायदेशीर लागवडीची माहिती पुरविण्याचे विवक्षित अधिकाऱ्यांचे कर्तव्य
४८. बेकायदेशीर लागवड केलेल्या पिकांवर टाच आणण्याचा अधिकार.
४९. वाहन थांबवण्याचा आणि झडती घेण्याचा अधिकार.

५०. व्यक्तींची झडती ज्यांनुसार घेता येईल त्या शर्ती.
५०क. नियंत्रित सुपूर्दगी करण्याची शक्ती.
५१. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या तरतुदी, अधिपत्रे, अटक करण्याला, झडत्या घेण्याला व सक्तीने ताबा घेण्याला लागू होणे.
५२. अटक केलेल्या व्यक्तींची व ताब्यात घेतलेल्या वस्तूंची व्यवस्था लावणे.
५२क. सक्तीने ताब्यात घेतलेल्या अंमली औषधिद्रव्यांची व मन:प्रभावी पदार्थांची विल्हेवाट.
५३. विवक्षित विभागांच्या अधिकाऱ्यांकडे पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्यांची शक्ती निहित करणे.
५३क. विवक्षित परिस्थितीत निवेदनाची सुसंबद्धता.
५४. विधिनिषिद्ध वस्तू जवळ बाळगण्याच्या परिणामी गृहितक.
५५. सक्तीने ताब्यात घेण्यात आलेल्या आणि सुपूर्द केलेल्या वस्तूंचा पोलिसाने प्रभार घेणे.
५६. अधिकाऱ्यांनी एकमेकांना सहाय्य करण्याचे दायित्व.
५७. अटक करणे किंवा सक्तीने ताब्यात घेणे याबद्दल अहवाल त्यावेळी देणे.
५८. तापदायक प्रवेश करणे, तपास करणे, सक्तीने ताब्यात घेणे किंवा अटक करणे याबद्दल शिक्षा.
५९. अधिकाऱ्याने कर्तव्यपालनात चूक करणे किंवा या अधिनियमाच्या तरतुदींच्या व्यतिक्रमणाकडे कानाडोळा करणे.
६०. निषिद्ध औषधिद्रव्ये, मन:प्रभावी पदार्थ, वनस्पती, वस्तू व वाहने जप्तीस पात्र असणे.
६१. निषिद्ध औषधिद्रव्ये किंवा पदार्थ लपविण्यासाठी वापरलेल्या मालाची जप्ती.
६२. निषिद्ध औषधिद्रव्ये किंवा पदार्थ यांच्या विक्रीच्या उत्पन्नाची जप्ती.
६३. जप्ती करण्याची कार्यपद्धती.
६४. खटल्यातून उन्मुक्ती देण्याची शक्ती.
६४क. स्वेच्छेने उपचार करून घेणाऱ्या व्यक्तींना खटल्यातून उन्मुक्ती.
६५. [ निरसित ]
६६. विवक्षित प्रकरणांमध्ये दस्तऐवजांसंबंधीचे गृहितक.
६७. माहिती, इ. मागविण्याची शक्ती.
६८. अपराध करण्यात आल्याबद्दलची माहिती.


प्रकरण पाच—क

**निषिद्ध क्रयविक्रयातून मिळवलेली किंवा त्यात वापरलेली संपत्ती सरकारजमा करणे**


६८क. प्रयुक्ती.
६८ख. व्याख्या.
६८ग. बेकायदेशीररीत्या संपादित केलेली संपत्ती धारण करण्यास प्रतिबंध.
६८घ. सक्षम प्राधिकारी.
६८ङ. बेकायदेशीररित्या संपादित केलेली संपत्ती ओळखणे.
६८च. बेकायदेशीरपणे संपादित करण्यात आलेली संपत्ती सक्तीने ताब्यात घेणे किंवा तिची गोठवणूक करणे.
६८छ. या प्रकरणान्वये ताब्यात घेतलेल्या किंवा सरकारजमा केलेल्या संपत्तीचे व्यवस्थापन.
६८ज. संपत्ती सरकारजमा करण्याची नोटीस.
६८झ. विवक्षित प्रकरणांमध्ये संपत्ती सरकारजमा करणे.
६८ञ. शाबितीचा भार.
६८ट. सरकारजमा करण्याऐवजी द्रव्यदंड.
६८ठ. विवक्षित न्यास संपत्तीच्या संबंधातील कार्यपद्धती.
६८ड. विवक्षित हस्तांतरणे रद्दबादल ठरणे.
६८ढ. अपिलीय न्यायाधिकरणाची घटना.
६८ण. अपिले.
६८त. वर्णनातील चुकांमुळे नोटीस किंवा आदेश विधिबाह्य न ठरणे.
६८थ. अधिकारितेस रोध.
६८द. सक्षम प्राधिकरण आणि अपिलीय न्यायाधिकरण यांना दिवाणी न्यायालयाच्या शक्ती असणे.
६८ध. सक्षम प्राधिकरणाला माहिती.

६८न. विवक्षित अधिकाऱ्यांनी प्रशासक, सक्षम प्राधिकरण आणि अपिलीय न्यायाधिकरण यांना सहाय्य करणे.
६८प. कब्जा घेण्याची शक्ती.
६८फ. चुकांचे परिशोधन.
६८ब. अन्य कायद्याखालील निष्कर्ष या प्रकरणाखालील कार्यवाहीसाठी निर्णायक असणार नाहीत.
६८भ. नोटिसा व आदेश यांची बजावणी.
६८म. या प्रकरणान्वये ज्या संपत्तीच्या संबंधात कार्यवाही करण्यात आली असेल ती संपादित करण्याबद्दल शिक्षा.
६८य. विवक्षित प्रकरणांमध्ये संपत्ती मुक्त करणे.

प्रकरण सहा

**संकीर्ण**

६९. सद्भावनापूर्वक केलेल्या कृतीस संरक्षण.
७०. नियम तयार करताना केंद्र सरकार व राज्य शासन यांनी आंतरराष्ट्रीय अभिसंधी लक्षात घेणे.
७१. व्यसनी व्यक्ती शोधून काढणे, त्यांच्यावर उपचार करणे, इ. साठी आणि अंमली औषधिद्रव्ये व मन:प्रभावी पदार्थ यांचा पुरवठा करण्यासाठी केंद्र स्थापन करण्याची शासनाची शक्ती.
७२. शासनाला देय असलेल्या रकमांची वसुली.
७३. अधिकारितेस रोध.
७४. संक्रमणकालीन तरतूद.
७४क. निदेश देण्याची केंद्र सरकारची शक्ती.
७५. प्रत्यायोजित करण्याची शक्ती.
७६. केंद्र सरकारची नियम करण्याची शक्ती.
७७. नियम व अधिसूचना संसदेपुढे मांडणे.
७८. नियम करण्याची राज्य शासनाची शक्ती.
७९. सीमाशुल्क अधिनियम, १९६२ याच्या तरतुदी लागू होणे.
८०. औषधिद्रव्ये व सौंदर्य प्रसाधने अधिनियम, १९४० याच्या तरतुदी लागू होण्यास रोध नसणे.
८१. राज्य व विशेष विधींची व्यावृत्ती.
८२. निरसन व व्यावृत्ती.
८३. अडचणी दूर करण्याची शक्ती.

**अनुसूची**

इंग्रजी—मराठी शब्दसूची.
मराठी—इंग्रजी शब्दसूची.

# अंमली औषधिद्रव्ये व मन:प्रभावी पदार्थ अधिनियम, १९८५

**(१९८५ चा अधिनियम क्रमांक ६१)**

(६ ऑगस्ट, २००६ रोजी यथाविद्यमान)

[१६ सप्टेंबर, १९८५]

**अंमली औषधिद्रव्यांसंबंधीचा कायदा एकत्रित व विशोधित करणे, अंमली औषधिद्रव्ये आणि मन:प्रभावी पदार्थ यासंबंधीच्या कार्यपद्धतींचे नियंत्रण व विनियमन करण्यासाठी कडक तरतूद करणे, [१] [अंमली औषधिद्रव्ये व मन:प्रभावी पदार्थ यांच्या निषिद्ध व्यापारातून प्राप्त केलेली किंवा त्यासाठी उपयोगात आणलेली संपत्ती सरकारजमा करण्यासाठी तरतूद करणे, अंमली औषधिद्रव्ये व मन:प्रभावी पदार्थ यासंबंधीच्या आंतरराष्ट्रीय अभिसंधीच्या तरतुदींची अंमलबजावणी करणे] आणि त्याच्याशी संबंधित बाबी यांसाठी अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या छत्तिसाव्या वर्षी संसदेद्वारे तो पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

प्रकरण एक

**प्रारंभिक**

**संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.**

१. (१) या अधिनियमास, अंमली औषधिद्रव्ये व मन:प्रभावी पदार्थ अधिनियम, १९८५ असे म्हणावे.

(२) त्याचा व्याप्ती संपूर्ण भारतभर आहे. [२][आणि तसेच तो,

(क) भारताच्या बाहेरील सर्व भारतीय नागरिकांना;

(ख) भारतात नोंदणी झालेल्या जहाजांवरील आणि विमानातील सर्व व्यक्तींना,

ते जेथे कोठे असतील तेथे लागू असेल.]

(३) केंद्र सरकार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास, तो अंमलात येईल आणि या अधिनियमाच्या निरनिराळ्या तरतुदींसाठी आणि निरनिराळ्या राज्यांसाठी निरनिराळे दिनांक नियत करता येतील आणि या अधिनियमाच्या अशा कोणत्याही तरतुदीतील प्रारंभासंबंधीचा निर्देश हा, कोणत्याही राज्याच्या संदर्भात, ती तरतूद त्या राज्यात अंमलात येण्यासंबंधीचा निर्देश आहे, असा त्याचा अर्थ लावण्यात येईल.

**व्याख्या.**

२. या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,—

(एक) [३][ "व्यसनी" याचा अर्थ, कोणत्याही अंमली औषधिद्रव्यावर किंवा मन:प्रभावी पदार्थावर अवलंबून असलेली व्यक्ती, असा आहे ;]

(दोन) "मंडळ" याचा अर्थ, केंद्रीय महसूल मंडळे अधिनियम, १९६३ (१९६३ चा ५४) अन्वये घटित केलेले केंद्रीय उत्पादन शुल्क व सीमाशुल्क मंडळ, असा आहे ;

(तीन) "कॅनाबिस (भांग)" याचा अर्थ,—

(क) *चरस,* म्हणजे कॅनाबिस वनस्पतीपासून मिळविलेली, वेगळी काढलेली राळ,——मग ती कच्ची किंवा शुद्ध केलेली अशी कोणत्याही स्वरूपातील असो—आणि त्यामध्ये हाशिश तेल किंवा द्रवरूप हाशिश म्हणून ओळखले जाणारे तीव्र सिद्धपदार्थ व राळ यांचाही समावेश होतो;

(ख) *गांजा,* म्हणजे कॅनाबिस वनस्पतीचे, फुले किंवा फळे आलेले बोंड (बोंडावर बी आणि पाने नसतील तर ती वगळून) मग ते कोणत्याही नावाने ओळखले जात असो किंवा निर्दिष्ट केलेले असो ; आणि

(ग) कॅनाबिसच्या वरीलपैकी कोणत्याही रूपाचे, कोणत्याही उदासीन पदार्थासह किंवा पदार्थाविना बनविलेले कोणतेही मिश्रण किंवा त्यापासून बनविलेले कोणतेही पेय,

असा आहे.

(चार) "कॅनाबिस वनस्पती" याचा अर्थ, कॅनाबिस प्रजातीची कोणतीही वनस्पती, असा आहे;

(पाच) "कोकाजन्य पदार्थ" याचा अर्थ,----

(क) कोकेनच्या निर्मितीसाठी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष वापरता येण्याजोगे अशुद्ध कोकेन म्हणजेच, कोका पानाचा कोणताही अर्क

---

[१] १९८९ चा अधिनियम २, कलम २ द्वारे समाविष्ट करण्यात आला.

[२] २००१ चा अधिनियम ९, कलम २ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ३(क) द्वारे समाविष्ट करण्यात आले.

(ख्) इगोनाईन आणि ज्यापासून ते मिळवता येईल असे इगोनाईनचे सर्व साधित पदार्थ ;

(ग्) कोकेन म्हणजे बेंझॉईल----इगोनाईनचे मेथिलएस्टर आणि त्याचे क्षार ; आणि

(घ्) ०.१ टक्क्यापेक्षा अधिक कोकेन असलेले सर्व सिद्ध पदार्थ,

असा आहे.

(सहा) " कोका पान " याचा अर्थ,----

(क्) ज्यामधून सर्व इगोनाईन, कोकेन आणि इतर कोणतीही इगोनाईन अल्कलॉईड्स काढून टाकण्यात आली असतील अशा पानाव्यतिरिक्त कोका वनस्पतीचे पान ;

(ख्) कोणत्याही उदासीन पदार्थासह किंवा पदार्थाविना त्याचे कोणतेही मिश्रण, असा आहे :

परंतु, ०.१ टक्क्यापेक्षा अधिक कोकेन नसलेल्या कोणत्याही सिद्ध पदार्थाचा त्यात समावेश होत नाही ;

(सात) " कोका वनस्पती " याचा अर्थ, अंमली एरिथ्रोझायलॉन प्रजातीच्या कोणत्याही उपजातीची वनस्पती, असा आहे ;

[१] [(सात) (क्) अंमली औषधिद्रव्ये किंवा मन:प्रभावी पदार्थ यांच्या संबंधात " वाणिज्यिक प्रमाण " याचा अर्थ सरकारकडून **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या प्रमाणापेक्षा अधिक असलेले प्रमाण, असा आहे.

[२][(सात) (ख्)] " नियंत्रित माल सुपूर्दगी " याचा अर्थ, अंमली औषधिद्रव्ये, मन:प्रभावी पदार्थ, नियंत्रित पदार्थ किंवा त्याच्या जागी बदली म्हणून पाठविलेला असा बेकायदेशीर किंवा संशयित माल, या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधात गोवलेल्या व्यक्तीची ओळख पटविण्याच्या दृष्टीने, कलम ५०क अन्वये योग्य रीतीने प्राधिकृत केलेल्या किंवा याबाबत शक्ती प्रदान केलेल्या अधिकाऱ्याला विदित करून आणि त्याच्या पर्यवेक्षणाखाली भारताच्या राज्यक्षेत्रातून बाहेर किंवा राज्यक्षेत्रामध्ये किंवा राज्यक्षेत्रामधून घेऊन जाण्यास मुभा देण्याचे तंत्र, असा आहे.

(सात) (ग्) " तत्सम कायदा " याचा अर्थ, या अधिनियमाच्या तरतुदींशी तत्सम असलेला कोणताही कायदा, असा आहे; ]

[३] [ (सात) (घ्) ] " नियंत्रित पदार्थ " याचा अर्थ, अंमली औषधिद्रव्ये किंवा मन:प्रभावी पदार्थ यांच्या उत्पादनातील किंवा निर्मितीतील एखाद्या पदार्थाच्या संभाव्य वापरासंबंधातील उपलब्ध माहिती किंवा कोणत्याही आंतरराष्ट्रीय अभिसंधीचे उपबंध लक्षात घेऊन, केंद्र सरकार **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियंत्रित पदार्थ म्हणून घोषित करील असा कोणताही पदार्थ, असा आहे ;]

(आठ) " वाहन " याचा अर्थ, कोणत्याही वर्णनाचे वाहन, असा आहे आणि त्यामध्ये कोणतेही विमान, वाहन किंवा जलयान यांचा समावेश होतो ;

[४] [(क्) " अंमली औषधिद्रव्ये आणि मन:प्रभावी पदार्थ, यांच्या संबंधातील निषिद्ध व्यापार " याचा अर्थ,----

या अधिनियमाअन्वये किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमाअन्वये किंवा आदेशाअन्वये किंवा देण्यात आलेल्या कोणत्याही लायसनाच्या कोणत्याही शर्तीअन्वये किंवा देण्यात आलेल्या प्राधिकारपत्राच्या अटींअन्वये अनुज्ञेय असतील त्ती कामे वगळून पुढील कामे----

(एक) कोणत्याही कोका वनस्पतीची लागवड करणे किंवा कोका वनस्पतीचा कोणताही भाग गोळा करणे ;

(दोन) अफूच्या झाडाची किंवा कोणत्याही कॅनाबिस वनस्पतीची लागवड करणे ;

(तीन) अंमली औषधिद्रव्ये किंवा मन:प्रभावी पदार्थ यांचे उत्पादन, निर्मिती, ती जवळ बाळगणे, त्यांची विक्री, खरेदी, परिवहन, वखार साठवण, लपवणूक, उपयोग किंवा सेवन, आंतरराज्यीय आयात, आंतरराज्यीय निर्यात, भारतात आयात करणे, भारतातून निर्यात किंवा वाहनांतरण यामध्ये गुंतलेले असणे ;

(चार) अंमली औषधिद्रव्ये व मन:प्रभावी पदार्थ यांच्या संबंधातील उपखंड (एक) ते (तीन) मध्ये निर्देशिलेल्या कामांव्यतिरिक्त अन्य देवघेवीची कामे करणे ;

---

[१] २००१ चा अधिनियम ९, कलम ३ (ख्) द्वारे पोट-कलम (सात) (क्) ते सात (ग्) दाखल करण्यात आले.

[२] १९८९ चा अधिनियम २, कलम ३ (क) द्वारे पोट-कलम (सात) (क्) दाखल करण्यात आले.

[३] २००१ चा अधिनियम ९, कलम ३ (ख) अन्वये " (सात) (क) " ला " (सात) (घ) " असा नव्याने क्रमांक देण्यात आला.

[४] १९८९ चा अधिनियम २, कलम ३ (ख्) द्वारे पोट-कलम (आठ) (क्) दाखल करण्यात आले.

(पाच) उपखंड (एक) ते (चार) मध्ये निर्देशिलेली कोणतीही कामे पार पाडण्यासाठी कोणत्याही वास्तूचा वापर करणे किंवा ती भाड्याने देणे, असा आहे आणि त्यामध्ये----

(१) पूर्वोक्तांपैकी कोणत्याही कामासाठी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष, वित्तव्यवस्था करणे ;

(२) पूर्वोक्त कामांपैकी कोणतेही काम करण्यासाठी, त्याच्या पुरस्सरणार्थ किंवा त्याला पाठिंबा म्हणून, अपप्रेरणा देणे किंवा कट करणे ; आणि

(३) पूर्वोक्तांपैकी कोणत्याही कामात गुंतलेल्या व्यक्तींना आसरा देणे ;

यांचा समावेश होतो;]

(नऊ) " आंतरराष्ट्रीय अभिसंधी " याचा अर्थ,----

(क) मार्च, १९६१ मध्ये न्यूयॉर्क येथे झालेल्या संयुक्त राष्ट्र परिषदेने अंगीकारलेला अंमली औषधिद्रव्यांवरील एकेरी अभिसंधी, १९६१ ;

(ख) मार्च, १९७२ मध्ये जिनिवा येथे झालेल्या संयुक्त राष्ट्र परिषदेने अंगीकारलेला पोट-कलम (क) मध्ये उल्लेखिलेल्या अभिसंधीचे विशोधन करणारा प्रोटोकॉल ;

(ग) फेब्रुवारी १९७१ मध्ये व्हिएन्ना येथे झालेल्या संयुक्त राष्ट्र परिषदेने अंगीकारलेला मनःप्रभावी पदार्थावरील अभिसंधी, १९७१ ; आणि

(घ) या अधिनियमाच्या प्रारंभानंतर भारताकडून ज्याचे अनुसमर्थन करण्यात येईल किंवा ज्याला रुकार देण्यात येईल असा, अंमली औषधिद्रव्ये किंवा मनःप्रभावी पदार्थ यांच्या संबंधातील आंतरराष्ट्रीय अधिसंधीचे विशोधन करणारा अन्य कोणताही आंतरराष्ट्रीय अभिसंधी किंवा प्रोटोकॉल किंवा अन्य संलेख,

असा आहे ;

(दहा) अंमली औषधिद्रव्ये किंवा मनःप्रभावी पदार्थ यांच्या संबंधातील " निर्मिती " यामध्ये,----

(१) ज्याद्वारे अशी औषधिद्रव्ये किंवा पदार्थ मिळविता येतील अशा, उत्पादनाव्यतिरिक्तच्या सर्व प्रक्रिया ;

(२) अशी औषधिद्रव्ये किंवा पदार्थ परिष्कृत करणे ;

(३) अशी औषधिद्रव्ये किंवा पदार्थ यांचे रूपांतर करणे ; आणि

(४) अशी औषधिद्रव्ये किंवा पदार्थ घेऊन किंवा ते समाविष्ट करून सिद्ध पदार्थ (औषध निर्माण शाळेतील औषधपत्रानुसार बनवतात त्याहून अन्य प्रकारे) बनवणे,

यांचा समावेश होतो ;

(अकरा) " निर्मित औषधिद्रव्य " याचा अर्थ,----

(क) सर्व कोकासाधित पदार्थ, औषधी कॅनाबिस, अफूसाधित पदार्थ आणि खसखशीच्या गवताचे सत्त्व (पॉपी स्ट्रॉ कॉन्सेन्ट्रेट) ;

(ख) केंद्र सरकार, जो अन्य कोणत्याही अंमली पदार्थ किंवा सिद्ध पदार्थ, त्याच्या स्वरूपाची, किंवा कोणत्याही आंतरराष्ट्रीय अभिसंधीअन्वये कोणताही निर्णय घेतला असल्यास त्याबद्दलची उपलब्ध माहिती लक्षात घेऊन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे निर्मित औषधिद्रव्ये म्हणून घोषित करील, तो अंमली पदार्थ किंवा सिद्ध पदार्थ असा आहे :

परंतु, त्यामध्ये केंद्र सरकार, त्याच्या स्वरूपाची, किंवा कोणत्याही आंतरराष्ट्रीय अभिसंधीअन्वये कोणताही निर्णय घेतला असल्यास त्याबद्दलची उपलब्ध माहिती लक्षात घेऊन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे निर्मित औषधिद्रव्ये नसल्याचे घोषित करील, अशा कोणत्याही अंमली पदार्थांचा किंवा सिद्ध पदार्थांचा समावेश होणार नाही ;

(बारा) " औषधी कॅनाबिस " म्हणजेच औषधी भाग म्हणजेच कॅनाबिस (भाग) चा कोणताही अर्क किंवा टिंक्चर ;

(तेरा) " अंमली औषधिद्रव्य आयुक्त " याचा अर्थ, कलम ५ अन्वये नियुक्त करण्यात आलेला अंमली औषधिद्रव्य आयुक्त, असा आहे ;

(चौदा) " अंमली औषधिद्रव्य " याचा अर्थ, कोका पान, कॅनाबिस (भांग), अफू, खसखशीचे गवत (पॉपी स्ट्रॉ) आणि त्यामध्ये सर्व निर्मित औषधिद्रव्यांचा समावेश होतो ;

(पंधरा) " अफू " याचा अर्थ,----

(क) अफूच्या बोंडांचा साकळीत रस ; आणि

(ख) कोणत्याही उदासीन पदार्थासह किंवा त्याविना अफूच्या बोंडांच्या साकळीत रसाचे कोणतेही मिश्रण,

असा आहे :

परंतु, त्यामध्ये ०.२ टक्क्यांपेक्षा अधिक मॉर्फीन नसलेल्या कोणत्याही सिद्ध पदार्थाचा समावेश होत नाही ;

(सोळा) " अफूजन्य पदार्थ " याचा अर्थ,----

(क) " औषधी अफू " म्हणजेच, भारतीय औषधी गुणधर्म ग्रंथाच्या आवश्यकतेनुसार किंवा, केंद्र सरकारने यासंबंधात अधिसूचित केलेल्या इतर कोणत्याही औषधी गुणधर्म ग्रंथाच्या आवश्यकतांनुसार औषधी वापरांसाठी अनुकूल करून घेण्याकरिता आवश्यक असलेल्या प्रक्रिया करण्यात आलेली अफू—मग ती भुकटीच्या स्वरूपात असो वा रवाळ स्वरूपात असो किंवा अन्य प्रकारची असो अथवा उदासीन द्रव्याबरोबर मिश्रण केलेली असो ;

(ख) " सिद्ध केलेली अफू " म्हणजे, धूम्रपानास योग्य होईल अशा रीतीने अफूचे अर्कात रूपांतर करण्यासाठी योजिलेल्या कोणत्याही अनेकवेळा केलेल्या प्रक्रियेनंतर मिळविलेले अफूचे कोणतेही उत्पादन आणि अफूचे सेवन केल्यानंतर शिल्लक राहणारी राख ; किंवा अन्य कोणत्याही स्वरुपात शिल्लक राहणारा पदार्थ ;

(ग) फेनान्थ्रीन अल्कलॉइड्स, उदाहरणार्थ मॉर्फिन, कोडीन, थिबेन, आणि त्यांचे क्षार ;

(घ) डायअॅसिटिल मॉर्फिन म्हणजेच, डाय-मॉर्फिन, किंवा हेरॉईन म्हणूनही ज्ञात असलेले अल्कलॉईड आणि त्यांचे क्षार ; आणि

(ङ) ०.२ टक्के मॉर्फिन अंतर्भूत असलेले किंवा कोणतेही डायअॅसिटिल मॉर्फिन अंतर्भूत असलेले सर्व सिद्ध पदार्थ,

असा आहे;

(सतरा) " अफूचे झाड " याचा अर्थ,----

(क) पॅपॉवर सॉम्निफेरम एल जातीची वनस्पती; आणि

(ख) ज्यापासून अफू किंवा कोणतेही फेनान्थ्रीन अल्कलॉईड काढता येईल आणि जे केंद्र सरकार **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, अफूचे झाड म्हणून घोषित करील अशी पॅपॉवर जातीची अन्य कोणतीही वनस्पती,

असा आहे ;

(अठरा) " खसखशीचे गवत " याचा अर्थ, खसखशीच्या झाडाचे कापणी केल्यानंतरचे सर्व भाग (बियांखेरीज) मग ते मूळ स्वरूपात असोत वा कापलेल्या, भरडलेल्या वा चूर्ण केलेल्या स्वरूपात असोत आणि त्यापासून रस काढलेला असो वा नसो, असा आहे ;

(एकोणीस) " खसखशीच्या गवताचे सत्त्व " याचा अर्थ, खसखशीच्या गवताच्या अल्कलॉईडच्या सत्त्वासाठी केल्या जाणाऱ्या प्रक्रियेच्या वेळी त्यातून तयार होणारे द्रव्य, असा आहे ;

(वीस) अंमली औषधिद्रव्ये किंवा मन:प्रभावी पदार्थ यांच्या संबंधात " सिद्ध पदार्थ " याचा अर्थ, डोसाच्या स्वरूपातील असे कोणतेही एक किंवा अधिक औषधिद्रव्य किंवा पदार्थ अथवा असे एक किंवा अधिक औषधिद्रव्य किंवा पदार्थ समाविष्ट असलेले कोणतेही द्रावण किंवा मिश्रण, मग ते कोणत्याही भौतिक अवस्थेतील असो, असा आहे ;

(एकवीस) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(बावीस) " उत्पादन " याचा अर्थ, अफू, खसखशीचे गवत, कोका पाने किंवा कॅनाबिस ज्या वनस्पतीपासून मिळविण्यात येते, त्या वनस्पतीपासून ते वेगळे काढणे, असा आहे ;

(तेवीस) " मन:प्रभावी पदार्थ " याचा अर्थ, अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या मन:प्रभावी पदार्थांच्या सूचीमध्ये अंतर्भूत करण्यात आलेला कोणताही नैसर्गिक किंवा संश्लिष्ट पदार्थ किंवा कोणतेही नैसर्गिक द्रव्य अथवा अशा पदार्थाचा किंवा द्रव्याचा कोणताही क्षार किंवा सिद्ध पदार्थ, असा आहे ;

[१] [(तेवीस-क्) अंमली औषधिद्रव्य आणि मन:प्रभावी पदार्थ यांच्या संदर्भात, "अल्प प्रमाण" याचा अर्थ, केंद्र सरकारकडून **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या प्रमाणापेक्षा कमी असलेले कोणतेही प्रमाण, असा आहे ;]

(चोवीस) "आंतरराज्यीय आयात करणे" याचा अर्थ, भारतातील एका राज्यातून किंवा संघराज्यक्षेत्रातून भारताच्या दुसऱ्या राज्यात किंवा संघराज्यक्षेत्रात आणणे, असा आहे ;

(पंचवीस) "भारतात आयात करणे" याचा, त्याचे व्याकरणिक रूपभेद व सजातीय शब्दप्रयोग यांसह अर्थ, भारताबाहेरील ठिकाणाहून भारतात आणणे, असा आहे आणि त्यामध्ये, जे अंमली औषधिद्रव्ये किंवा मन:प्रभावी पदार्थ, ते ज्यामधून वाहून नेले जात असतील ते जहाज, विमान, वाहन किंवा अन्य कोणतेही वाहन यामधून ते न हलवता भारताबाहेर नेण्याचा उद्देश असेल, असे अंमली औषधिद्रव्ये किंवा मन:प्रभावी पदार्थ भारतातील कोणत्याही बंदरावर, विमानतळावर किंवा एखाद्या ठिकाणी आणण्याचा समावेश होतो.

**स्पष्टीकरण.—** हा खंड आणि खंड (सव्वीस) याच्या प्रयोजनार्थ "भारत" यामध्ये भारताच्या सागरी सीमांचा समावेश होतो ;

(सव्वीस) "भारतातून निर्यात करणे" याचा, व्याकरणिक रूपभेद आणि सजातीय शब्दप्रयोग यांसह अर्थ, भारतातील दुसऱ्या राज्यात किंवा संघराज्यक्षेत्रात नेणे, असा आहे ;

(सत्तावीस) "आंतरराज्यीय निर्यात करणे" याचा अर्थ, भारतातील एका राज्यातून किंवा संघराज्यक्षेत्रातून भारतातील दुसऱ्या राज्यात किंवा संघराज्यक्षेत्रात नेणे, असा आहे ;

(अठ्ठावीस) "वाहतूक करणे" याचा अर्थ, एकाच राज्यातील किंवा संघराज्यक्षेत्रातील एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेणे, असा आहे ;

[२] [(क्) "अंमली औषधिद्रव्य आणि मन:प्रभावी पदार्थ यांच्या संदर्भातील वापर" याचा अर्थ, व्यक्तिगत वापराखेरीज अन्य कोणत्याही प्रकारचा वापर, असा आहे ;]

(एकोणतीस) यामध्ये वापरलेले आणि व्याख्या न केलेले, परंतु फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) मध्ये व्याख्या केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना त्या संहितेमध्ये अनुक्रमे नेमून दिलेले अर्थ असतील.

**स्पष्टीकरण.—** खंड (पाच), (सहा), (पंधरा) आणि (सोळा) यांच्या प्रयोजनार्थ, द्रव्य बनविण्यासंबंधातील टक्केवारी मोजताना एक टक्का मन:प्रभावी पदार्थ असलेला सिद्ध पदार्थ याचा अर्थ, ज्या सिद्ध पदार्थाच्या दर शंभर लिटरमध्ये, जर तो सिद्ध पदार्थ घन असेल तर एक ग्रॅम, किंवा तो द्रवरूप असेल तर एक मिलिलिटर एवढा (मन:प्रभावी) पदार्थ, समाविष्ट आहे असा सिद्ध पदार्थ, असा धरण्यात येईल आणि याच पद्धतीने अधिक वा कमी टक्केवारीही मोजण्यात येईल :

परंतु, केंद्र सरकार, द्रवरूप सिद्ध पदार्थातील टक्केवारी मोजण्याच्या पद्धतीमधील विकास लक्षात घेऊन त्याला अशा मोजणीसाठी उचित वाटेल असा अन्य कोणताही आधार नियमाद्वारे विहित करील.

**मन:प्रभावी पदार्थांच्या सूचीत भर घालण्याचे किंवा त्यातून वगळण्याची शक्ती.**

**३.** केंद्र सरकारला—

(क्) कोणताही पदार्थ (नैसर्गिक वा संश्लिष्ट) किंवा नैसर्गिक द्रव्य किंवा कोणताही क्षार किंवा अशा पदार्थांचा किंवा द्रव्याचा सिद्ध पदार्थ यांचे स्वरूप व परिणाम आणि गैरवापर किंवा गैरवापर करण्यास असलेला वाव यांच्यासंबंधी त्याला उपलब्ध झालेली माहिती व पुरावा; आणि

(ख्) असा पदार्थ, नैसर्गिक द्रव्य किंवा क्षार किंवा असा पदार्थ वा द्रव्य यांचा सिद्ध पदार्थ यांच्या संबंधात कोणत्याही आंतरराष्ट्रीय अभिसंधीमध्ये केलेले फेरबदल किंवा तरतुदी (कोणतेही असल्यास),

यांच्या आधारे तसे करणे आवश्यक किंवा उचित आहे अशी खात्री वाटल्यास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अनुसूचीत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या मन:प्रभावी पदार्थांच्या सूचीमध्ये, असा पदार्थ किंवा नैसर्गिक द्रव्य किंवा क्षार किंवा असा पदार्थ किंवा द्रव्य यांचा सिद्ध पदार्थ यांची भर घालता येईल किंवा, यथास्थिति, सूचीतून ते वगळता येतील.

---

[१] २००१ चा अधिनियम ९, कलम ३ (ग) द्वारे दाखल केला.

[२] १९८९ चा अधिनियम २, कलम ३ (ग) द्वारे दाखल केला.

## प्रकरण दोन

## प्राधिकरणे आणि अधिकारी

**अंमली औषधिद्रव्ये, इत्यादींचा गैरवापर आणि त्याचा निषिद्ध व्यापार यास प्रतिबंध आणि प्रतिरोध करण्यासाठी केंद्र सरकारकडून उपाययोजना.**

**४.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीनतेने, केंद्र सरकार, अंमली औषधिद्रव्ये आणि मन:प्रभावी पदार्थ यांचा गैरवापर आणि त्याचा निषिद्ध व्यापार, यास प्रतिबंध आणि प्रतिरोध करण्यासाठी त्याला आवश्यक किंवा इष्ट वाटतील अशा सर्व उपाययोजना करील.

(२) विशेषत: आणि पोटकलम (१) च्या तरतुदींच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, केंद्र सरकारला त्या पोटकलमान्वये करता येतील अशा उपाययोजनांमध्ये, खालील सर्व किंवा कोणत्याही बाबीसंबंधातील उपाय योजनांचा समावेश होतो, त्या अशा----

(क) (एक) या अधिनियमाखाली, किंवा

(दोन) या अधिनियमाच्या तरतुदींच्या अंमलबजावणी संबंधातील त्यावेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही अधिनियमाखाली, निरनिराळे अधिकारी, राज्य शासने आणि इतर अधिकारी यांच्याकडून करण्यात आलेल्या कारवाईचे समन्वयन ;

(ख) आंतरराष्ट्रीय अभिसंधीखालील आबंधने ;

(ग) अंमली औषधिद्रव्ये आणि मन:प्रभावी पदार्थ यांच्या निषिद्ध व्यापारास प्रतिबंध करण्यासाठी आणि त्याचे दमन करण्यासाठी समन्वय साधण्याच्या आणि सर्वव्यापी कारवाई करण्याच्या उद्देशाने, परदेशातील संबंधित प्राधिकरणे आणि संबंधित आंतरराष्ट्रीय संघटना यांना सहाय्य ;

(घ) व्यसनी व्यक्ती ओळखणे, त्यांच्यावर उपचार करणे, त्यांना शिक्षण देणे, त्यांची नंतरची देखभाल, त्यांचे पुनर्वसन करणे आणि त्यांना समाजात पुन्हा सामावून घेणे ;

(ङ) या अधिनियमाच्या तरतुदींची परिणामक अंमलबजावणी साधण्याच्या आणि अंमली औषधिद्रव्ये व मन:प्रभावी पदार्थ यांच्या गैरवापरास आणि निषिद्ध व्यापारास प्रतिरोध करण्याच्या प्रयोजनासाठी केंद्र सरकारला आवश्यक किंवा इष्ट वाटतील अशा सर्व बाबी.

(३) केंद्र सरकारला, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी तसे करणे आवश्यक किंवा उचित वाटत असेल तर, **राजपत्रात** प्रकाशित केलेल्या आदेशाद्वारे, त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा, या अधिनियमाखालील केंद्र सरकारच्या शक्तींचा वापर करण्यासाठी व अशी कार्ये पार पाडण्यासाठी आणि पोटकलम (२) मध्ये उल्लेखिलेल्या अशा बाबींच्या संबंधात उपाययोजना करण्यासाठी, आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा नावाने किंवा नावांनी प्राधिकरण किंवा प्राधिकरणे घटित करता येईल किंवा येतील आणि केंद्र सरकारचे पर्यवेक्षण व नियंत्रण आणि अशा आदेशाचे उपबंध यांच्या अधीनतेने, असे प्राधिकरण किंवा प्राधिकरणे यांना, जणू काही आदेशात नमूद केलेल्या उपाययोजना करण्याची शक्ती या अधिनियमाखाली प्रदान करण्यात आली असल्याप्रमाणे, त्या प्राधिकरणास किंवा प्राधिकरणांना अशा शक्तींचा वापर करता येईल आणि अशा उपाययोजना करता येतील.

**केंद्र सरकारचे अधिकारी.**

**५.** (१) कलम ४ च्या पोटकलम (३) च्या तरतुदींस बाध न आणता, केंद्र सरकार, आयुक्त, अंमली औषधिद्रव्य, यांची नियुक्ती करील आणि या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी त्याला योग्य वाटतील अशा पदनामांसह इतर अधिकाऱ्यांचीही नियुक्ती केंद्र सरकारला करता येईल.

(२) आयुक्त, अंमली औषधिद्रव्ये, एक तर स्वत: किंवा त्याला दुय्यम असणाऱ्या अधिकाऱ्यांमार्फत अफूच्या झाडांची लागवड आणि अफू उत्पादन यांच्या पर्यवेक्षणासंबंधीच्या सर्व शक्तींचा वापर करील आणि सर्व कार्ये पार पाडील आणि केंद्र सरकारला त्याच्याकडे सोपवण्यात आलेल्या अशा अन्य शक्तींचाही वापर करील आणि अशी कार्ये पार पाडील.

(३) पोटकलम (१) अन्वये नियुक्त करण्यात आलेले अधिकारी, केंद्र सरकारचे सर्वसाधारण नियंत्रण व संचालन यांच्या अधीन असतील किंवा त्या सरकारकडून तसे निदेशित झाल्यास, मंडळाच्या किंवा अन्य कोणत्याही प्राधिकरणाच्या किंवा अधिकाऱ्याच्या अधीन असतील.

**अंमली औषधिद्रव्ये आणि मन:प्रभावी पदार्थ सल्लागार समिती.**

**६.** (१) केंद्र सरकारला, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे केंद्र सरकारकडून वेळोवेळी विचारार्थ पाठविलेल्या या अधिनियमाच्या प्रशासनासंबंधीच्या बाबींवर त्या सरकारला सल्ला देण्यासाठी " अंमली औषधिद्रव्ये आणि मन:प्रभावी पदार्थ सल्लागार समिती " (या कलमात यापुढे समिती म्हणून निर्देशिलेली) या नावाने ओळखण्यात येईल अशी सल्लागार समिती घटित करता येईल.

(२) समितीमध्ये, केंद्र सरकारकडून नियुक्त करण्यात येईल असा अध्यक्ष आणि वीसपेक्षा अधिक नसतील इतके सदस्य यांचा समावेश असेल.

(३) केंद्र सरकारकडून तसे फर्मावण्यात येईल तेव्हा, समितीची बैठक होईल आणि तिला आपली कार्यपद्धती विनियमित करण्याची शक्ती असेल.

(४) समितीला आपली कर्तव्ये कार्यक्षमतेने पार पाडण्यासाठी तसे करणे आवश्यक वाटले तर, तिला एक किंवा अधिक उपसमित्या घटित करता येतील आणि अशा कोणत्याही उपसमितीमध्ये, सर्वसाधारणत: किंवा एखादी विशिष्ट बाब विचारात घेण्यासाठी, समितीचा सदस्य नसेल अशा कोणत्याही व्यक्तीची (अशासकीय धरून) नियुक्ती करता येईल.

(५) समितीचा अध्यक्ष आणि इतर सदस्य यांचा पदावधी, त्यांच्या नैमित्तिक रिक्त पदांची भरती करण्याची रीत आणि त्यांना देय असलेले भत्ते, कोणतेही असल्यास, आणि समिताचा सदस्य नसलेल्या व्यक्तीला समिती, आपल्या कोणत्याही उपसमितीचा सदस्य म्हणून ज्यांच्या अधीनतेने नियुक्त करील, त्या शर्ती व निर्बंध, हे, केंद्र सरकारकडून आलेल्या नियमांद्वारे विहित करण्यात आल्याप्रमाणे असतील.

**राज्य सरकारचे अधिकारी.**

**७.** (१) राज्य शासनाला, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी त्यास योग्य वाटतील अशी पदनामे देऊन तशा अधिकाऱ्यांची नियुक्ती करता येईल.

(२) पोटकलम (१) अन्वये नियुक्त केलेले अधिकारी हे, राज्य शासनाचे सर्वसाधारण नियंत्रण व निदेशन यांच्या अथवा त्या शासनाकडून तसे निदेशित करण्यात आले असल्यास, अन्य कोणत्याही प्राधिकरणाचे किंवा अधिकाऱ्याचे नियंत्रण व निदेशन यांच्या अधीन असतील.

[१] [ प्रकरण दोन क

**औषधिद्रव्याच्या दुरुपयोगावरील नियंत्रणासाठी राष्ट्रीय निधी**

**औषधिद्रव्याच्या दुरुपयोगावरील नियंत्रणासाठी राष्ट्रीय निधी.**

**७क.** (१) केंद्र सरकारला, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, "औषधिद्रव्याच्या दुरुपयोगावरील नियंत्रणासाठी राष्ट्रीय निधी" नावाचा (या प्रकरणात यापुढे निधी म्हणून निर्देशिलेला) निधी स्थापन करता येईल आणि त्यामध्ये—

(क) संसदेकडून यासंबंधातील कायद्याद्वारे केलेल्या उचित विनियोजनानंतर केंद्र सरकार पुरवील अशी रक्कम ;

(ख) प्रकरण पाच क अन्वये समपहृत केलेल्या कोणत्याही संपत्तीच्या विक्रीपासून मिळालेले उत्पन्न ;

(ग) कोणतीही व्यक्ती किंवा संस्था यांच्याकडून देण्यात आलेली कोणतीही अनुदाने ;

(घ) पूर्वोक्त तरतुदींन्वये निधीमध्ये जमा केलेल्या रकमांच्या गुंतवणुकीपासून मिळालेले कोणतेही उत्पन्न ;

— जमा करण्यात येईल.

[२] [ (२) केंद्र सरकार पुढील बाबींसाठी केलेल्या उपाययोजनांच्या संबंधात करण्यात आलेला खर्च भागविण्यासाठी निधीचा विनियोग करील :—

(क) अंमली औषधिद्रव्ये, मन:प्रभावी पदार्थ किंवा नियंत्रित पदार्थ यांच्या निषिद्ध वाहतुकीस प्रतिरोध करणे ;

(ख) अंमली औषधिद्रव्ये आणि मन:प्रभावी पदार्थ यांच्या दुरुपयोगावर नियंत्रण ठेवणे ;

(ग) व्यसनी व्यक्तींची ओळख पटविणे, त्यांच्यावर उपचार करणे, त्यांचे पुनर्वसन करणे ;

(घ) औषधिद्रव्याच्या दुरुपयोगास प्रतिबंध करणे ;

(ङ) औषधिद्रव्याच्या दुरुपयोगाबाबत लोकांना शिक्षित करणे ; आणि

(च) व्यसनी लोकांना औषधिद्रव्ये पुरविणे, जेथे वैद्यकीयदृष्ट्या आवश्यकता असेल तेथे त्यांना ते पुरविणे.

(३) केंद्र सरकारला, निधीबाबत त्यास सल्ला देण्यासाठी आणि **राजपत्रात** केंद्र सरकारकडून अधिसूचित करण्यात आलेल्या मर्यादेच्या अधीन राहून उक्त निधीतून पैसा मंजूर करण्यासाठी, त्यास योग्य वाटेल अशा नियामक मंडळाची स्थापना करता येईल. ]

---

[१] १९८९ चा अधिनियम २, कलम ४ द्वारे प्रकरण दोन क दाखल करण्यात आले.

[२] २००१ चा अधिनियम ९, कलम ४ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आले.

(४) नियामक मंडळात एक अध्यक्ष (केंद्र सरकारच्या अपर सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसेल असा) आणि केंद्र सरकार नियुक्त करील असे सहापेक्षा अधिक नसतील इतके इतर सदस्य असतील.

(५) नियामक मंडळाला आपली कार्यपद्धती विनियमित करण्याची शक्ती असेल.

निधीमधून वित्तव्यवस्था करण्यात आलेल्या कार्यक्रमांचा वार्षिक अहवाल.

**७ख.** केंद्र सरकार, शक्य तितक्या लवकर, प्रत्येक वित्तीय वर्षाअखेरीस, **राजपत्रात,** त्या वित्तीय वर्षात कलम ७क अन्वये वित्तव्यवस्था करण्यात आलेल्या कार्यक्रमासंबंधीचा लेख्यात्मक अहवाल, लेख्यांच्या विवरणपत्रासह प्रकाशित करवून घेईल.]

प्रकरण तीन

**प्रतिबंध, नियंत्रण आणि विनियमन**

विवक्षित क्रियांचा प्रतिबंध.

**८.** कोणतीही व्यक्ती, वैद्यकीय किंवा वैज्ञानिक प्रयोजनासाठी असेल ते खेरीजकरून, आणि या अधिनियमाच्या तरतुदी किंवा त्याअन्वये केलेले नियम किंवा आदेश याद्वारे तरतुदी करण्यात आल्या असतील त्या रीतीने आणि त्या मर्यादेपर्यंत, आणि अशा कोणत्याही तरतुदीत लायसन, परवाना किंवा प्राधिकारपत्र यांच्या रूपाने कोणतीही आवश्यक गोष्ट लादण्यात येईल अशा बाबतीत तसेच असे लायसन, परवाना किंवा प्राधिकारपत्र यांच्या अटी किंवा शर्ती यांनुसार असेल ते खेरीजकरून,—

(क) कोणत्याही कोका वनस्पतीची लागवड करणार नाही किंवा कोका वनस्पतीचा कोणताही भाग गोळा करणार नाही ; किंवा

(ख) अफूचे झाड किंवा कोणतीही कॅनाबिस वनस्पती यांची लागवड करणार नाही ; किंवा

(ग) कोणतेही अंमली औषधिद्रव्य किंवा मनःप्रभावी पदार्थ यांचे उत्पादन, निर्मिती करणार नाही, ते जवळ बाळगणार नाही, त्यांची विक्री, खरेदी, वाहतूक करणार नाही, ते वखारीत साठवणार नाही, त्यांचे सेवन करणार नाही, त्यांची आंतरराज्यीय आयात, आंतरराज्यीय निर्यात, भारतात आयात, भारतातून निर्यात करणार नाही किंवा वाहनांतरण करणार नाही :

परंतु, या अधिनियमाच्या इतर तरतुदी आणि त्याखाली करण्यात आलेले नियम यांच्या अधीनतेने, गांजाच्या उत्पादनासाठी कॅनाबिस वनस्पतीची लागवड किंवा वैद्यकीय आणि वैज्ञानिक प्रयोजनाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी गांजाचे उत्पादन, तो जवळ बाळगणे, त्याचा वापर करणे, उपभोग घेणे, त्याची खरेदी, विक्री, वाहतूक करणे, तो वखारीत साठवणे, त्यांची आंतरराज्यीय आयात आणि आंतरराज्यीय निर्यात करणे यांचा प्रतिषेध, केंद्र सरकार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे यासंबंधात विनिर्दिष्ट करील अशा दिनांकापासूनच अंमलात येईल :

[१] [परंतु, आणखी असे की, सजावटीच्या प्रयोजनासाठी खसखशीच्या गवतांच्या निर्यातीस या कलमातील काहीही लागू होणार नाही. ]

अपराधामधून प्राप्त झालेल्या मालमत्तेच्या संबंधातील विवक्षित कृतीस प्रतिबंध.

[२] [**८क.** कोणतीही व्यक्ती,—

(क) कोणतीही मालमत्ता, या अधिनियमान्वये किंवा कोणत्याही अन्य देशातील कोणत्याही अन्य तत्सम कायद्यान्वये केलेल्या एखाद्या अपराधातून किंवा अशा अपराधात सहभागी झाल्यामुळे प्राप्त झाली आहे, हे माहीत असताना, त्या मालमत्तेचे निषिद्ध मूळ स्वरूप लपविण्याच्या किंवा तिचे रूप बदलण्याच्या प्रयोजनार्थ किंवा कोणताही अपराध करण्यात कोणत्याही व्यक्तीला मदत करण्यासाठी किंवा कायदेशीर परिणाम चुकविण्यासाठी त्या मालमत्तेत कोणताही बदल करणार नाही किंवा तिचे हस्तांतरण करणार नाही ; किंवा

(ख) एखादी मालमत्ता, या अधिनियमान्वये किंवा कोणत्याही अन्य देशाच्या कोणत्याही अन्य तत्सम कायद्यान्वये केलेल्या अपराधातून प्राप्त झाली आहे हे माहीत असताना, अशा कोणत्याही मालमत्तेचे खरे स्वरूप, उगमस्थान, ठिकाण, विनियोग लपविणार नाही किंवा त्यात बदल करणार नाही ; किंवा

(ग) या अधिनियमान्वये किंवा कोणत्याही अन्य देशाच्या कायद्यान्वये केलेल्या अपराधातून प्राप्त झालेली अशी कोणतीही मालमत्ता जाणूनबुजून संपादन करणार नाही, कब्जात ठेवणार नाही किंवा तिचा वापर करणार नाही. ]

---

[१] १९८९ चा अधिनियम २, कलम ५ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

[२] २००१ चा अधिनियम ९, कलम ५ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

**परवाना देण्याची, नियंत्रण ठेवण्याची आणि विनियमन करण्याची केंद्र सरकारची शक्ती.**

९. (१) कलम ८ च्या तरतुदींच्या अधीनतेने, केंद्र सरकारला, नियमांद्वारे,—

(क) (एक) कोका वनस्पतीची लागवड किंवा त्याचा कोणताही भाग गोळा करणे (अशी लागवड किंवा गोळा करणे हे फक्त केंद्र सरकारच्या सांगण्यावरून करण्यात येईल तेव्हा) अथवा कोका पानांचे उत्पादन, ती जवळ बाळगणे, त्यांची विक्री, खरेदी, परिवहन, आंतरराज्यीय आयात, आंतरराज्यीय निर्यात, वापर करणे किंवा त्यांचा उपभोग घेणे ;

(दोन) अफूच्या झाडांची लागवड (अशी लागवड केवळ केंद्र सरकारच्या सांगण्यावरून केलेली असेल तेव्हा) ;

(तीन) अफूचे उत्पादन व निर्मिती आणि खसखशीच्या गवताचे उत्पादन ;

(चार) भारतातून निर्यात करण्यासाठी किंवा राज्य शासन वा निर्माणक रसायनशास्त्रज्ञ यांना विकण्यासाठी केंद्र सरकारच्या कारखान्यांतून अफू आणि अफूजन्य पदार्थांची विक्री ;

(पाच) निर्मित औषधिद्रव्यांची (सिद्ध अफूव्यतिरिक्त) निर्मिती, मात्र, औषधी अफूची निर्मिती किंवा निर्माता (मेकर) जे पदार्थ जवळ बाळगण्यास कायद्याने हक्कदार असेल अशा पदार्थापासून बनवलेले कोणतेही निर्मित औषधिद्रव्य समाविष्ट असलेला कोणताही सिद्धपदार्थ यांचा समावेश होत नाही ;

(सहा) मनःप्रभावी पदार्थांची निर्मिती, ते जवळ बाळगणे, त्यांचे परिवहन, त्यांची आंतरराज्यीय आयात, आंतरराज्यीय निर्यात, विक्री, खरेदी, उपभोग किंवा वापर ;

(सात) अंमली औषधिद्रव्ये व मनःप्रभावी पदार्थ यांची भारतात आयात आणि भारतातून निर्यात आणि वाहनांतरण,

—यांस परवाना देता येईल व त्याचे विनियमन करता येईल ;

(ख) खंड (क) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही बाबीवरील केंद्र सरकारचे नियंत्रण परिणामक व्हावे यासाठी आवश्यक अशी कोणतीही बाब विहित करता येईल.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी शक्तींच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, अशा नियमांद्वारे,—

(क) अफूच्या झाडांच्या लागवडीसाठी ज्या सीमांमध्ये लायसने देता येतील त्या सीमा वेळोवेळी निश्चित करण्याची शक्ती प्रदान करता येईल ;

(ख) लागवडदारांना सर्व अफू, अफूच्या झाडांची लागवड केलेल्या जमिनीतील उत्पादन, केंद्र सरकारकडून यासंबंधात प्राधिकृत करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांकडे सोपविण्यास भाग पाडता येईल ;

(ग) अफूच्या झाडांच्या लागवडीसाठी आणि अफूचे उत्पादन व निर्मिती यासाठी द्यावयाच्या लायसनांचे नमुने आणि शर्ती, त्यासाठी आकारावयाची फी, अशी लायसने ज्यांच्याकडून देण्यात, रोखून ठेवण्यात, नाकारण्यात किंवा रद्द करण्यात येतील ती प्राधिकरणे आणि लायसने रोखून ठेवण्याच्या, नाकारण्याच्या किंवा रद्द करण्याच्या आदेशांविरुद्ध ज्यांच्यापुढे अपील करण्यात येईल ती प्राधिकरणे विहित करता येतील ;

(घ) केंद्र सरकारकडून यासंबंधात प्राधिकृत करण्यात आलेले अधिकारी, लागवडदारांकडून अफू घेतेवेळी लागवडदारांच्या समक्ष तिची प्रत व घनता यांनुसार तिचे वर्णन करतील, तिच्या स्वरूपाची चाचणी घेतील आणि तिचे वर्गीकरण करतील असे विहित करता येईल ;

(ङ) लागवडदारांनी दिलेल्या अफूपोटी त्यांना द्यावयाची किंमत वेळोवेळी निश्चित करण्याचे अधिकार केंद्र सरकारला प्रदान करता येतील ;

(च) कारखान्यात आलेल्या अफूचे, तिची प्रत व घनता यांनुसार वजन करणे, तिची चाचणी आणि तिचे वर्गीकरण करणे आणि अशा चाचणीच्या निष्कर्षानुसार प्रमाण किमतीतून करावयाची घट किंवा वाढ (कोणतीही असल्यास) करणे यासाठी आणि वजन, चाचणी, वर्गीकरण, घट किंवा वाढ यासंबंधातील निर्णय घेणारे प्राधिकारी आणि अशा निर्णयासंबंधात ज्यांच्याकडे अपिले करता येतील ते प्राधिकारी यांसाठी तरतुदी करता येतील ;

(छ) लागवडदारांकडून आलेली अफू, केंद्र सरकारच्या कारखान्यातील तपासणीमध्ये भेसळयुक्त असल्याचे आढळल्यास, ती त्या संबंधात प्राधिकृत करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांकडून जप्त केली जाण्यास भाग पाडता येईल ;

(ज) निर्मित औषधिद्रव्याच्या निर्मितीच्या लायसनांसाठी नमुने व शर्ती, अशी लायसने ज्यांच्याकडून दिली जातील ते प्राधिकारी आणि त्यासाठी आकारावयाची फी विहित करता येईल ;

(झ) मन:प्रभावी पदार्थांची निर्मिती, ते जवळ बाळगणे, त्यांचे परिवहन, त्यांची आंतरराज्यीय आयात, आंतरराज्यीय निर्यात, विक्री, खरेदी, उपभोग किंवा वापर यांसाठी लायसने किंवा परवाने यांचे नमुने व शर्ती, ज्यांच्याकडून अशी लायसने किंवा परवाने दिले जातील ते प्राधिकारी आणि त्यासाठी आकारावयाची फी विहित करता येईल ;

(ञ) जेथून कोणत्याही प्रकारची अंमली औषधिद्रव्ये किंवा मन:प्रभावी पदार्थ भारतात आयात करता येतील किंवा भारतातून निर्यात करता येतील व त्यांचे वाहनांतरण करता येईल ती बंदरे आणि इतर ठिकाणे, अशी आयात, निर्यात किंवा वाहनांतरण यांसाठीच्या प्रमाणपत्राचे, प्राधिकारपत्राचे, किंवा, यथास्थिति, परवान्याचे नमुने व शर्ती, अशी प्रमाणपत्रे, प्राधिकारपत्रे किंवा परवाने ज्यांच्यामार्फत देण्यात येतील ते प्राधिकारी आणि त्यासाठी आकारावयाची फी विहित करता येईल.

**नियंत्रित पदार्थांचे नियंत्रण व विनियमन करण्याचा शक्ती.**

[1]**[९क.** (१) कोणतेही अंमली औषधिद्रव्ये किंवा मन:प्रभावी पदार्थ यांचे उत्पादन किंवा निर्मिती यांमध्ये कोणत्याही नियंत्रित पदार्थाचा वापर लक्षात घेता, लोकहितार्थ तसे करणे आवश्यक किंवा उचित आहे असे केंद्र सरकारचे मत असेल तर, त्याला, आदेशाद्वारे, त्यांचे उत्पादन, निर्मिती, पुरवठा व वितरण आणि त्यांचा व्यापार व वाणिज्य यांचे विनियमन किंवा प्रतिषेध यांसाठी तरतूद करता येईल.

(२) पोटकलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या शक्तीच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता त्याखाली देण्यात आलेल्या आदेशांमध्ये लायसने, परवाने याद्वारे वा अन्यथा, कोणत्याही नियंत्रित पदार्थाचे उत्पादन, निर्मिती, तो जवळ बाळगणे, त्यांचे परिवहन, त्यांची आंतरराज्यीय आयात, आंतरराज्यीय निर्यात, विक्री, खरेदी, उपभोग, वापर, साठवण, वितरण, विल्हेवाट किंवा संपादन यांचे विनियमन करण्यासाठी तरतूद करता येईल.]

**परवाना देण्याची, नियंत्रण ठेवण्याची आणि विनियमन करण्याची केंद्र सरकारची शक्ती.**

**१०.** (१) कलम ८ च्या तरतुदींच्या अधीनतेने, राज्य शासनाला, नियमांद्वारे,—

(क) (एक) खसखशीचे गवत जवळ बाळगणे, त्यांचे परिवहन, त्याची आंतरराज्यीय आयात, आंतरराज्यीय निर्यात, ते वखारीत साठवणे, त्याची विक्री, खरेदी, उपभोग आणि वापर करणे ;

(दोन) अफू जवळ बाळगणे, तिचे परिवहन, तिची आंतरराज्यीय आयात, आंतरराज्यीय निर्यात, विक्री, खरेदी, उपभोग व वापर करणे ;

(तीन) कोणत्याही कॅनाबिस वनस्पतीची लागवड कॅनाबिसचे (चरस वगळून) उत्पादन, निर्मिती, ते जवळ बाळगणे, त्याचे परिवहन, आंतरराज्यीय आयात, आंतरराज्यीय निर्यात, विक्री, खरेदी, उपभोग किंवा वापर करणे ;

(चार) औषधी अफूची किंवा जे जवळ बाळगण्यास निर्माता (मेकर) कायद्याने हक्कदार असेल अशा पदार्थापासून निर्मित कोणतेही औषधिद्रव्य अंतर्भूत असलेल्या कोणत्याही पदार्थाची निर्मिती करणे ;

(पाच) सिद्ध अफू खेरीज इतर निर्मित औषधिद्रव्ये किंवा कोका पाने आणि कोणतेही निर्मित औषधिद्रव्य अंतर्भूत असलेला कोणताही सिद्ध पदार्थ जवळ बाळगणे, त्याचे परिवहन, त्याची खरेदी, विक्री, आंतराराज्यीय आयात, आंतरराज्यीय निर्यात, उपभोग किंवा वापर ;

(सहा) राज्य शासनाकडे नोंदणी झालेल्या व्यसनी व्यक्तीने वैद्यकीय सल्ल्यानुसार त्याच्या व्यक्तिगत वापरासाठी कायदेशीरपणे बाळगलेल्या अफूपासून तयार करण्यात आलेल्या सिद्ध अफूची निर्मिती करणे व ती जवळ बाळगणे.

या गोष्टींना परवाना देता येईल आणि त्यांचे विनियमन करता येईल :

परंतु, उपखंड (चार) व (पाच) अन्वये करण्यात आलेल्या नियमांमध्ये स्पष्टपणे उपबंधित केले असेल तेथवर ते खेरीजकरून, कलम ८ मधील कोणतीही गोष्ट शासनाची संपत्ती असलेल्या आणि शासनाच्या कब्जात असलेल्या निर्मित औषधिद्रव्यांची आंतरराज्यीय आयात, आंतरराज्यीय निर्यात, त्यांचे परिवहन, ती जवळ बाळगणे, त्यांची खरेदी, विक्री, त्यांचा उपभोग किंवा वापर यांस लागू होणार नाही :

---

[1] १९८९ चा अधिनियम २, कलम ६ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

परंतु आणखी असे की, पूर्ववर्ती परंतुकामध्ये उल्लेखिलेली अशी औषधिद्रव्ये राज्य शासनाकडून पूर्वोक्त उपखंडांन्वये करण्यात आलेल्या नियमान्वये, ती जवळ बाळगण्यास हक्कदार नसलेल्या अशा कोणत्याही व्यक्तीला विकली जाणार नाहीत किंवा तिच्याकडे अन्यथा पोहोचवली जाणार नाहीत ;

(ख) खंड (क) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कोणत्याही बाबींवरील राज्य शासनाचे नियंत्रण परिणामक करण्यासाठी आवश्यक अशी अन्य कोणतीही बाब विहित करता येईल.

(२) विशेषतः आणि पूर्ववर्ती शक्तींच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, अशा नियमांद्वारे,—

(क) राज्य शासनाला कोणतेही ठिकाण वखार म्हणून घोषित करण्याचे अधिकार प्रदान करता येईल, ज्यामध्ये कायदेशीररीत्या आंतरराज्यीय आयात केलेले आणि आंतरराज्यीय निर्यात करण्याचा किंवा भारतातून निर्यात करण्याचा उद्देश असलेले खसखशीचे गवत साठवून ठेवणे हे मालकांचे कर्तव्य असेल, अशा वखारबंद खसखशीच्या गवताच्या सुरक्षित ताब्याचे विनियमन करण्याची आणि अशा खसखशीच्या गवताची विक्री, आंतरराज्यीय निर्यात करण्यासाठी अथवा त्याची भारतातून निर्यात करण्यासाठी ते हलविण्याची व वखारीत साठवून ठेवण्यासाठी फी आकारण्याची आणि फी भरण्यात कसूर झाल्यास, वखारीत साठविलेले खसखशीचे गवत निकालात काढण्याची रीत आणि किती कालावधीनंतर ते निकालात काढले जाईल तो कालावधी विहित करण्याची शक्ती प्रदान करता येईल ;

(ख) कॅनाबिस वनस्पतीच्या लागवडीसाठी ज्या सीमांमध्ये लायसने देण्यात येतील त्या सीमा राज्य शासनाच्या आदेशाद्वारे वा तद्न्वये वेळोवेळी ठरविण्यात येतील, अशी तरतूद करता येईल ;

(ग) राज्य शासनाच्या विहित प्राधिकरणाद्वारे लायसन देण्यात आलेले लागवडदारच फक्त कोणत्याही कॅनाबिस वनस्पतीची लागवड हाती घेण्यास प्राधिकृत असतील, अशी तरतूद करता येईल ;

(घ) कॅनाबिस वनस्पतीची लागवड केलल्या जमिनीतील उत्पादन असलेले सर्व कॅनाबिस राज्य शासनाने यासंबंधात प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांकडेच पाठविण्यास लागवडदारांना भाग पाडता येईल ;

(ङ) पाठविण्यात आलेल्या कॅनाबिससाठी लागवडदारांना द्यावयाची किंमत वेळोवेळी निश्चित करण्याचे अधिकार राज्य शासनाला प्रदान करता येतील ;

(च) पोटकलम (१) च्या खंड (क) च्या उपखंड (एक) ते (सहा) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या प्रयोजनांसाठीची लायसने किंवा परवाने यांचे नमुने व शर्ती आणि अशी लायसने किंवा परवाने ज्यांच्याद्वारे देण्यात येतील ती प्राधिकरणे आणि त्यासाठी आकारावयाची फी विहित करता येईल.

**अंमली औषधिद्रव्ये व मनःप्रभावी पदार्थ इत्यादी अटकावणीस किंवा जप्तीस पात्र असणार नाहीत.**

**११.** कोणताही कायदा किंवा संविदा यात एतद्‌विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, कोणतेही अंमली औषधिद्रव्य, मनःप्रभावी पदार्थ, कोका वनस्पती, खसखशीचे झाड किंवा कॅनाबिस वनस्पती ही, कोणतेही न्यायालय, किंवा प्राधिकरण यांचा कोणताही आदेश किंवा हुकूमनामा या अन्वये किंवा अन्यथा कोणत्याही रकमेच्या वसुलीसाठी, कोणत्याही व्यक्तीकडून अटकावून घेतली जाण्यास किंवा जप्त केली जाण्यास पात्र ठरणार नाही.

**अंमली औषधिद्रव्ये व मनःप्रभावी पदार्थ यांच्या बाह्य व्यवहारांवर निर्बंध.**

**१२.** केंद्र सरकारच्या, पूर्वप्राधिकाराशिवाय आणि त्या शासनाकडून त्या संबंधात घालण्यात येतील अशा शर्तींच्या अधीनतेखेरीज कोणतीही व्यक्ती, ज्याद्वारे अंमली औषधिद्रव्य किंवा मनःप्रभावी पदार्थ भारताबाहेरून प्राप्त करून घेऊन तो भारताबाहेरील कोणत्याही व्यक्तीला पुरविण्यात येईल अशा कोणत्याही व्यापारात गुंतणार नाही किंवा त्यावर नियंत्रण ठेवणार नाही.

**स्वादकारके बनविताना कोका वनस्पती व कोका पाने यांचा वापर करण्यासंबंधातील विशेष तरतूद.**

**१३.** कलम ८ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, केंद्र सरकारला सशर्त किंवा बिनशर्त आणि शासनाच्या वतीने, ज्यामध्ये कोणतेही अल्क्लॉईड असणार नाही असे कोणतेही स्वादकारक बनविताना उपयोग करण्यासाठी आणि अशा उपयोगासाठी आवश्यक त्या मर्यादेपर्यंत, कोणत्याही कोका वनस्पतीची लागवड करण्याची किंवा त्याचा कोणताही भाग गोळा करण्याची किंवा कोका पानांचे उत्पादन करण्याची, ती जवळ बाळगण्याची, त्याची विक्री, खरेदी, परिवहन, आंतरराज्यीय आयात, आंतरराज्यीय निर्यात किंवा भारतात आयात करण्याची परवानगी देता येईल.

**कॅनाबिसच्या संबंधातील विशेष तरतूद.**

**१४.** कलम ८ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, शासनाला सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे आणि अशा आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आल्या असतील अशा शर्तींच्या अधीनतेने, फक्त तंतू किंवा बी मिळविण्याच्या औद्योगिक प्रयोजनांसाठी किंवा बागायती प्रयोजनांसाठी कोणत्याही कॅनाबिस वनस्पतींच्या लागवडीस परवानगी देता येईल.

## प्रकरण चार

## अपराध आणि शास्ती

खसखसशीच्या गवतासंबंधातील व्यतिक्रमणाबद्दल शिक्षा.

[1][ १५. जो कोणी, या अधिनियमाची कोणतीही तरतूद किंवा त्याअन्वये करण्यात आलेला कोणताही नियम किंवा आदेश, किंवा देण्यात आलेल्या लायसनची शर्त यांचे व्यतिक्रमण करून, खसखशीच्या गवताची निर्मिती करील, ते जवळ बाळगील, त्याचे परिवहन करील, आंतरराज्यीय आयात करील, आंतरराज्यीय निर्यात करील, त्याची विक्री, खरेदी करील, त्याचा वापर करील किंवा खसखशीचे गवत वखारबंद करण्याचे टाळील किंवा वखारबंद खसखशीचे गवत हलवील किंवा त्यासंबंधात कोणतीही कृती करील, तो,—

(क) जेव्हा व्यतिक्रमण अल्प प्रमाणाच्या बाबतीत असेल तेव्हा सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या सश्रम कारावासाच्या शिक्षेस किंवा दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा दोन्हीस पात्र असेल ;

(ख) जेव्हा व्यतिक्रमण वाणिज्यिक प्रमाणापेक्षा कमी प्रमाणाच्या बाबतीत असेल परंतु अल्प प्रमाणापेक्षा अधिक प्रमाणाच्या बाबतीत असेल तेव्हा, तो दहा वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या सश्रम कारावासाच्या शिक्षेस आणि एक लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र असेल ;

(ग) जेव्हा व्यतिक्रमण वाणिज्यिक प्रमाणाच्या बाबतीत असेल तेव्हा दहा वर्षांहून कमी नाही, परंतु वीस वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या सश्रम कारावासाच्या शिक्षेस पात्र असेल आणि एक लाख रुपयांहून कमी नाही परंतु दोन लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडासही पात्र असेल :

परंतु, न्यायालयाला दोन लाख रुपयांहून अधिक द्रव्यदंड बसविता येईल व त्याची कारणे न्यायनिर्णयात नमूद करण्यात येतील.

कोका वनस्पती आणि कोका पाने यासंबंधातील व्यतिक्रमणाबद्दल शिक्षा.

१६. जो कोणी, या अधिनियमाची कोणतीही तरतूद किंवा त्याअन्वये करण्यात आलेला कोणताही नियम किंवा आदेश किंवा देण्यात आलेल्या लायसनची शर्त, यांचे व्यतिक्रमण करून, कोणत्याही कोका वनस्पतीची लागवड करील किंवा कोका वनस्पतीचा कोणताही भाग गोळा करील किंवा कोका पानांची निर्मिती करील, ती जवळ बाळगील, त्यांची विक्री, खरेदी, परिवहन, आंतरराज्यीय आयात, आंतरराज्यीय निर्यात किंवा वापर करील, तो दहा वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या सश्रम कारावासाच्या शिक्षेस आणि एक लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडासही पात्र असेल.

सिद्ध अफू संबंधातील व्यतिक्रमणाबद्दल शिक्षा.

१७. जो कोणी, या अधिनियमाची कोणतीही तरतूद किंवा त्याअन्वये करण्यात आलेला कोणताही नियम किंवा आदेश किंवा देण्यात आलेल्या लायसनाची शर्त, यांचे व्यतिक्रमण करून, सिद्ध अफूची निर्मिती करील, ती जवळ बाळगील, तिची विक्री, खरेदी, परिवहन, आंतरराज्यीय आयात, आंतरराज्यीय निर्यात किंवा वापर करील, तो,—

(क) जेव्हा व्यतिक्रमण अल्प प्रमाणाच्या बाबतीत असेल तेव्हा, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या सश्रम कारावासाच्या शिक्षेस किंवा दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा दोन्हीस पात्र असेल; किंवा

(ख) जेव्हा व्यतिक्रमण वाणिज्यिक प्रमाणापेक्षा कमी प्रमाणाच्या बाबतीत असेल परंतु अल्प प्रमाणापेक्षा अधिक प्रमाणाच्या बाबतीत असेल तेव्हा, दहा वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या सश्रम कारावासाच्या शिक्षेस आणि एक लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र असेल ; किंवा

(ग) जेव्हा व्यतिक्रमण वाणिज्यिक प्रमाणाच्या बाबतीत असेल तेव्हा, दहा वर्षांहून कमी नाही परंतु वीस वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या सश्रम कारावासाच्या शिक्षेस पात्र असेल आणि एक लाख रुपयांहून कमी नाही परंतु दोन लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडासही पात्र असेल :

परंतु , न्यायालयाला दोन लाख रुपयांपेक्षा अधिक द्रव्यदंड बसविता येईल व त्याची कारणे न्यायनिर्णयात नमूद करण्यात येतील.

अफूचे झाड आणि अफू यांच्या संबंधातील व्यतिक्रमणाबद्दल शिक्षा.

१८. जो कोणी, या अधिनियमाची कोणतीही तरतूद किंवा त्याअन्वये करण्यात आलेला कोणताही नियम किंवा आदेश किंवा देण्यात आलेल्या लायसनची शर्त, यांचे व्यतिक्रमण करून अफूच्या झाडाची लागवड करील किंवा अफूचे उत्पादन काढील, तिची निर्मिती करील, ती जवळ बाळगील, तिची विक्री, खरेदी, परिवहन, आंतरराज्यीय आयात, आंतरराज्यीय निर्यात किंवा वापर करील, तो—

---

[1] २००१ चा अधिनियम ९, कलम ६ द्वारे मूळ कलमांऐवजी ही कलमे समाविष्ट करण्यात आली.

(क्) जेव्हा व्यतिक्रमण अल्प प्रमाणाच्या बाबतीत असेल तेव्हा, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या सश्रम कारावासाच्या शिक्षेस किंवा दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा दोन्हीस पात्र असेल ;

(ख्) जेव्हा व्यतिक्रमण वाणिज्यिक प्रमाणाच्या बाबतीत असेल तेव्हा, दहा वर्षांहून कमी नाही परंतु, वीस वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या सश्रम कारावासाच्या शिक्षेस पात्र असेल आणि एक लाख रुपयांहून कमी नाही परंतु दोन लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडासही पात्र असेल :

परंतु, न्यायालयाला, दोन लाख रुपयांपेक्षा अधिक द्रव्यदंड बसविता येईल व त्याची कारणे न्यायनिर्णयात नमूद करण्यात येतील.

(ग्) कोणत्याही अन्य प्रकरणात, दहा वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या सश्रम कारावासाच्या शिक्षेस आणि एक लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र असेल.]

**लागवडदाराकडून करण्यात आलेल्या अफूच्या अपहाराबद्दल शिक्षा.**

**१९.** केंद्र सरकारच्या वतीने अफूच्या झाडाची लागवड करण्याचे लायसन मिळविलेल्या कोणत्याही लागवडदाराने, उत्पादित अफूचा किंवा तिच्या कोणत्याही भागाचा अपहार केला किंवा अन्यथा बेकायदेशीरपणे विल्हेवाट लावली तर त्याला दहा वर्षांपेक्षा कमी नाही परंतु वीस वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या सश्रम कारावासाची शिक्षा होईल आणि तो एक लाख रुपयांपेक्षा कमी नाही परंतु दोन लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडासही पात्र असेल :

परंतु, न्यायालयाला, दोन लाख रुपयांपेक्षा अधिक द्रव्यदंड बसविता येईल व त्याची कारणे न्यायनिर्णयात नमूद करण्यात येतील.

**कॅनाबिस वनस्पती आणि कॅनाबिस यांच्या संबंधातील शिक्षा.**

**२०.** जो कोणी, या अधिनियमाची कोणतीही तरतूद किंवा त्याखाली करण्यात आलेला कोणताही नियम किंवा आदेश किंवा देण्यात आलेल्या लायसनची शर्त यांचे व्यतिक्रमण करून—

(क्) कोणत्याही कॅनाबिस वनस्पतीची लागवड करील ; किंवा

(ख्) कॅनाबिसचे उत्पादन, निर्मिती करील, ते जवळ बाळगील, त्याची विक्री, खरेदी, परिवहन, आंतरराज्यीय आयात, आंतरराज्यीय निर्यात किंवा वापर करील, तो,—

[१] [(एक) जेव्हा असे व्यतिक्रमण खंड (क्) शी संबंधित असेल त्याबाबतीत दहा वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या सश्रम कारावासाच्या शिक्षेस आणि एक लाख रुपयांपर्यंत असू शकेल अशा द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल ; आणि

(दोन) जेव्हा असे व्यतिक्रमण उपखंड (ख्) शी संबंधित असेल,

(क्) आणि ते व्यतिक्रमण अल्प प्रमाणाच्या बाबतीतील असेल त्याबाबतीत सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या सश्रम कारावासाच्या शिक्षेस किंवा दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल ;

(ख्) आणि जेव्हा ते व्यतिक्रमण वाणिज्यिक प्रमाणापेक्षा कमी परंतु अल्प प्रमाणापेक्षा अधिक प्रमाणाशी संबंधित असेल तेव्हा दहा वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या सश्रम कारावासाच्या शिक्षेस आणि एक लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल.

(ग्) आणि जेव्हा वाणिज्यिक प्रमाणाशी संबंधित व्यतिक्रमण असेल तेव्हा दहा वर्षांपेक्षा कमी नसेल परंतु वीस वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या सश्रम कारावासाच्या शिक्षेस आणि एक लाख रुपयांपेक्षा कमी नाही परंतु दोन लाख रुपयांपर्यंत असू शकेल अशा द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल :

परंतु, न्यायालयाला दोन लाख रुपयांपेक्षा अधिक द्रव्यदंड बसविता येईल व त्याची कारणे न्यायनिर्णयात नमूद करण्यात येतील.]

**निर्मित औषधिद्रव्ये आणि सिद्ध पदार्थ यासंबंधातील व्यतिक्रमणाबद्दल शिक्षा.**

[२] [**२१.** जो कोणी, या अधिनियमाची कोणतीही तरतूद किंवा त्याअन्वये करण्यात आलेला कोणताही नियम किंवा आदेश किंवा देण्यात आलेल्या लायसनची शर्त, याचे व्यतिक्रमण करून कोणतेही निर्मित औषधिद्रव्य किंवा कोणतेही निर्मित औषधिद्रव्य समाविष्ट असलेला कोणताही सिद्ध पदार्थ यांची निर्मिती करील, तो जवळ बाळगील, त्याची विक्री, खरेदी, त्याचे परिवहन, त्याची आंतरराज्यीय आयात, आंतरराज्यीय निर्यात किंवा वापर करील, तो,—

---

[१] २००१ चा अधिनियम क्रमांक ९, कलम ७ अन्वये मूळ मजकुराऐवजी नवीन मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ८, अन्वये मूळ कलमांऐवजी नवीन कलमे समाविष्ट करण्यात आली.

(क) जेव्हा व्यतिक्रमण अल्प प्रमाणाशी संबंधित असेल तेव्हा सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या सश्रम कारावासाच्या शिक्षेस किंवा दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल अशा द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल ;

(ख) जेव्हा व्यतिक्रमण वाणिज्यिक प्रमाणापेक्षा कमी परंतु अल्प प्रमाणापेक्षा अधिक प्रमाणाच्या संबंधातील असेल तेव्हा दहा वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या सश्रम कारावासाच्या शिक्षेस आणि एक लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडांच्या शिक्षेस पात्र होईल ;

(ग) जेव्हा व्यतिक्रमण वाणिज्यिक प्रमाणाच्या बाबतीतील असेल तेव्हा दहा वर्षांपेक्षा कमी नसेल परंतु वीस वर्षांपर्यंत असू शकेल तितक्या मुदतीच्या सश्रम कारावासाच्या शिक्षेस आणि एक लाख रुपयांपेक्षा कमी नाही परंतु दोन लाख रुपयांपर्यंत असू शकेल अशा द्रव्यदंडाच्या शिक्षेसही तो पात्र असेल :

परंतु, न्यायालयाला, दोन लाख रुपयांपेक्षा अधिक द्रव्यदंड बसविता येईल व त्याची कारणे न्याय-निर्णयात नमूद करण्यात येतील.

**मन:प्रभावी पदार्थासंबंधातील व्यतिक्रमणाबद्दल शिक्षा.**

२२. जो कोणी, या अधिनियमाची कोणतीही तरतूद किंवा त्याअन्वये केलेला कोणताही नियम किंवा आदेश किंवा देण्यात आलेल्या लायसनची शर्त यांचे व्यतिक्रमण करून, कोणत्याही मन:प्रभावी पदार्थाची निर्मिती करील, तो जवळ बाळगील, त्याची विक्री, खरेदी, त्याचे परिवहन, त्याची आंतराज्यीय आयात, आंतरराज्यीय निर्यात किंवा वापर करील, त्याला,—

(क) जेव्हा व्यतिक्रमण अल्प प्रमाणाच्या बाबतीत असेल तेव्हा सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या सश्रम कारावासाच्या शिक्षेस किंवा दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल ;

(ख) जेव्हा व्यतिक्रमण वाणिज्यिक प्रमाणापेक्षा कमी परंतु अल्प प्रमाणापेक्षा अधिक प्रमाणाशी संबंधित असेल तेव्हा दहा वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या सश्रम कारावासाच्या शिक्षेस आणि एक लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल ;

(ग) जेव्हा व्यतिक्रमण वाणिज्यिक प्रमाणाच्या बाबतीत असेल तेव्हा दहा वर्षांहून कमी नाही परंतु वीस वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या सश्रम कारावासाच्या शिक्षेस आणि एक लाखापेक्षा कमी नाही परंतु दोन लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेसही पात्र असेल :

परंतु, न्यायालयाला, दोन लाख रुपयांपेक्षा अधिक द्रव्यदंड बसविता येईल व त्याची कारणे न्याय-निर्णयात नमूद करण्यात येतील.

**अंमली औषधिद्रव्ये आणि मन:प्रभावी पदार्थ यांची अवैधरीत्या भारतात आयात किंवा भारतातून निर्यात किंवा वाहनांतरण यासाठी शिक्षा.**

२३. जो कोणी, या अधिनियमाची कोणतीही तरतूद किंवा त्याअन्वये केलेला कोणताही नियम वा आदेश अथवा त्याअन्वये मंजूर केलेले लायसन वा परवाना अथवा देण्यात आलेले प्रमाणपत्र वा प्राधिकारपत्र यांचे व्यतिक्रमण करून, कोणतेही अंमली औषधिद्रव्य वा मन:प्रभावी पदार्थ यांची भारतात आयात किंवा भारतातून निर्यात किंवा वाहनांतरण करील, तो—

(क) जेव्हा व्यतिक्रमण अल्प प्रमाणाच्या बाबतीत असेल तेव्हा सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या सश्रम कारावासाच्या शिक्षेस किंवा दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल ;

(ख) जेव्हा व्यतिक्रमण वाणिज्यिक प्रमाणापेक्षा कमी परंतु अल्प प्रमाणापेक्षा अधिक प्रमाणाशी संबंधित असेल तेव्हा दहा वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या सश्रम कारावासाच्या शिक्षेस आणि एक लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल ;

(ग) जेव्हा व्यतिक्रमण वाणिज्यिक प्रमाणाच्या बाबतीत असेल तेव्हा, दहा वर्षांपेक्षा कमी नाही परंतु वीस वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या सश्रम कारावासाच्या शिक्षेस आणि एक लाख रुपयांपेक्षा कमी नाही परंतु दोन लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेसही पात्र असेल :

परंतु, न्यायालयाला, दोन लाख रुपयांपेक्षा अधिक द्रव्यदंड बसविता येईल व त्याची कारणे न्यायनिर्णयात नमूद करण्यात येतील. ]

**कलम १२ चे व्यतिक्रमण करून अंमली औषधिद्रव्ये व मन:प्रभावी पदार्थ यांच्या बाह्य व्यवहाराबद्दल शिक्षा.**

**२४.** जो कोणी, केंद्र सरकारच्या पूर्वप्राधिकारपत्राविना किंवा कलम १२ अन्वये देण्यात आलेल्या अशा प्राधिकारपत्राच्या शर्तींनुसार (कोणत्याही असल्यास) असेल त्या व्यतिरिक्त अन्य प्रकारे, ज्याद्वारे अंमली औषधिद्रव्य किंवा मन:प्रभावी पदार्थ भारताबाहेर प्राप्त करून घेऊन भारताबाहेरील कोणत्याही व्यक्तीला पुरविण्यात येतात अशा कोणत्याही व्यापारात गुंतलेला असेल किंवा त्यावर नियंत्रण ठेवत असेल त्याला दहा वर्षांपेक्षा कमी नाही परंतु वीस वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या सश्रम कारावासाची शिक्षा होईल आणि तो, एक लाख रुपयांपेक्षा कमी नाही परंतु दोन लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडासही पात्र असेल :

परंतु, न्यायालयाला, दोन लाख रुपयांपेक्षा अधिक द्रव्यदंड बसविता येईल व त्याची कारणे न्यायनिर्णयात नमूद करण्यात येतील.

**अपराध करण्याच्या कामी वास्तु, इत्यादींचा वापर करण्यास परवानगी देण्याबद्दल शिक्षा.**

[1] [ **२५.** जो कोणी, कोणतेही घर, खोली, आवार, जागा, ठिकाण, प्राणी किंवा वाहन यांचा मालक किंवा ताबाधारक असून किंवा त्यावर त्याचे नियंत्रण असून किंवा त्यांचा तो वापर करीत असून कोणत्याही व्यक्तीकडून या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीअन्वये दंडनीय असा अपराध करण्याच्या कामी त्यांचा वापर करण्यास जाणीवपूर्वक परवानगी देईल, तो, त्या अपराधासाठी तरतूद केलेल्या शिक्षेस पात्र असेल. ]

**कलम ९ क अन्वये देण्यात आलेल्या आदेशांच्या व्यतिक्रमणाबद्दल शिक्षा.**

[2] [ **२५क.** कोणत्याही व्यक्तीने कलम ९ क अन्वये देण्यात आलेल्या आदेशांचे व्यतिक्रमण केल्यास, तिला दहा वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या सश्रम कारावासाची शिक्षा होईल आणि ती, एक लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडासही पात्र होईल :

परंतु, न्यायालयाला, एक लाख रुपयांपेक्षा अधिक द्रव्यदंड बसविता येईल व त्याची कारणे न्यायनिर्णयात नमूद करण्यात येतील. ]

**अनुज्ञप्तिधारक किंवा त्याचा नोकर यांच्या विवक्षित कृतींबद्दल शिक्षा.**

**२६.** हा अधिनियम किंवा त्याअन्वये करण्यात आलेला कोणताही नियम वा आदेश याअन्वये देण्यात आलेले कोणतेही लायसन, परवाना किंवा प्राधिकारपत्र यांचा धारक किंवा त्याच्या वतीने कार्य करीत असलेली कोणतीही व्यक्ती,—

(क) या अधिनियमाच्या तरतुदी किंवा त्याअन्वये करण्यात आलेला कोणताही नियम यांनुसार कोणत्याही वाजवी कारणाशिवाय लेखे ठेवणार नाही किंवा कोणतेही विवरणपत्र सादर करणार नाही ;

(ख) यासंबंधात केंद्र सरकारकडून किंवा राज्य शासनाकडून प्राधिकृत करण्यात आलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या मागणीवरून असे लायसन, परवाना, प्राधिकारपत्र सादर करण्यात कोणत्याही वाजवी कारणाशिवाय कसूर करील ;

(ग) जो खोटा आहे किंवा चुकीचा आहे असे तिला माहीत आहे किंवा तसे मानण्यास कारण आहे असा कोणताही लेखा ठेवील किंवा विधान करील ; किंवा

(घ) ज्या शर्तींचा भंग केल्याबद्दल या अधिनियमात अन्यत्र शास्ती विहित करण्यात आलेली नाही अशा कोणत्याही लायसनाच्या, परवान्याच्या किंवा प्राधिकारपत्राच्या कोणत्याही शर्तीचा भंग करून कोणतीही कृती जाणूनबुजून किंवा बुद्धिपुरस्सर करील,

ती तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या किंवा द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

**अंमली औषधिद्रव्ये किंवा मन:प्रभावी पदार्थ यांचे सेवन केल्याबद्दल शिक्षा.**

[3] [ **२७.** जो कोणी, कोणतेही अंमली औषधिद्रव्य वा मन:प्रभावी पदार्थ यांचे सेवन करील, तो,—

(क) सेवन केलेले औषधिद्रव्य किंवा मन:प्रभावी पदार्थ हे कोकेन, मॉर्फिन, डायसिटिल-मॉर्फिन अथवा केंद्र सरकारकडून **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या संबंधात विनिर्दिष्ट करण्यात

[1] २००१ चा अधिनियम ९, कलम ९ द्वारे मूळ मजकुराऐवजी समाविष्ट केले.

[2] १९८९ चा अधिनियम २, कलम ७ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

[3] २००१ चा अधिनियम ९, कलम १० द्वारे मूळ मजकुराऐवजी समाविष्ट केले.

आलेले अन्य कोणतेही अंमली औषधिद्रव्य किंवा कोणताही मन:प्रभावी पदार्थ असेल त्या बाबतीत, एक वर्षापर्यंत असू शकेल अशा मुदतीच्या सश्रम कारावासाच्या किंवा वीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्य दंडाच्या किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल ; आणि

(ख) सेवन केलेले औषधिद्रव्य किंवा मन:प्रभावी पदार्थ खंड (क्) मध्ये किंवा अन्वये विनिर्दिष्ट करण्यात आले असेल त्या व्यतिरिक्त असेल अशा बाबतीत, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल अशा मुदतीच्या कारावासाच्या किंवा दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल. ]

**विधिनिषिद्ध क्रयविक्रयासाठी वित्तव्यवस्था करण्याबद्दल आणि अपराध्यांना आसरा देण्याबद्दल शिक्षा.**

[1][ **२७क.** जो कोणी, कलम २ च्या खंड (आठ-क्) चा उपखंड (एक) ते (पाच) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कोणत्याही व्यवहारांसाठी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे वित्तव्यवस्था करण्यात सहभागी असेल किंवा पूर्वोक्तांपैकी कोणत्याही व्यवहारात गुंतलेल्या कोणत्याही व्यक्तीला आसरा देत असेल, त्याला दहा वर्षांपेक्षा कमी नाही परंतु वीस वर्षांपर्यंत असू शकेल अशा मुदतीच्या सश्रम कारावासाची शिक्षा होईल आणि तो एक लाख रुपयांपेक्षा कमी नाही परंतु दोन लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेसही पात्र असेल :

परंतु, न्यायालयाला दोन लाख रुपयांपेक्षा अधिक द्रव्यदंड बसविता येईल व त्याची कारणे न्यायनिर्णयात नमूद करण्यात येतील. ]

**अपराध करण्याच्या प्रयत्नांसाठी शिक्षा.**

**२८.** जो कोणी या प्रकरणान्वये दंडनीय असा कोणताही अपराध करण्याचा प्रयत्न करील किंवा असा अपराध घडवून आणील आणि अशा प्रयत्नात, अपराध घडून येईल अशा रीतीने कोणतीही कृती करील तो अपराधासाठी उपबंधित केलेल्या शिक्षेस पात्र असेल.

**अपप्रेरणा आणि दंडनीय कट यांसाठी शिक्षा.**

**२९.** (१) जो कोणी, या प्रकरणान्वये शिक्षापात्र अपराध करण्यास अपप्रेरणा देईल किंवा जो अपराधाच्या दंडनीय कटातील एक पक्षकार असेल त्याला—मग अशा अपप्रेरणेच्या किंवा अशा दंडनीय कटाच्या परिणामी असा अपराध करण्यात आलेला असो वा नसो—आणि भारतीय दंड संहितेच्या (१८६० चा ४५) कलम ११६ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, त्या अपराधासाठी तरतूद केलेली शिक्षा करण्यात येईल.

(२) (क्) जी कोणतीही कृती भारतात केली तर अपराध ठरेल ; किंवा

(ख) भारतात केल्यास या प्रकरणान्वये शिक्षापात्र अपराध ठरण्यासाठी आवश्यक असलेली कायदेविषयक स्थिती किंवा तत्सदृश स्थिती असलेल्या अशा ठिकाणाच्या कायद्यानुसार अंमली औषधिद्रव्य किंवा मन:प्रभावी पदार्थाशी संबंधित असा अपराध असेल ;

अशी कृती, भारताबाहेर किंवा भारतात करण्यास जी व्यक्ती अपप्रेरणा देईल किंवा अशी कृती करण्यासंबंधीच्या दंडनीय कटात जी व्यक्ती भागीदार असेल ती व्यक्ती, या कलमाच्या अर्थानुसार अपराध करण्यास अपप्रेरणा देते किंवा अपराध करण्यासंबंधीच्या दंडनीय कटातील भागीदार असते.

**सिद्धता.**

**३०.** जर कोणत्याही व्यक्तीने [2][ कलमे १९, २४ आणि २७ क यांच्या कोणत्याही तरतुदींअन्वये शिक्षापात्र अपराध ठरेल आणि कोणतेही अंमली औषधिद्रव्य किंवा मन:प्रभावी पदार्थाच्या वाणिज्यिक प्रमाणाचा संबंध असलेला अपराध ठरेल अशी कोणतीही गोष्ट करण्याची सिद्धता केली किंवा ती करण्याचे वर्जिले तर आणि प्रकरणाच्या परिस्थितीवरून ] जर वाजवीरीत्या असे अनुमान काढता आले की, अपराध करण्याचा आपला उद्देश पार पाडण्याचा त्या व्यक्तीचा निर्धार होता, परंतु तिच्या इच्छाशक्तीच्या पलिकडील परिस्थितीमुळे तिला अटकाव झाला तर, तिने असा अपराध केला असता तर तिला कारावासाची जी शिक्षा झाली असती त्या किमान मुदतीच्या (कोणतीही असल्यास) एक-द्वितीयांशापेक्षा कमी नाही, परंतु तिने असा अपराध केला असता तर तिला जी कारावासाची शिक्षा झाली असती त्या कमाल मुदतीच्या निम्म्या मुदतीपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या सश्रम कारावासाची आणि उपरोक्त परिस्थितीत, तिला ज्या किमान (कोणतीही असल्यास) द्रव्यदंडाची शिक्षा झाली असती तिच्या निम्म्याहून कमी असणार नाही परंतु तिला सर्वसाधारणत: (म्हणजेच विशेष कारणांच्या अभावी) ज्या कमाल रकमेच्या द्रव्यदंडाची शिक्षा झाली असती त्याच्या निम्म्यापर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाचीही शिक्षा होईल :

---

[1] १९८९ चा अधिनियम २, कलम ८ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

[2] २००१ चा अधिनियम ९, कलम ११ अन्वये मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आले.

परंतु, न्यायालयाला, अधिक द्रव्यदंड बसविता येईल व त्यांची कारणे न्यायनिर्णयात नमूद करण्यात येतील.

[1][ **३१.** (१) या अधिनियमाअन्वये शिक्षापात्र अपराधांपैकी कोणताही अपराध करण्याबद्दल किंवा करण्याच्या प्रयत्नाबद्दल किंवा तो करण्यास अपप्रेरणा दिल्याबद्दल किंवा तो करण्यासाठी दंडनीय कट केल्याबद्दल दोष सिद्ध झालेली कोणतीही व्यक्ती, या अधिनियमान्वये तेवढ्याच प्रमाणातील शिक्षापात्र अपराध केल्याबद्दल, करण्याच्या प्रयत्नाबद्दल, करण्यास अपप्रेरणा दिल्याबद्दल किंवा तो करण्याचा दंडनीय कट केल्याबद्दल नंतर—दोष सिद्ध झाला असेल तर तिला त्या दुसऱ्या किंवा त्यानंतरच्या प्रत्येक अपराधाबद्दल कारावासाच्या कमाल मुदतीच्या निम्म्या मुदतीपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या सश्रम कारावासाची शिक्षा होईल आणि कमाल रकमेच्या द्रव्यदंडाच्या निम्म्या रकमेपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेसही ती पात्र ठरेल. **पूर्वीच्या दोष सिद्धीनंतरच्या अपराधांसाठी वाढीव शिक्षा.**

(२) जेव्हा पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेली व्यक्ती, किमान मुदतीच्या कारावासाच्या आणि किमान रकमेच्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल तेव्हा अशा व्यक्तीची किमान शिक्षा ही, कारावासाच्या किमान मुदतीच्या निम्म्या मुदतीचा कारावास आणि द्रव्यदंडाच्या किमान रकमेच्या निम्म्या रकमेचा द्रव्यदंड असेल :

परंतु, न्यायालयाला, ती व्यक्ती ज्या द्रव्यदंडास पात्र आहे त्या द्रव्यदंडापेक्षा अधिक द्रव्यदंड बसविता येईल व त्याची कारणे न्यायनिर्णयात नमूद करण्यात येतील.

(३) भारताबाहेर फौजदारी अधिकारिता असलेल्या सक्षम न्यायालयाकडून समरूप अशा कोणत्याही कायद्यान्वये एखाद्या व्यक्तीचा दोष सिद्ध झाला असेल तेव्हा अशा दोष सिद्धीच्या बाबतीत, पोटकलम (१) आणि (२) च्या प्रयोजनांसाठी, ती व्यक्ती जणू काही भारतातील न्यायालयाकडून तिचा दोष सिद्ध झाला असल्याप्रमाणे तिच्यासंबंधात कार्यवाही करण्यात येईल. ]

[2][ **३१ क.** (१) कलम ३१ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, ज्या व्यक्तीचा [3][ कलम १९, कलम २४, कलम २७ क अन्वये शिक्षापात्र असा कोणताही अपराध करण्याबद्दल किंवा अपराध करण्याच्या प्रयत्नाबद्दल किंवा तो करण्यास अपप्रेरणा दिल्याबद्दल किंवा तो करण्याच्या दंडनीय कटाबद्दल आणि कोणतेही अंमली औषधिद्रव्ये किंवा मन:प्रभावी पदार्थाच्या वाणिज्यिक प्रमाणाच्या बाबतीतील अपराध करण्याबद्दल ] दोष सिद्ध झाला आहे त्या व्यक्तीला जर त्यानंतर पुढील गोष्टींशी संबंधित अपराध करण्याबद्दल किंवा अपराध करण्याच्या प्रयत्नाबद्दल किंवा त्यास अपप्रेरणा देण्याबद्दल किंवा तो करण्याच्या दंडनीय कटाबद्दल दोष सिद्ध झाल्याचे ठरविण्यात आले तर, तिला मृत्युदंडाची शिक्षा होईल,— **मृत्युदंड.**

(क) खालील तक्त्याच्या स्तंभ (१) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेली औषधिद्रव्ये किंवा मन:प्रभावी पदार्थ यांचे उत्पादन, निर्मिती, ते जवळ बाळगणे, त्यांचे परिवहन, त्यांची भारतात आयात, भारतातून निर्यात किंवा वाहनांतरण या व्यवहारात गुंतलेले असणे आणि उक्त तक्त्यामध्ये असे प्रत्येक औषधिद्रव्य किंवा पदार्थ यांच्या नावासमोर स्तंभ (२) मध्ये दर्शविलेल्या परिमाणाइतके किंवा त्याहून अधिक प्रमाण त्यात अंतर्भूत असणे :—

**तक्ता**

| अंमली औषधिद्रव्ये किंवा मन:प्रभावी पदार्थ यांचा तपशील (१) | परिमाण (२) |
|---|---|
| (एक) अफू | १० कि. ग्रॅ. |
| (दोन) मॉर्फिन | १ कि. ग्रॅ. |
| (तीन) हेरॉईन | १ कि. ग्रॅ. |
| (चार) कोडीन | १ कि. ग्रॅ. |
| (पाच) थीबेन | १ कि. ग्रॅ. |
| (सहा) कोकेन | ५०० ग्रॅ. |
| (सात) हाशिश | २० कि. ग्रॅ. |

[1] २००१ चा अधिनियम ९, कलम १२ अन्वये मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आले.

[2] १९८९ चा अधिनियम २, कलम ९ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

[3] २००१ चा अधिनियम ९, कलम १३ (क) (एक) अन्वये मूळ मजकुराऐवजी समाविष्ट करण्यात आला.

| (१) | (२) |
|---|---|
| (आठ) वरीलपैकी कोणत्याही औषधिद्रव्याचे कोणत्याही उदासीन त्या पदार्थासह त्या किंवा त्याविना कोणतेही मिश्रण | [1][ वर नमूद केलेल्या अंमली औषधिद्रव्ये व मन:प्रभावी पदार्थाच्या समोर दिलेल्या व मिश्रणाचा भाग असणाऱ्या प्रमाणांपैकी कमी असलेले प्रमाण. ] |
| (नऊ) एलएसडी, एलएसडी-२५ (+) —एन, एन—डायएथिलायझरगॅमाईड (डी-लायसर्जिक ॲसिड डाय एथिल अमाईड) | ५०० ग्रॅ. |
| (दहा) टीएचसी (टेट्राहायड्रोफॅनाबायनॉल्स, पुढील आयसोमर्स ; ६ए (१०ए) ६ए (७), ७, ८, ९, १०, ९, (११) आणि त्याची स्टीरिओ केमिकल व्हेरिएटस् | ५०० ग्रॅ. |
| (अकरा) मेथाम्फेटामाईन (+) २— मेथिलअमाईन, १—फिनाईलप्रॉपेन .. | १,५०० ग्रॅ. |
| (बारा) मेथाक्वॉलोन २—(स्मेथिल—३—०—टॉलिल-४ (३ एच) –क्विनाझो-लिलोन) | १,५०० ग्रॅ. |
| (तेरा) ॲम्फिटामाईन (+) —२—ॲमिनो—१—फिनाईल प्रॉपेन .. | १,५०० ग्रॅ. |
| (चौदा) (नऊ) ते (तेरा) मध्ये उल्लेखिलेल्या मन:प्रभावी पदार्थाचे क्षार व सिद्ध पदार्थ | १,५०० ग्रॅ. |

(ख) खंड (क) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्यांपैकी कोणत्याही कृतीसाठी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष वित्तव्यवस्था करणे.

(२) भारताबाहेर किंवा फौजदारी अधिकारिता असलेल्या कोणत्याही सक्षम न्यायालयाकडून [2][ कलम १९, कलम २४ किंवा कलम २७ क यांच्या तरतुदींशी समरूप अशा कायद्याद्वारे आणि कोणतेही अंमली औषधिद्रव्य किंवा मन:प्रभावी पदार्थ्यांच्या वाणिज्यिक प्रमाणाच्या बाबतीत असलेल्या अपराधांसाठी ] कोणत्याही व्यक्तीचा दोष सिद्ध झाला असेल अशा बाबतीत, अशा दोष सिद्धी संबंधात, अशा व्यक्तीबाबत, पोटकलम (१) च्या प्रयोजनांसाठी, ती जणू काही भारतातील न्यायालयाकडून दोष सिद्ध झाला त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. ]

**ज्यासाठी कोणत्याही शिक्षेची तरतूद करण्यात आलेली नाही अशा अपराधासाठी शिक्षा.**

**३२.** जो कोणी, या अधिनियमाची कोणतीही तरतूद किंवा त्याअन्वये करण्यात आलेला कोणताही नियम किंवा आदेश अथवा देण्यात आलेले कोणतेही लायसन, परवाना वा प्राधिकारपत्र यांची कोणतीही शर्त यांचे; ज्यासाठी या प्रकरणात कोणत्याही शिक्षेची स्वतंत्रपणे तरतूद केलेली नाही असे व्यतिक्रमण करील, तो सहा महिन्यांपर्यंत असू शकेल अशा मुदतीच्या किंवा द्रव्यदंडांच्या किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

**या अधिनियमान्वये देण्यात आलेली कोणतीही शिक्षा निलंबित केली जाणार नाही किंवा त्यात सूट मिळणार नाही किंवा ती सौम्य केली जाणार नाही.**

[3][ **३२ क.** फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) किंवा त्या काळापुरता अंमलात असलेला अन्य कोणताही कायदा यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु कलम ३३ च्या तरतुदींच्या अधीनतेने, या अधिनियमान्वये (कलम २७ खेरीज करून) देण्यात आलेला कोणताही शिक्षादेश निलंबित केला जाणार नाही किंवा त्यात सूट मिळणार नाही वा तो सौम्य केला जाणार नाही.]

**किमान शिक्षेपेक्षा अधिक शिक्षा लादताना विचारात घ्यावयाच्या बाबी.**

[4][ **३२ ख.** जेव्हा, या अधिनियमाखाली केलेल्या कोणत्याही अपराधासाठी कारावासाची किमान मुदत किंवा द्रव्यदंडाची किमान रक्कम विहित केलेली असेल तेव्हा, न्यायालय, कारावासाच्या किमान कालावधीपेक्षा किंवा द्रव्यदंडाच्या रकमेपेक्षा अधिक शिक्षा लादण्यासाठी त्याला योग्य वाटेल अशा बाबींव्यतिरिक्त आणखी पुढील बाबी विचारात घेईल :—

[1] २००१ चा अधिनियम ९, कलम १३ (क) (दोन) द्वारे समाविष्ट करण्यात आले.

[2] वरील अधिनियमाच्या कलम १३ (ख) द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

[3] १९८९ चा अधिनियम २, कलम १० द्वारे समाविष्ट करण्यात आले.

[4] २००१ चा अधिनियम ९, कलम १४ द्वारे हे कलम समाविष्ट करण्यात आले.

(क्) अपराधी व्यक्तीकडून हिंसेचा किंवा शस्त्राचा वापर किंवा तसा वापर करण्याबाबतची धमकी ;

(ख्) अपराधी व्यक्तीने सरकारी पद धारण केले आहे आणि अपराध करताना त्या पदाचा फायदा घेतला आहे ही वस्तुस्थिती ;

(ग्) अपराधाचा अज्ञान व्यक्तीवर परिणाम झालेला आहे किंवा अपराध करण्यासाठी अज्ञान व्यक्तीचा वापर केलेला आहे ही वस्तुस्थिती ;

(घ्) शैक्षणिक संस्थेत किंवा सामाजिक सेवा सुविधेच्या ठिकाणी किंवा अशा संस्थेच्या किंवा विद्याशाखेच्या जवळपास किंवा शालेय मुले आणि विद्यार्थी शैक्षणिक, क्रीडा व सामाजिक कार्यक्रमांसाठी जेथे जातात अशा अन्य जागेच्या जवळपास अपराध घडला आहे ही वस्तुस्थिती ;

(ङ्) अपराधी व्यक्ती ही अपराध करण्यात गुंतलेल्या अशा संघटित आंतरराष्ट्रीय किंवा अन्य गुन्हेगारी गटातील आहे ही वस्तुस्थिती ; आणि

(च्) अपराधी व्यक्ती, अपराधामुळे सुकर झालेल्या अन्य अवैध कार्यात गुंतलेली आहे.]

**फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३६० आणि अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९५८ लागू करणे.**

**३३.** फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याचे कलम ३६० आणि अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९५८ (१९५८ चा २०) यामध्ये अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट, या अधिनियमाखालील अपराधाबद्दल जिचा दोष सिद्ध झाला आहे अशा व्यक्तीला, ती व्यक्ती १८ वर्षे वयाखालील असल्याखेरीज अथवा अशी व्यक्ती ज्याबद्दल जिचा दोष सिद्ध झाला आहे, तो अपराध, कलम २६ किंवा कलम २७ अन्वये शिक्षापात्र असल्याखेरीज लागू होणार नाही.

**अपराध करण्यापासून अप्रवृत्त राहण्यासाठी प्रतिभूती.**

**३४.** (१) जेव्हा कोणत्याही व्यक्तीचा, प्रकरण चारच्या कोणत्याही तरतुदींअन्वये शिक्षापात्र अपराधाबद्दल दोष सिद्ध झाला असेल आणि तिचा दोष सिद्ध ठरविणाऱ्या न्यायालयाच्या मते, या अधिनियमाखालील कोणताही अपराध करण्यापासून परावृत्त होण्यासाठी अशा व्यक्तीला बंधपत्र निष्पादित करून देण्यास भाग पाडणे आवश्यक असेल तर, अशा व्यक्तीला शिक्षादेश देतेवेळी न्यायालयाला, तीन वर्षांहून अधिक नसेल असा जेवढा कालावधी ठरवून देणे योग्य वाटेल त्या कालावधीत त्या व्यक्तीला या प्रकरणाखालील कोणताही अपराध करण्यापासून परावृत्त होण्यासाठी, प्रतिभूतीसह किंवा प्रतिभूतीविना तिच्या उत्पन्नांच्या साधनांच्या प्रमाणातील रकमेचे बंधपत्र निष्पादित करून देण्याचा आदेश देता येईल.

(२) हे बंधपत्र, केंद्र सरकारकडून विहित करण्यात येईल अशा नमुन्यात असेल आणि फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) ची तरतूद जेथवर ती लागू होणे शक्य असेल तेथवर, अशा बंधपत्राच्या सर्व बाबीसंबंधात, ते बंधपत्र म्हणजे जणू काही त्या संहितेच्या कलम १०६ अन्वये शांतता पाळण्यासाठी निष्पादित करावयाचा आदेश देण्यात आलेले बंधपत्र असल्याप्रमाणे, लागू होतील.

(३) अपिलावरून किंवा अन्यथा दोष सिद्ध झाल्याचे रद्द ठरवल्यास अशा तऱ्हेने निष्पादित करण्यात आलेले बंधपत्र शून्य ठरेल.

(४) या कलमाखालील आदेश, अपील न्यायालयाकडून किंवा पुनरीक्षण शक्तींचा वापर करीत असताना उच्च न्यायालयाकडून किंवा सत्र न्यायाधीशाकडूनही देता येतील.

**सदोष मानसिक अवस्था गृहित धरणे.**

**३५.** (१) या अधिनियमाखालील ज्या अपराधासाठी आरोपी सदोष मानसिक अवस्थेत असणे आवश्यक असते, त्याबद्दलच्या कोणत्याही खटल्यात, न्यायालय अशी मानसिक अवस्था गृहीत धरील, परंतु, त्या खटल्यात अपराध म्हणून आरोप करण्यात आलेल्या कृतीसंबंधात त्याची कोणतीही अशी मानसिक अवस्था नव्हती असे सिद्ध करणे, हा आरोपीचा बचाव असेल.

**स्पष्टीकरण.**---- या कलमात, " सदोष मानसिक अवस्था " यामध्ये उद्देश, हेतू व वस्तुस्थितीबद्दलची माहिती आणि वस्तुस्थितीवरील विश्वास किंवा तीवर विश्वास ठेवण्याचे संयुक्तिक कारण यांचा समावेश होतो.

(२) या कलमाच्या प्रयोजनार्थ, एखादी वस्तुस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल कोणतीही वाजवी शंका घेण्यासारखी नाही असे न्यायालयाला वाटेल तेव्हाच, ती वस्तुस्थिती सिद्ध झाली असल्याचे म्हणता येईल, केवळ तिचे अस्तित्व संभावतेच्या बलवत्तरतेमुळे स्थापित झाले असल्यामुळे तसे म्हणता येणार नाही.

[1] [ विशेष न्यायालये घटित करणे.

**३६.** (१) शासनाला, या अधिनियमाखालील अपराधांची शीघ्र संपरीक्षा करण्याच्या प्रयोजनार्थ, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा क्षेत्रांसाठी आवश्यक असतील तितकी विशेष न्यायालये घटित करता येतील.

(२) विशेष न्यायालयात एक न्यायाधीश असेल, ज्याची नियुक्ती, उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीच्या सहमतीने शासनाकडून करण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**—या पोटकलमात, " उच्च न्यायालय " याचा अर्थ, विशेष न्यायालयाचा सत्र न्यायाधीश किंवा अपर सत्र न्यायाधीश हा, असा न्यायाधीश म्हणून त्याची नियुक्ती होण्याच्या लगतपूर्वी जेथे कार्यरत होता, त्या राज्याचे उच्च न्यायालय, असा आहे.

(३) कोणतीही व्यक्ती, विशेष न्यायालयाच्या न्यायाधीशाच्या नियुक्तीसाठी, अशा नियुक्तीच्या लगतपूर्वी तो सत्र न्यायाधीश किंवा अपर सत्र न्यायाधीश असल्याशिवाय, अर्ह ठरणार नाही. ]

[2] [ विशेष न्यायालयांकडून संपरीक्षायोग्य अपराध.

**३६क.** (१) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

(क्) या अधिनियमाखालील जे अपराध तीन वर्षांपेक्षा अधिक कालावधीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र आहेत असे सर्व अपराध हे, ज्या क्षेत्रात अपराध करण्यात आला असेल त्यासाठी घटित करण्यात आलेल्या विशेष न्यायालयाकडून किंवा अशा क्षेत्रासाठी एकापेक्षा अधिक विशेष न्यायालये असतील अशा वेळी, शासनाकडून यासंबंधात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा त्यांच्यापैकी एका न्यायालयाकडून संपरीक्षायोग्य असतील ;

(ख्) जेव्हा, या अधिनियमाखालील अपराध केल्याचा आरोप असलेली किंवा तसा संशय असलेली व्यक्ती, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याच्या कलम १६७ च्या पोटकलम (२) किंवा पोटकलम (२क्) अन्वये दंडाधिकाऱ्यांपुढे पाठविण्यात येईल तेव्हा, असा दंडाधिकारी न्यायिक दंडाधिकारी असेल तेव्हा, त्याला उचित वाटेल अशा स्थानबद्धतेत एकूण पंधरा दिवसांपेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीसाठी आणि असा दंडाधिकारी हा कार्यकारी दंडाधिकारी असेल तेव्हा, एकूण सात दिवस इतक्या कालावधीसाठी त्याला अशा व्यक्तीच्या स्थानबद्धतेस प्राधिकृत करता येईल :

परंतु, विशेष न्यायालयाकडून संपरीक्षायोग्य असतील अशा प्रकरणांत अशा दंडाधिकाऱ्याला,—

(एक) जेव्हा अशी व्यक्ती पूर्वोक्ताप्रमाणे त्याच्याकडे पाठवण्यात आली असेल तेव्हा ; किंवा

(दोन) त्याच्याकडून प्राधिकृत करण्यात आलेला कालावधी संपताच किंवा संपण्यापूर्वी कोणत्याही वेळी,

अशा व्यक्तीची स्थानबद्धता अनावश्यक आहे, असे वाटत असेल त्यावेळी, तो अशा व्यक्तीला, अधिकारिता असलेल्या विशेष न्यायालयाकडे पाठविण्याचा आदेश देईल ;

(ग्) विशेष न्यायालयाला, खंड (ख्) अन्वये त्याच्याकडे पाठवण्यात आलेल्या व्यक्तींच्या संबंधात, एखाद्या प्रकरणाची संपरीक्षा करण्याची अधिकारिता असलेला दंडाधिकारी त्या कलमान्वये अशा प्रकरणात त्याच्याकडे पाठविण्यात आलेल्या आरोपी व्यक्तीच्या संबंधात, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) कलम १६७ अन्वये ज्या शक्ती वापरू शकेल, त्याच शक्ती वापरता येतील ;

(घ्) विशेष न्यायालयाला, या अधिनियमाखालील अपराध ठरणाऱ्या तथ्यांच्या पोलीस अहवालाचे अवलोकन केल्यानंतर, किंवा केंद्र सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या यासंबंधात प्राधिकृत करण्यात आलेल्या अधिकाऱ्याकडून तक्रार आल्यानंतर, आरोपीला त्याच्याकडे संपरीक्षेसाठी संप्रेषित केलेले नसतानाही त्या अपराधांची दखल घेता येईल.

(२) या अधिनियमाखालील अपराधाची संपरीक्षा करतेवेळी, विशेष न्यायालयाला, या अधिनियमाखालील अपराधाव्यतिरिक्त, ज्या अपराधाबद्दल आरोपींवर फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) अन्वये त्याच संपरीक्षेत दोषारोप ठेवता येणे शक्य असेल, अशा अन्य अपराधाचीही संपरीक्षा करता येईल.

---

[1] १९८९ चा अधिनियम २, कलम ११ द्वारे मूळ कलम ३६ ऐवजी समाविष्ट करण्यात आले.

[2] २००१ चा अधिनियम ९, कलम १५ द्वारे मूळ कलमाऐवजी दाखल करण्यात आले.

(३) या कलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याच्या कलम ४३९ खालील जामिनासंबंधातील उच्च न्यायालयाच्या विशेष शक्तींवर परिणाम होत असल्याचे समजले जाणार नाही आणि उच्च न्यायालयाला, त्या कलमाच्या पोट-कलम (१) च्या खंड (ख) खालील शक्तीसह अशा सर्व शक्तींचा वापर, त्या कलमातील " दंडाधिकारी " याच्या निर्देशात, कलम ३६ अन्वये घटित झालेल्या " विशेष न्यायालयाचा " निर्देशही जणू काही समाविष्ट असल्याप्रमाणे करता येईल.

(४) कलम १९ किंवा कलम २४ किंवा कलम २७ क अन्वये शिक्षापात्र अपराधांचा किंवा वाणिज्यिक प्रमाणाच्या बाबतीतील अपराधाचा आरोप ठेवण्यात आलेल्या व्यक्तीच्या संबंधात, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याच्या कलम १६७, पोटकलम (२) मध्ये जेथे जेथे त्याच्यासंदर्भात " नव्वद दिवस " असा उल्लेख आलेला आहे तेथे तेथे त्याचा अन्वयार्थ " एकशेऐंशी दिवस " असा लावण्यात येईल :

परंतु, जर एकशेऐंशी दिवसांच्या उक्त कालावधीत अन्वेषण पूर्ण करणे शक्य झाले नाही तर, विशेष न्यायालय, तपासाची प्रगती आणि उक्त एकशेऐंशी दिवसांच्या कालावधी नंतरही आरोपी व्यक्तीच्या स्थानबद्धतेबाबतची विनिर्दिष्ट कारणे दर्शविणाऱ्या सरकारी अभियोक्त्याच्या अहवालावरून, उक्त कालावधी एका वर्षापर्यंत वाढवू शकेल.

(५) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमा- अन्वये तीन वर्षांपेक्षा अधिक नाही अशा मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेल्या अपराधांची संक्षिप्त संपरीक्षा करता येईल. ]

**अपील व पुनरीक्षण.**

**३६ख.** उच्च न्यायालयाच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांमधील विशेष न्यायालय हे जणू काही, उच्च न्यायालयाच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांमधील प्रकरणांची संपरीक्षा करणारे सत्र न्यायालय असल्याप्रमाणे उच्च न्यायालयाला, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) ची प्रकरणे एकोणतीस व तीस याअन्वये त्यास प्रदान करण्यात आलेल्या सर्व शक्तींचा वापर, त्या जेथवर लागू असतील तेथवर, करता येईल.

**विशेष न्यायालयापुढील कार्यवाहींना संहिता लागू करणे.**

**३६ग.** या अधिनियमात अन्यथा तरतूद केली असेल ते खेरीजकरून, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) ची तरतूद (जामीन व बंधपत्रे यासंबंधातील तरतुदींसह) विशेष न्यायालयापुढील कार्यवाहींना लागू होतील आणि उक्त तरतुदींच्या प्रयोजनासाठी विशेष न्यायालय हे सत्र न्यायालय असल्याचे मानण्यात येईल आणि विशेष न्यायालयासमोर खटला चालवणारी व्यक्ती ही सरकारी अभियोक्ता असल्याचे समजण्यात येईल.

**संक्रमणकालीन तरतूद.**

[१] [ **३६घ.** (१) अंमली औषधिद्रव्ये आणि मन:प्रभावी पदार्थ (सुधारणा) अधिनियम, १९८८ (१९८९ चा २) याच्या प्रारंभी किंवा त्यानंतर या अधिनियमाखाली करण्यात आलेल्या व जो विशेष न्यायालयाकडून संपरीक्षायोग्य आहे अशा कोणत्याही अपराधाची संपरीक्षा कलम ३६ अन्वये विशेष न्यायालय घटित केले जाईपर्यंत, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, सत्र न्यायालयाकडून करण्यात येईल.

(२) अंमली औषधिद्रव्ये आणि मन:प्रभावी पदार्थ (सुधारणा) अधिनियम, १९८८ (१९८९ चा २) याच्या प्रारंभी किंवा त्यानंतर या अधिनियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही अपराधाच्या संबंधातील कोणतीही कार्यवाही सत्र न्यायालयाकडे प्रलंबित असेल त्याबाबतीत, पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, सत्र न्यायालयाकडून अशा कार्यवाहीची सुनावणी केली जाईल व त्याबाबत निकाल दिला जाईल :

परंतु, या पोटकलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे, पोटकलम (१) अन्वये सत्र न्यायालयाकडून दखल घेण्यात आलेले कोणतेही प्रकरण किंवा प्रकरणाचा वर्ग हस्तांतरित करण्याबाबत फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याच्या कलम ४०७ अन्वये उच्च न्यायालयाला असलेल्या अधिकारावर परिणाम होणार नाही. ]

**अपराध दखलपात्र व बिनजामिनी असणे.**

[२][ **३७.** (१) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

(क) या अधिनियमान्वये शिक्षापात्र असा प्रत्येक अपराध दखलपात्र असेल ;

(ख) [३] [ कलम १९ किंवा कलम २४ किंवा कलम २७क खालील अपराधांसाठी आणि तसेच वाणिज्यिक प्रमाणबाबत असलेल्या अपराधांसाठी शिक्षेस पात्र असलेल्या कोणत्याही आरोपी व्यक्तीला,— ]

---

[१] २००१ चा अधिनियम ९, कलम १६ अन्वये मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आले.

[२] १९८९ चा अधिनियम २, कलम १२ द्वारे मूळ कलम ३७ ऐवजी दाखल करण्यात आले.

[३] २००१ चा अधिनियम ९, कलम १७ अन्वये मजकुराऐवजी दाखल करण्यात आले.

(एक) अशा मुक्ततेच्या अर्जाला विरोध करण्याची सरकारी अभियोक्त्याला संधी देण्यात आल्याखेरीज, आणि

(दोन) सरकारी अभियोक्त्याने अर्जाला विरोध केला असेल तेव्हा, ती व्यक्ती अशा अपराधाबद्दल दोषी नाही असे मानण्यास वाजवी कारणे असल्याची आणि जामिनावर असताना ती कोणताही अपराध करणार नाही अशी न्यायालयाची खात्री असल्याखेरीज ;

जामिनावर किंवा तिच्या स्वतःच्या बंधपत्रावर सोडले जाणार नाही.

(२) पोटकलम (१) च्या खंड (ख) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या जामीन देण्यावरील मर्यादा या, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) किंवा त्या काळापुरता अंमलात असलेला अन्य कोणताही कायदा यामधील जामीन देण्यासंबंधीच्या मर्यादांव्यतिरिक्त जादा मर्यादा असतील. ]

**कंपन्यांकडून अपराध.**

**३८.** (१) जेव्हा प्रकरण चार खालील अपराध एखाद्या कंपनीकडून करण्यात आला असेल तेव्हा अपराध करण्यात आला त्यावेळी, कंपनीच्या व्यवसाय चालनाबाबत कंपनीचा प्रभार असलेली आणि कंपनीस जबाबदार असलेली प्रत्येक व्यक्ती तसेच, ती कंपनीही अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि तिच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व त्यानुसार शिक्षा केली जाण्यास पात्र असेल :

परंतु, या पोटकलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे अशी कोणतीही व्यक्ती, जर तिने अपराध तिच्या नकळत करण्यात आला किंवा असा अपराध घडण्यास प्रतिबंध करण्यासाठी तिने यथायोग्य तत्परता दर्शविली होती असे सिद्ध केले तर, कोणत्याही शिक्षेस पात्र ठरणार नाही.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, प्रकरण चार खालील कोणताही अपराध कंपनीकडून करण्यात आला असेल आणि तो अपराध, कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी याच्या संमतीने किंवा मूक संमतीने करण्यात आला आहे किंवा त्यांच्याकडून झालेल्या कोणत्याही हयगयीमुळे झालेला आहे असे सिद्ध झाले असेल तर, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्याच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास आणि तदनुसार शिक्षेस तो पात्र असेल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(क) " कंपनी " याचा अर्थ, कोणताही निगम निकाय, असा आहे आणि त्यामध्ये पेढी किंवा व्यक्तींचा इतर अधिसंघ यांचा समावेश होतो ; आणि

(ख) पेढीच्या संबंधातील " संचालक " याचा अर्थ, पेढीतील भागीदार, असा आहे.

**विवक्षित अपराध्यांना परिवीक्षेवर सोडण्याची न्यायालयाची शक्ती.**

**३९.** (१) जेव्हा एखादी व्यसनी व्यक्ती कलम २७ अन्वये शिक्षापात्र अपराधाबद्दल [१][ किंवा कोणत्याही अंमली औषधिद्रव्याचा किंवा मनःप्रभावी पदार्थाच्या अल्प प्रमाणाशी संबंधित असलेल्या अपराधाबद्दल ] दोषी असल्याचे आढळून येईल आणि ज्या न्यायालयाकडून ती दोषी ठरविण्यात आली असेल त्याच्या मते, अपराधी व्यक्तीचे वय, चारित्र्य, पूर्ववृत्त किंवा शारीरिक वा मानसिक अवस्था लक्षात घेता, तसे करणे उचित असेल तेव्हा, या अधिनियमात किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, न्यायालयाला, तिला कोणत्याही कारावासाचा शिक्षादेश तात्काळ देण्याऐवजी, तिच्या अनुमतीने, असे निदेशित करता येईल की, शासनाकडून चालविल्या जाणाऱ्या वा मान्यताप्राप्त अशा रुग्णालयातून किंवा संस्थेतून अंमली पदार्थाचे निर्विषीकरण करण्यासाठी किंवा आसक्ती घालवण्यासाठी वैद्यकीय उपचार घेण्याकरिता तिला सोडण्यात यावे आणि केंद्र सरकारकडून विहित करण्यात आलेल्या नमुन्यातील प्रतिभूतींसह किंवा प्रतिभूतीविना तिच्याकडून बंधपत्र करून घेतल्यावर तिने एक वर्षापेक्षा अधिक नसेल अशा कालावधीत न्यायालयापुढे हजर व्हावे आणि तिच्या वैद्यकीय उपचारासंबंधीचा अहवाल सादर करावा, तसेच दरम्यानच्या कालावधीत प्रकरण चार खालील कोणताही अपराध करण्यापासून अप्रवृत्त रहावे.

(२) पोटकलम (१) अन्वये सादर करण्यात आलेल्या वैद्यकीय उपचाराच्या परिणामासंबंधीचा अहवाल विचारात घेतल्यानंतर न्यायालयाला जर असे दिसून आले की, तसे करणे उचित आहे तर, न्यायालयाला विनिर्दिष्ट करणे योग्य वाटेल अशा तीन वर्षांहून अधिक नसेल इतक्या कालावधीत

---

[१] २००१ चा अधिनियम ९, कलम १८ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

प्रकरण चार खालील कोणताही अपराध करण्यापासून अप्रवृत्त रहाण्यासाठी किंवा तशा प्रकारे तिला अप्रवृत्त राहता आले नाही तर, न्यायालयापुढे हजर होऊन अशा कालावधीत बोलावणे आल्यास शिक्षादेश स्वीकारण्यासाठी, केंद्र सरकारकडून विहित करण्यात आलेल्या नमुन्यात, प्रतिभूतीसह किंवा प्रतिभूतींविना, बंधपत्र केल्यानंतर तिला योग्य ती समज देऊन न्यायालयाला तिला सोडून देण्याचा निदेश देता येईल.

विवक्षित अपराध्यांची नावे, व्यवसायांची ठिकाणे इ. प्रकाशित करण्याची न्यायालयाची शक्ती.

**४०.** (१) जेव्हा कोणत्याही व्यक्तीचा कलम १५ ते कलम २५ (दोन्ही धरून) कलम २८, कलम २९ किंवा कलम ३० अन्वये शिक्षापात्र अपराधांपैकी कोणत्याही अपराधाबद्दल दोष सिद्ध झाल्याचे ठरविण्यात आले असेल तेव्हा, त्या व्यक्तीचा दोष सिद्ध झाल्याचे ठरविणारे न्यायालय, अशा व्यक्तीचे नाव आणि व्यवसायाचे किंवा वास्तव्याचे ठिकाण, व्यतिक्रमणाचे स्वरूप, त्या व्यक्तीचा अशा तऱ्हेने दोष सिद्ध झाला आहे ही वस्तुस्थिती आणि प्रकरणाच्या परिस्थितीत न्यायालयाला उचित वाटेल असा इतर तपशील, न्यायालय निदेशित करील अशा वर्तमानपत्रांमध्ये किंवा अशा रीतीने, त्या व्यक्तीच्या खर्चाने, प्रकाशित करवून घेण्यास सक्षम असेल.

(२) पोटकलम (१) खालील कोणतेही प्रकाशन, न्यायालयाच्या आदेशाविरुद्ध अपील दाखल करण्याचा कालावधी, कोणतेही अपील दाखल न करता संपेपर्यंत अथवा असे अपील दाखल करण्यात आल्यावर, ते निकालात काढले जाईपर्यंत, केले जाणार नाही.

(३) पोटकलम (१) खालील कोणत्याही प्रकाशनाचा खर्च, तो जणू काही न्यायालयाकडून बसविण्यात आलेला द्रव्यदंडच असल्याप्रमाणे दोष सिद्ध झालेल्या व्यक्तीकडून वसुलीयोग्य असेल.

## प्रकरण पाच

## कार्यपद्धती

अधिपत्र आणि प्राधिकारपत्र काढण्याची शक्ती.

[1][ **४१.** (१) महानगर दंडाधिकारी किंवा प्रथम वर्ग दंडाधिकारी किंवा राज्य शासनाकडून यासंबंधात विशेषरीत्या शक्ती प्रदान करण्यात आलेला कोणताही द्वितीय वर्ग दंडाधिकारी यांना, ज्या व्यक्तीने या अधिनियमाअन्वये शिक्षापात्र असा कोणताही अपराध केला आहे असे मानण्यास त्यांच्याकडे पुरेसे कारण असेल, अशा कोणत्याही व्यक्तीच्या अटकेसाठी अथवा जेथे, या अधिनियमाअन्वये शिक्षापात्र असा कोणताही अपराध, ज्या अंमली औषधिद्रव्याच्या किंवा मनःप्रभावी पदार्थाच्या, किंवा नियंत्रित पदार्थाच्या संबंधात करण्यात आला आहे असे अंमली औषधिद्रव्य किंवा मनःप्रभावी पदार्थ किंवा नियंत्रित पदार्थ किंवा असा अपराध करण्यात आला असल्याचा पुरावा देऊ शकेल असा कोणताही दस्तऐवज वा वस्तू किंवा कोणतीही बेकायदेशीररीत्या संपादित केलेली संपत्ती किंवा या अधिनियमाच्या प्रकरण पाच क अन्वये ताब्यात घेण्यास, गोठविण्यास किंवा सरकारजमा करण्यास पात्र आहे अशी कोणतीही बेकायदेशीररीत्या संपादित केलेली संपत्ती कब्जात ठेवण्यात आली असल्याचा पुरावा देऊ शकेल, असा कोणताही दस्तऐवज किंवा अन्य वस्तू ठेवण्यात किंवा लपवण्यात आली आहे, असे मानण्यास पुरेसे कारण असेल, अशी कोणतीही इमारत, वाहन किंवा ठिकाण यांची दिवसा किंवा रात्री झडती घेण्यासाठी, अधिपत्र काढता येईल.

(२) केंद्र सरकारकडून, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे यासंबंधात अधिकार प्रदान करण्यात आलेला असा, केंद्रीय उत्पादनशुल्क, अंमली औषधिद्रव्ये, सीमाशुल्क, महसूल गुप्तवार्ता या विभागांचा तसेच निमलष्करी बल किंवा, सशस्त्र बलाचा किंवा केंद्र सरकारच्या अन्य कोणत्याही विभागाचा कोणताही राजपत्रित दर्जाचा अधिकारी, अथवा राज्य शासनाच्या, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे यासंबंधात अधिकार प्रदान करण्यात आलेला असा, राज्य शासनाच्या महसूल, औषधिद्रव्य नियंत्रण, उत्पादनशुल्क, पोलीस या विभागांचा किंवा अन्य कोणत्याही विभागाचा अधिकारी याला, व्यक्तिगत माहितीवरून किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीकडून देण्यात आलेल्या आणि लेखी घेतलेल्या माहितीवरून असे मानण्यास जर कारण असेल की, एखाद्या व्यक्तीने, या अधिनियमाखालील शिक्षापात्र अपराध केला आहे अथवा ज्यासंबंधात या अधिनियमाअन्वये शिक्षापात्र अपराध करण्यात आला आहे, असे कोणतेही अंमली औषधिद्रव्य किंवा मनःप्रभावी पदार्थ किंवा नियंत्रित पदार्थ अथवा असा अपराध करण्यात आला असल्याचे सिद्ध करणारा पुरावा ज्याद्वारे सादर करता येईल असा कोणताही दस्तऐवज किंवा अन्य वस्तू, किंवा कोणतीही बेकायदेशीररीत्या संपादित केलेली संपत्ती किंवा या अधिनियमाच्या प्रकरण पाच क अन्वये ताब्यात घेण्यास, गोठविण्यास किंवा सरकारजमा करण्यास पात्र आहे अशी कोणतीही बेकायदेशीररीत्या संपादित केलेली संपत्ती कब्जात ठेवण्यात आली असल्याचा पुरावा देऊ शकेल असा कोणताही दस्तऐवज किंवा अन्य वस्तू, कोणतीही इमारत, वाहन किंवा ठिकाण यामध्ये ठेवण्यात आली आहे किंवा लपवण्यात आली आहे तर त्याला, त्याच्यापेक्षा दुय्यम, परंतु चपराशी, शिपाई किंवा कॉन्स्टेबल यांपेक्षा वरिष्ठ असेल अशा

[1] २००१ चा अधिनियम ९, कलम १९ द्वारे मूळ कलमाऐवजी समाविष्ट करण्यात आले.

कोणत्याही अधिकाऱ्याला अशा व्यक्तीस अटक करण्यास किंवा इमारत, वाहन किंवा ठिकाण यांची, दिवसा किंवा रात्री झडती घेण्यास प्राधिकृत करता येईल अथवा स्वत: त्या व्यक्तीला अटक करता येईल किंवा इमारत, वाहन वा ठिकाण यांची झडती घेता येईल.

(३) पोटकलम (१) खालील अधिपत्र ज्याच्या नावे संबोधित करण्यात आले असेल तो अधिकारी आणि अटक किंवा झडती प्राधिकृत करणारा अधिकारी अथवा पोटकलम (२) अन्वये तशाप्रकारे प्राधिकृत करण्यात आलेला अधिकारी यांना कलम ४२ अन्वये कार्य करणाऱ्या अधिकाऱ्याचे सर्व अधिकार असतील.

**अधिपत्र किंवा प्राधिकारपत्र या विना प्रवेश करण्याचा, झडती घेण्याचा, ताब्यात घेण्याचा व अटक करण्याचा अधिकार.**

४२. (१) केंद्र सरकारकडून, सर्वसाधारण व विशेष आदेशाद्वारे यासंबंधात अधिकार प्रदान करण्यात आलेला असा, केंद्रीय उत्पादनशुल्क, अंमली औषधिद्रव्ये, सीमाशुल्क, महसूल गुप्तवार्ता या विभागांचा तसेच, निमलष्करी बल किंवा सशस्त्र बलाचा अथवा केंद्र सरकारच्या अन्य कोणत्याही विभागाचा किंवा (चपराशी, शिपाई किंवा कॉन्स्टेबल यांच्यापेक्षा वरिष्ठ दर्जाचा) कोणताही अधिकारी अथवा राज्य शासनाच्या सर्वसाधारण वा विशेष आदेशाद्वारे यासंबंधात अधिकार प्रदान करण्यात आलेला असा, राज्य शासनाच्या महसूल, औषधिद्रव्ये नियंत्रण, उत्पादन शुल्क, पोलीस किंवा अन्य कोणत्याही विभागाचा (चपराशी, शिपाई किंवा कॉन्स्टेबल यांच्यापेक्षा वरिष्ठ दर्जाचा) अधिकारी याला व्यक्तिगत माहिती किंवा कोणत्याही व्यक्तीकडून देण्यात आलेली आणि लिहून घेतलेली माहिती याद्वारे असे मानण्यास कारण असेल की, या अधिनियमाखालील शिक्षापात्र अपराध ज्यासंबंधात करण्यात आला आहे असे कोणतेही अंमली औषधिद्रव्य किंवा मन:प्रभावी पदार्थ किंवा नियंत्रित पदार्थ असा अपराध घडण्याचा पुरावा ज्याद्वारे सादर करता येईल असा कोणताही दस्तऐवज वा अन्य वस्तू किंवा कोणतीही बेकायदेशीररीत्या संपादित केलेली संपत्ती किंवा या अधिनियमाच्या प्रकरण पाच क अन्वये ताब्यात घेण्यास, गोठविण्यास किंवा सरकारजमा करण्यास पात्र आहे अशी कोणतीही बेकायदेशीररीत्या संपादित केलेली संपत्ती कब्जात ठेवण्यात आली असल्याचा पुरावा देऊ शकेल असा कोणताही दस्तऐवज किंवा अन्य वस्तू, कोणतीही इमारत, वाहन किंवा ठिकाण येथे ठेवण्यात किंवा लपवण्यात आली आहे तर, सूर्योदय वा सूर्यास्त या दरम्यान त्याला,—

(क) अशी कोणतीही इमारत, वाहन किंवा ठिकाण यामध्ये प्रवेश करता येईल आणि झडती घेता येईल ;

(ख) प्रतिकार झाल्यास, कोणतेही दार फोडून उघडता येईल आणि असा प्रवेश करण्यातील कोणताही अडथळा दूर करता येईल ;

(ग) असे कोणतेही औषधिद्रव्य किंवा पदार्थ, आणि त्याच्या निर्मितीमध्ये वापरण्यात आलेली सर्व सामग्री, आणि या अधिनियमान्वये जी जप्तीपात्र असल्याचे मानण्यास त्याला कारण असेल अशी कोणतीही इतर वस्तू आणि कोणतेही जनावर किंवा वाहन आणि असे औषधिद्रव्ये किंवा पदार्थ यासंबंधात या अधिनियमाअन्वये शिक्षापात्र असा कोणताही अपराध केल्याचा पुरावा, ठरू शकेल, किंवा या अधिनियमाच्या प्रकरण पाच क अन्वये ताब्यात घेण्यास, गोठविण्यास किंवा सरकारजमा करण्यास पात्र आहे अशी कोणतीही बेकायदेशीररीत्या संपादित केलेली संपत्ती कब्जात ठेवण्यात आली असल्याचा पुरावा ठरू शकेल असे मानण्यास त्याला कारण असेल, असा कोणताही दस्तऐवज वा अन्य वस्तू ताब्यात घेता येईल ; आणि

(घ) या अधिनियमान्वये जिच्याकडून कोणताही अपराध करण्यात आला आहे असे मानण्यात त्याला कारण असेल, अशा कोणत्याही व्यक्तीला अटकावून ठेवता येईल आणि तिची झडती घेता येईल आणि त्याला उचित वाटल्यास, अटक करता येईल :

परंतु, पुरावा लपविण्यासाठी किंवा अपराध्याच्या पलायनासाठी संधी मिळू न देता, झडती अधिपत्र किंवा प्राधिकारपत्र मिळवणे अशक्य आहे असे मानण्यास अशा अधिकाऱ्याला कारण असेल तेव्हा, त्याला असे मानण्याची कारणे नमूद करून, सूर्यास्त व सूर्योदय या दरम्यान कोणत्याही वेळी अशी इमारत, वाहन किंवा ठिकाण यामध्ये प्रवेश करता येईल आणि झडती घेता येईल.

(२) जेव्हा एखादा अधिकारी पोटकलम (१) अन्वये कोणतीही माहिती लिहून घेईल किंवा त्या पोटकलमाच्या परंतुकान्वये तसे मानण्या मागील कारणे नमूद करील तेव्हा, तो त्याची प्रत आपल्या निकटच्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडे बाहात्तर तासांच्या आत पाठवून देईल.

४३. कलम ४२ मध्ये उल्लेखिलेल्या विभागांपैकी कोणत्याही विभागाच्या अधिकाऱ्याला,—— **सार्वजनिक ठिकाणी सक्तीने ताब्यात घेण्याचा व अटक करण्याचा अधिकार.**

(क्) ज्यासंबंधात याअधिनियमाअन्वये शिक्षापात्र अपराध करण्यात आला आहे असे मानण्यास त्याला कारण असेल, असे कोणतेही अमंली औषधिद्रव्य किंवा मनःप्रभावी पदार्थ किंवा नियंत्रित पदार्थ आणि असे औषधिद्रव्य किंवा पदार्थ याबरोबरच, या अधिनियमान्वये जप्तीसपात्र असे कोणतेही जनावर किंवा वाहन किंवा वस्तू आणि या अधिनियमा अन्वये शिक्षापात्र अपराध करण्यात आला असल्याचा पुरावा ज्याद्वारे सादर करता येईल किंवा या अधिनियमाच्या प्रकरण पाच क अन्वये ताब्यात घेण्यास, गोठविण्यास किंवा सरकारजमा करण्यास पात्र आहे अशी कोणतीही बेकायदेशीररीत्या संपादित केलेली संपत्ती कब्जात ठेवण्यात आली असल्याचा पुरावा देऊ शकेल, असे मानण्यास त्याला कारण असेल, असा कोणताही दस्तऐवज वा इतर वस्तू, कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी किंवा मार्गक्रमणावस्थेत, सक्तीने ताब्यात घेता येईल ;

(ख्) ज्या व्यक्तीने या अधिनियमा अन्वये शिक्षापात्र अपराध केला आहे असे मानण्यास त्याला पुरेसे कारण आहे अशा कोणत्याही व्यक्तीला अटकावून ठेवता येईल आणि तिची झडती घेता येईल आणि कोणतेही अंमली औषधिद्रव्य किंवा मनःप्रभावी पदार्थ किंवा नियंत्रित पदार्थ अशा व्यक्तीच्या कब्जात असेल आणि असा कब्जा त्याला बेकायदेशीर वाटत असेल तर, तिला आणि तिच्या सहवासातील अन्य कोणत्याही व्यक्तीला अटक करता येईल.

**स्पष्टीकरण.—** या कलमाच्या प्रयोजनांसाठी, " सार्वजनिक ठिकाण " या शब्दप्रयोगास, कोणतेही सार्वजनिक वाहन, उपाहारगृह, दुकान किंवा जनतेकडून वापरले जाण्याचा उद्देश असलेले किंवा तिला शिरकाव असलेले अन्य कोणतेही ठिकाण, यांचा समावेश होतो. ]

४४. कलमे ४१, ४२ व ४३ यांच्या तरतुदी, शक्य तेथवर, प्रकरण चार अन्वये शिक्षापात्र असलेल्या आणि कोका वनस्पती, अफूचे झाड आणि कॅनाबिस वनस्पती यांच्याशी संबंधित अशा अपराधांना लागू होतील आणि या प्रयोजनांसाठी, त्या कलमांतील अंमली औषधिद्रव्ये किंवा मनःप्रभावी पदार्थ [1][ किंवा नियंत्रित पदार्थ ] याचा निर्देशाचा अर्थ, कोका वनस्पती, अफूचे झाड आणि कॅनाबिस वनस्पती यांच्याही निर्देशाचा अंतर्भाव असल्याप्रमाणे समजण्यात येईल. **कोका वनस्पती, अफूचे झाड आणि कॅनाबिस वनस्पती यांच्याशी संबंधित अपराधांबाबत प्रवेश करण्याचा, झडती घेण्याचा, सक्तीने ताब्यात घेण्याचा आणि अटक करण्याचा अधिकार.**

४५. या अधिनियमान्वये जप्तीपात्र असा कोणताही माल (उभ्या पिकासह) सक्तीने ताब्यात घेणे व्यवहार्य नसेल अशा बाबतीत, कलम ४२ अन्वये यथोचितरीत्या प्राधिकृत करण्यात आलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याला, मालाच्या मालकावर किंवा त्याचा कब्जा असलेल्या कोणत्याही व्यक्तींवर असा आदेश बजावता येईल की, ती अशा अधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीखेरीज, तो माल हलवणार नाही, देऊन टाकणार नाही किंवा त्याबाबत अन्य व्यवहार करणार नाही. **जप्तीपात्र माल सक्तीने ताब्यात घेणे व्यवहार्य नसेल त्याबाबत कार्यपद्धती.**

४६. प्रत्येक जमीनधारक, कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला किंवा कलम ४२ मध्ये उल्लेखिलेल्या विभागांपैकी कोणत्याही विभागाच्या अधिकाऱ्याला, त्याच्या जमिनीत बेकायदेशीररीत्या लागवड करण्यात आलेली सर्व अफूची झाडे, कॅनाबिस वनस्पती आणि कोका वनस्पती यांची माहिती देईल आणि अशी माहिती देण्यात जाणीवपूर्वक हयगय करणारा असा प्रत्येक जमीनधारक शिक्षेस पात्र असेल. **बेकायदेशीर लागवडीबद्दल माहिती देण्याचे जमीनधारकाचे कर्तव्य.**

४७. शासनाचा प्रत्येक अधिकारी आणि प्रत्येक पंच, सरपंच तसेच कोणत्याही प्रकारचा अन्य ग्राम अधिकारी, कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला किंवा कलम ४२ मध्ये उल्लेखिलेल्या विभागांपैकी कोणत्याही विभागाच्या अधिकाऱ्याला, एखाद्या जमिनीवर अफूची झाडे, कॅनाबिस वनस्पती किंवा कोका वनस्पती यांची बेकायदेशीर लागवड करण्यात आली आहे याविषयी त्याला जेव्हा माहीत होईल तेव्हा तत्काळ ती माहिती पुरवील आणि अशी माहिती देण्यात हयगय करणारा असा शासनाचा प्रत्येक अधिकारी, पंच, सरपंच आणि इतर ग्राम अधिकारी शिक्षेस पात्र असेल. **बेकायदेशीर लागवडीची माहिती पुरविण्याचे विवक्षित अधिकाऱ्यांचे कर्तव्य.**

---

[1] २००१ चा अधिनियम ९, कलम २० अन्वये समाविष्ट करण्यात आले.

बेकायदेशीर लागवड केलेल्या पिकावर टाच आणण्याचा अधिकार.

**४८.** कोणताही महानगर दंडाधिकारी, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी किंवा राज्य शासनाकडून यासंबंधात विशेषरीत्या अधिकार प्रदान करण्यात आलेला कोणताही दंडाधिकारी [१][ किंवा कलम ४२ अन्वये अधिकार प्रदान करण्यात आलेला राजपत्रित दर्जाचा कोणताही अधिकारी ], त्याला ज्या कोणत्याही अफूच्या झाडांची, कॅनाबिस वनस्पतीची किंवा कोका वनस्पतीची बेकायदेशीररीत्या लागवड करण्यात आली आहे असे मानण्यास संयुक्तिक कारण असेल, त्यांच्यावर टाच आणण्याचा आदेश देऊ शकेल आणि तसे करताना, त्याला योग्य वाटेल असा अन्य आदेशही (पीक नष्ट करण्याच्या आदेशासह) देता येईल.

वाहन थांबवण्याचा आणि झडती घेण्याचा अधिकार.

**४९.** कलम ४२ अन्वये प्राधिकृत करण्यात आलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याला, असा संशय घेण्यास जेव्हा वाजवी कारण असेल की, कोणतेही वाहन किंवा जनावर हे, कोणतेही अंमली औषधिद्रव्य वा मनःप्रभावी पदार्थ [२][ किंवा नियंत्रित पदार्थ ] यांच्या परिवहनासाठी वापरले जात आहे किंवा वापरले जाणार आहे आणि त्यासंबंधात, या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीचे कोणत्याही वेळी व्यतिक्रमण झाले आहे, किंवा होत आहे वा होणार आहे असा संशय असेल त्याबाबतीत, त्याला असे कोणतेही जनावर किंवा वाहन थांबवता येईल अथवा विमानाच्या बाबतीत ते उतरवण्यास भाग पाडता येईल, आणि—

(क) वाहन किंवा त्याचा कोणताही भाग धुंडाळता येईल किंवा त्याची झडती घेता येईल ;

(ख) जनावरावर लादलेल्या किंवा वाहनात असलेल्या कोणत्याही मालाची तपासणी करता येईल आणि झडती घेता येईल ;

(ग) जनावर किंवा वाहन थांबवणे आवश्यक झाले तर, त्याला ते थांबवण्यासाठी सर्व वैध मार्गांचा अवलंब करता येईल आणि जेथे असे मार्ग निष्फळ ठरतील तेथे, जनावरावर किंवा वाहनावर गोळीबार करता येईल.

व्यक्तींची झडती ज्यानुसार घेता येईल त्या शर्ती.

**५०.** (१) कलम ४२ अन्वये यथोचितरीत्या प्राधिकृत करण्यात आलेला कोणताही अधिकारी कोणत्याही व्यक्तीची कलम ४१, कलम ४२ किंवा कलम ४३ अन्वये झडती घेणार असेल अशा वेळी तो, त्या व्यक्तीने तसे फर्मावले तर, त्या व्यक्तीला, अनावश्यक विलंब न करता, कलम ४२ मध्ये उल्लेखिलेल्या विभागांपैकी कोणत्याही विभागाच्या निकटतम राजपत्रित अधिकाऱ्याकडे किंवा निकटतम दंडाधिकाऱ्याकडे नेईल.

(२) अशा रीतीने फर्मावण्यात आले असेल तर, पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या राजपत्रित अधिकाऱ्यापुढे किंवा दंडाधिकाऱ्यापुढे त्या व्यक्तीला आणले जाईपर्यंत अधिकारी त्या व्यक्तीला स्थानबद्ध करू शकेल.

(३) ज्याच्यासमोर अशी कोणतीही व्यक्ती आणण्यात आली असेल असा कोणताही राजपत्रित अधिकारी किंवा दंडाधिकारी, त्याला झडतीसाठी तसे कोणतेही वाजवी कारण आढळले नाही तर, तत्काळ त्या व्यक्तीला मोकळे करील, परंतु अन्यथा झडती घेण्यात यावी असा निदेश देईल.

(४) कोणत्याही महिलेची अन्य महिलेखेरीज इतर कोणाकडूनही झडती घेतली जाणार नाही.

[३][ (५) कलम ४२ अन्वये योग्यरीतीने प्राधिकृत करण्यात आलेल्या अधिकाऱ्याला, जेव्हा असे मानण्यास पुरेसे कारण असेल की, झडती घ्यावयाच्या व्यक्तीचा कोणत्याही अंमली औषधिद्रव्याचा किंवा मनःप्रभावी पदार्थाचा किंवा नियंत्रित पदार्थ किंवा वस्तू किंवा दस्तऐवज या बाबतचा कब्जा काढून घेतल्याशिवाय त्या व्यक्तीची झडती घेण्याची शक्यता नसल्यामुळे, त्या व्यक्तीची झडती घेण्यासाठी तिला निकटतम राजपत्रित अधिकाऱ्याकडे किंवा दंडाधिकाऱ्याकडे आणणे शक्य नाही तेव्हा, त्याला, निकटतम राजपत्रित अधिकारी किंवा दंडाधिकाऱ्याकडे अशा व्यक्तीला घेऊन जाण्याऐवजी, फौजदारी प्रकिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याच्या कलम १०० खाली तरतूद केल्याप्रमाणे त्या व्यक्तीची झडती घेता येईल.

(६) पोटकलम (५) अन्वये झडती घेतल्यानंतर, तो अधिकारी, अशी झडती आवश्यक ठरण्यासाठी त्याची जी समजूत झाली तिची कारणे नमूद करील आणि त्याची एक प्रत आपल्या निकटतम वरिष्ठ अधिकाऱ्याकडे बहात्तर तासांच्या आत पाठवून देईल. ]

---

[१] १९८९ चा अधिनियम २, कलम १३ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

[२] २००१ चा अधिनियम ९, कलम २१ अन्वये समाविष्ट करण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २२ अन्वये समाविष्ट करण्यात आले.

[1][ **५०क.** कलम ४, पोटकलम (३) अन्वये घटित केलेल्या अंमली पदार्थ नियंत्रण केंद्राचा महासंचालक किंवा याबाबत त्याने प्राधिकृत केलेला कोणताही अन्य अधिकारी, या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी,— **नियंत्रित सुपूर्दगी करण्याची शक्ती.**

(क) भारतातील कोणत्याही इष्ट स्थळी ;

(ख) असा माल ज्याच्याकडे पाठवावयचा आहे त्या विदेशातील सक्षम प्राधिकरणाशी विचारविनिमय करून, विहित करण्यात येईल अशा रीतीने, त्या विदेशात,

पाठवावयाच्या कोणत्याही मालाची नियंत्रित सुपूर्दगी करील. ]

**५१.** फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) च्या तरतुदी, ते या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील तेथवर, या अधिनियमान्वये काढण्यात आलेली सर्व अधिपत्रे आणि करण्यात आलेली अटक, घेण्यात आलेल्या झडत्या व सक्तीने घेण्यात आलेला ताबा यांना लागू होतील. **फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या तरतुदी, अधिपत्रे, अटक करण्याला, झडत्या घेण्याला व सक्तीने ताबा घेण्याला लागू होणे.**

**५२.** (१) कलम ४१, कलम ४२, कलम ४३, किंवा कलम ४४ अन्वये एखाद्या व्यक्तीला अटक करणारा कोणताही अधिकारी, शक्य तितक्या लवकर, तिला अशा अटकेची कारणे कळवील. **अटक केलेल्या व्यक्तींची व ताब्यात घेतलेल्या वस्तूंची व्यवस्था लावणे.**

(२) कलम ४१ च्या पोटकलम (१) अन्वये अटक करण्यात आलेली प्रत्येक व्यक्ती आणि काढण्यात आलेल्या अधिपत्रान्वये ताब्यात घेण्यात आलेली वस्तू, ज्या दंडाधिकाऱ्याकडून अधिपत्र काढण्यात आले असेल त्याच्याकडे अनावश्यक विलंब न करता पाठवण्यात येईल.

(३) कलम ४१ चे पोटकलम (२), कलम ४२, कलम ४३ किंवा कलम ४४ या अन्वये अटक करण्यात आलेली प्रत्येक व्यक्ती आणि ताब्यात घेण्यात आलेली वस्तू अनावश्यक विलंबाविना,—

(क) निकटतम पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याकडे, किंवा

(ख) कलम ५३ अन्वये अधिकार प्रदान करण्यात आलेल्या अधिकाऱ्याकडे पाठवण्यात येईल.

(४) पोटकलम (२) किंवा पोटकलम (३) अन्वये कोणतीही व्यक्ती किंवा वस्तू ज्याच्याकडे पाठवण्यात आली असेल, तो प्राधिकारी किंवा अधिकारी, अशी व्यक्ती किंवा वस्तू यांची कायद्यानुसार व्यवस्था लावण्यासाठी, सर्वतोपरी सोयीस्कर मार्गांनी, आवश्यक अशी उपाययोजना करील.

[2][ **५२क.** (१) केंद्र सरकारला, कोणतीही अंमली औषधिद्रव्ये किंवा मनःप्रभावी पदार्थ यांचे धोकादायक स्वरूप, ते चोरी होण्याचे, बदलले जाण्याचे भय, योग्य अशा साठवणीच्या जागेची अडचण किंवा अन्य कोणत्याही विचारात घेण्याजोग्या संबंधित गोष्टी लक्षात घेऊन, **राजपत्रात** प्रकाशित केलेल्या अधिसूचनेद्वारे, अशी अंमली औषधिद्रव्ये किंवा मनःप्रभावी पदार्थ अथवा अंमली औषधिद्रव्यांचा वर्ग वा मनःप्रभावी पदार्थांचा वर्ग विनिर्दिष्ट करता येईल, ज्यांची, ते सक्तीने ताब्यात घेतल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, त्या अधिकाऱ्याकडून, यात यापुढे विनिर्दिष्ट करण्यात आलेली कार्यपद्धती अनुसरल्यानंतर, केंद्र सरकार ठरवील अशा रीतीने विल्हेवाट लावली जाईल. **सक्तीने ताब्यात घेतलेल्या अंमली औषधिद्रव्यांची व मनःप्रभावी पदार्थांची विल्हेवाट.**

(२) कोणतीही अंमली औषधिद्रव्ये वा मनःप्रभावी पदार्थ सक्तीने ताब्यात घेऊन निकटतम पोलीस ठाण्याच्या प्रभारी पोलीस अधिकाऱ्याकडे किंवा कलम ५३ अन्वये अधिकार प्रदान करण्यात आलेल्या अधिकाऱ्याकडे पाठवण्यात आले असेल अशा बाबतीत, पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेला अधिकारी, अशा अंमली औषधिद्रव्याचे किंवा मनःप्रभावी पदार्थाचे वर्णन, प्रत, परिमाण, त्यांच्या वेष्टनाची पद्धत, तो ज्यामध्ये आवेष्टित केली असतील त्या वेष्टनाची चिन्हे, क्रमांक किंवा इतर ओळखदर्शक तपशील त्यांच्या उत्पत्तीचा देश आणि पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या अधिकाऱ्याला या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीमध्ये अंमली औषधिद्रव्ये वा मनःप्रभावी पदार्थ ओळखण्यासाठी संबद्ध वाटेल असा इतर तपशील अंतर्भूत असलेली वस्तुसूची तयार करील आणि कोणत्याही दंडाधिकाऱ्याकडे पुढील प्रयोजनांसाठी ,—

(क) अशा तऱ्हेने तयार करण्यात आलेल्या वस्तुसूचीची अचूकता प्रमाणित करण्यासाठी ; किंवा

---

[1] २००१ चा अधिनियम ९, कलम २३ अन्वये समाविष्ट करण्यात आले.

[2] १९८९ चा अधिनियम २, कलम १४ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

(ख) अशा दंडाधिकाऱ्यासमक्ष अशा औषधिद्रव्यांची वा पदार्थांची छायाचित्रे घेण्यासाठी आणि अशी छायाचित्रे खरी असल्याचे प्रमाणित करण्यांसाठी ; किंवा

(ग) अशा दंडाधिकाऱ्यासमक्ष अशी औषधिद्रव्ये किंवा पदार्थ यांचे प्रातिनिधिक नमुने घेण्यासाठी आणि अशा प्रकारे घेतलेल्या नमुन्यांच्या कोणत्याही सूचीची अचूकता प्रमाणित करण्यासाठी ;

अर्ज करील.

(३) पोटकलम (२) अन्वये अर्ज करण्यात येईल तेव्हा, दंडाधिकारी, शक्य तितक्या लवकर, अर्ज मान्य करील.

(४) भारतीय साक्षीपुरावा अधिनियम, १८७२ (१८७२ चा १) किंवा फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखालील अपराधांची संपरीक्षा करणारे प्रत्येक न्यायालय, पोटकलम (२) अन्वये तयार करण्यात आलेली आणि दंडाधिकाऱ्याकडून प्रमाणित करण्यात आलेली वस्तुसूची, अंमली औषधिद्रव्ये वा मनःप्रभावी पदार्थ यांची छायाचित्रे आणि नमुन्यांची कोणतीही सूची, अशा अपराधाच्या संबंधात प्राथमिक पुरावा असल्याचे मानले जाईल. ]

**विवक्षित विभागांच्या अधिकाऱ्यांकडे पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्यांची शक्ती निहित करणे.**

**५३.** (१) केंद्र सरकारला, राज्य शासनाशी विचारविनिमय केल्यानंतर, **राजपत्रात** प्रकाशित केलेल्या अधिसूचनेद्वारे, केंद्रीय उत्पादनशुल्क, अंमली औषधिद्रव्ये, सीमाशुल्क, महसूल, गुप्तवार्ता [१][ किंवा निमलष्करी बल किंवा सशस्त्र बलासह केंद्र सरकारच्या अन्य कोणत्याही विभागाच्या ] कोणत्याही अधिकाऱ्याकडे किंवा अशा अधिकाऱ्याच्या कोणत्याही वर्गाकडे, या अधिनियमाखालील अपराधांच्या अन्वेषणासाठी, पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याच्या शक्ती निहित करता येतील.

(२) राज्य शासनाला, **राजपत्रात** प्रकाशित करावयाच्या अधिसूचनेद्वारे, औषधिद्रव्ये नियंत्रण, महसूल किंवा उत्पादन शुल्क विभागाच्या [२][ किंवा कोणत्याही अन्य विभागाच्या ] कोणत्याही अधिकाऱ्याकडे अथवा अशा अधिकाऱ्यांच्या कोणत्याही वर्गाकडे, या अधिनियमाखालील अपराधांच्या अन्वेषणासाठी पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याचे अधिकार निहित करता येतील.

**विवक्षित परिस्थितीत निवेदनाची सुसंबद्धता.**

[३][ **५३क.** (१) अपराधांच्या अन्वेषणासाठी कलम ५३ अन्वये अधिकार प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यासमोर, अशा अधिकाऱ्याकडून केल्या जाणाऱ्या कोणत्याही चौकशीच्या किंवा कार्यवाहीच्या ओघात, एखाद्या व्यक्तीकडून देण्यात आलेले व स्वाक्षरित करण्यात आलेले कोणतेही निवेदन या अधिनियमाखालील अपराधाच्या कोणत्याही खटल्यास, त्यामध्ये अंतर्भूत असलेली वस्तुस्थिती सिद्ध करण्याच्या प्रयोजनार्थ,

(क) निवेदन करणारी व्यक्ती मरण पावली असेल किंवा बेपत्ता असेल किंवा पुरावा देण्यास सक्षम नसेल किंवा प्रतिपक्षाने तिला (जाणूनबुजून) दूर ठेवले असेल किंवा न्यायालयाला त्या प्रकरणाच्या परिस्थितीत तिला उपस्थित करण्यात जो विलंब किंवा खर्च अवाजवी वाटत असेल, असा विलंब झाल्याखेरीज किंवा खर्च केल्याखेरीज त्या व्यक्तीला उपस्थित करणे शक्य नसेल तेव्हा ;

(ख) न्यायालय पुढील प्रकरणात, निवेदन करणाऱ्या व्यक्तीची तपासणी करण्यात आल्यानंतर प्रकरणाची परिस्थिती लक्षात घेता, न्यायदानाच्या दृष्टीने साक्षीपुराव्यात ते निवेदन ग्राह्य धरण्यात यावे, असे न्यायालयाचे मत झाले असेल तेव्हा ;

सुसंबद्ध मानण्यात येईल.

(२) पोटकलम (१) ची तरतूद, शक्य असेल तेथवर, या अधिनियमाखालील किंवा त्याअन्वये करण्यात आलेले नियम वा आदेश याखालील न्यायालयापुढील कार्यवाहीव्यतिरिक्त अन्य कोणत्याही कार्यवाही संबंधात, असे ते न्यायालयापुढील कार्यवाहीसंबंधात लागू होतात, तसे लागू होतील. ]

**विधिनिषिद्ध वस्तू जवळ बाळगण्याच्या परिणामी गृहीतक.**

[४][ **५४.** या अधिनियमाखालील संपरीक्षेमध्ये आरोपीने ज्या वस्तू जवळ बाळगल्याबद्दल तो समाधानकारक खुलासा देऊ शकत नसेल अशा खालील वस्तूंच्या बाबतीत, तद्विरुद्ध सिद्ध करण्यात येईतोपर्यंत, असे गृहीत धरण्यात येईल की, आरोपीने या अधिनियमान्वये अपराध केला आहे :—

(क) कोणतेही अंमली औषधिद्रव्य किंवा मनःप्रभावी पदार्थ किंवा नियंत्रित पदार्थ ;

---

[१] २००१ चा अधिनियम ९, कलम २४ (क) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २४ (ख) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

[३] १९८९ चा अधिनियम २, कलम १५ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

[४] २००१ चा अधिनियम ९, कलम २५ अन्वये बदलीदाखल करण्यात आले.

(ख) त्याने लागवड केलेल्या कोणत्याही जमिनीवर उगवणारे अफूचे झाड, कॅनाबिस वनस्पती किंवा कोका वनस्पती ;

(ग) कोणतेही औषधिद्रव्य किंवा मन:प्रभावी पदार्थ किंवा नियंत्रित पदार्थ यांच्या निर्मितीसाठी विशेषकरून तयार केलेला कोणताही उपकरण संच किंवा विशेषकरून वापरात आणलेला भांड्यांचा कोणताही संच ; किंवा

(घ) अंमली औषधिद्रव्य किंवा मन:प्रभावी पदार्थ किंवा नियंत्रित पदार्थ यांच्या निर्मितीसाठी, ज्यावर कोणतीही प्रक्रिया झालेली आहे असा कोणताही माल किंवा ज्यापासून कोणतेही अंमली औषधिद्रव्य किंवा मन:प्रभावी पदार्थ किंवा नियंत्रित पदार्थ बनविण्यात आले असतील, अशा मालातील कोणताही गाळसाळ. ]

**सक्तीने ताब्यात घेण्यात आलेल्या आणि सुपूर्द केलेल्या वस्तूंचा पोलिसाने प्रभार घेणे.**

**५५.** पोलीस ठाण्याचा प्रभारी अधिकारी, दंडाधिकाऱ्याचे आदेश होईपर्यंत, त्या पोलीस ठाण्याच्या स्थानिक क्षेत्रांतर्गत या अधिनियमान्वये ताब्यात घेण्यात आलेल्या आणि त्यांच्याकडे सुपूर्द करण्यात येतील अशा सर्व वस्तूंचा प्रभार घेईल आणि त्या सुरक्षित ताब्यात ठेवील व अशा वस्तू पोलीस ठाण्यावर घेऊन येणाऱ्या किंवा त्या प्रयोजनासाठी नियुक्त करण्यात आलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याला, अशा वस्तूंवर त्याचा शिक्का मारण्यास किंवा त्यांचे वा त्यांच्यामधून नमुने घेण्यास परवानगी देईल आणि अशा तऱ्हेने घेण्यात आलेल्या सर्व नमुन्यांवर पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याचाही शिक्का मारण्यात येईल.

**अधिकाऱ्यांनी एकमेकांना सहाय्य करण्याचे दायित्व.**

**५६.** कलम ४२ मध्ये उल्लेखिलेल्या निरनिराळ्या विभागांचे सर्व अधिकारी, नोटीस देण्यात आल्यानंतर किंवा विनंती करण्यात आल्यानंतर, या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यात एकमेकांना सहाय्य करण्यात विधित: बद्ध असतील.

**अटक करणे किंवा सक्तीने ताब्यात घेणे याबद्दल अहवाल त्यावेळी देणे.**

**५७.** ज्यावेळी कोणतीही व्यक्ती, या अधिनियमान्वये कोणतीही अटक करील किंवा ताब्यात घेईल त्यावेळी अशा अटकेनंतरच्या किंवा ताब्यात घेतल्यानंतरच्या अठ्ठेचाळीस तासांच्या आत, अशा अटकेबद्दलच्या किंवा ताब्यात घेण्याबद्दलच्या सर्व तपशिलाचा संपूर्ण अहवाल ती तिच्या निकटतम वरिष्ठ अधिकाऱ्याकडे पाठवील.

**तापदायक प्रवेश करणे, तपास करणे किंवा सक्तीने ताब्यात घेणे, अटक करणे याबद्दल शिक्षा.**

**५८.** (१) कलम ४२ किंवा कलम ४३ किंवा कलम ४४ अन्वये अधिकार प्रदान करण्यात आलेली जी कोणतीही व्यक्ती,--

(क) संशयास वाजवी कारण नसताना कोणतीही इमारत, वाहन किंवा ठिकाण यामध्ये प्रवेश करील किंवा तपास करील अथवा प्रवेश किंवा तपास करावयास लावील ;

(ख) या अधिनियमान्वये जप्तीपात्र असे कोणतेही अंमली औषधिद्रव्य किंवा मन:प्रभावी पदार्थ किंवा अन्य वस्तू ताब्यात घेण्याच्या किंवा तिचा तपास करण्याच्या बहाण्याने अथवा कलम ४२, कलम ४३ किंवा कलम ४४ अन्वये ताब्यात घेण्यास पात्र असणारा कोणताही दस्तऐवज किंवा इतर वस्तू ताब्यात घेण्याच्या बहाण्याने, कोणत्याही व्यक्तीची संपत्ती तापदायकरीत्या व विनाकारण सक्तीने ताब्यात घेईल ; किंवा

(ग) कोणत्याही व्यक्तीला तापदायकरीत्या व विनाकारण स्थानबद्ध करील तिची झडती घेईल किंवा तिला अटक करील ;

त्या व्यक्तीला सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा दोन्ही शिक्षा होतील.

(२) जाणीवपूर्वक आणि दुर्भावपूर्वक खोटी माहिती देणारी आणि त्याद्वारे या अधिनियमान्वये अटक किंवा झडती घडवून आणणारी कोणतीही व्यक्ती, दोन वर्षांपर्यंत असू शकेल अशा मुदतीच्या कारावासाच्या किंवा द्रव्यदंडाच्या किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

**अधिकाऱ्याने कर्तव्यपालनात चूक करणे किंवा या अधिनियमाच्या तरतुदींच्या व्यतिक्रमणाकडे कानाडोळा करणे.**

**५९.** (१) या अधिनियमाद्वारे वा अन्वये ज्याच्याकडे एखादे कर्तव्य सोपवण्यात आलेले आहे आणि तो आपल्या पदाचे कर्तव्य करीत नाही किंवा नाकारतो किंवा चुकारपणा करतो असा कोणताही अधिकारी, त्याने तसे करण्याबद्दल आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्याची व्यक्त लेखी परवानगी आणलेली नसेल तर किंवा त्यासाठी इतर वैध सबब नसेल तर, एक वर्षापर्यंत असू शकेल अशा मुदतीच्या कारावासाच्या किंवा द्रव्यदंडाच्या किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

[१][ (२) या अधिनियमाद्वारे वा तद्न्वये ज्याच्याकडे कोणतेही कर्तव्य सोपवण्यात आले आहे असा एखादा अधिकारी, किंवा

(क) एखादी व्यसनी व्यक्ती ; किंवा

(ख) या अधिनियमाखालील अपराधाचा जिच्यावर आरोप करण्यात आला आहे अशी एखादी व्यक्ती,

जिच्या अभिरक्षेत ठेवण्यात आली आहे, आणि जो अधिकारी किंवा जी व्यक्ती या अधिनियमाची कोणतीही तरतूद किंवा त्याअन्वये करण्यात आलेला कोणताही नियम वा आदेश याच्या व्यतिक्रमणास स्वेच्छेने मदत करते किंवा त्याकडे कानाडोळा करते ती व्यक्ती किंवा तो अधिकारी, दहा वर्षांपेक्षा कमी नाही, परंतु वीस वर्षांपर्यंत असू शकेल अशा मुदतीच्या सश्रम कारावासाच्या शिक्षेस पात्र असेल आणि एक लाख रुपयांपेक्षा कमी नाही, परंतु दोन लाख रुपयांपर्यंत असू शकेल अशा द्रव्यदंडाच्या शिक्षेसही पात्र असेल.

**स्पष्टीकरण.—** या पोटकलमाच्या प्रयोजनांसाठी, " अधिकारी " या शब्दप्रयोगास, शासन किंवा स्थानिक प्राधिकरण यांच्याकडून चालवण्यात येणारे किंवा त्यांची मान्यता असणारे असे व्यसनमुक्तीचा उपचार पुरविणारे कलम ६४ क खालील कोणतेही रुग्णालय किंवा संस्था यांमध्ये कामावर असलेल्या कोणत्याही व्यक्तीचा समावेश होतो. ]

(३) केंद्र सरकारच्या, किंवा, यथास्थिति, राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने लेखी तक्रार करण्यात आल्याखेरीज कोणतेही न्यायालय पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) खालील कोणत्याही अपराधाची दखल घेणार नाही.

**निषिद्ध औषधिद्रव्ये, मन:प्रभावी पदार्थ, वनस्पती, वस्तू व वाहने जप्तीस पात्र असणे.**

**६०.** [२][ (१) या अधिनियमाखालील शिक्षापात्र असा कोणताही अपराध करण्यात येईल त्यावेळी, ज्यासंबंधात किंवा ज्याद्वारे असा अपराध करण्यात आलेला आहे असे अंमली औषधिद्रव्य, मन:प्रभावी पदार्थ, नियंत्रित पदार्थ अफूचे झाड, कोका वनस्पती, कॅनाबिस वनस्पती, सामग्री, उपकरण संच, आणि पात्रे (भांडी) जप्तीस पात्र असतील. ]

(२) पोटकलम (१) अन्वये जप्तीपात्र अशा कोणत्याही अंमली औषधिद्रव्यासह किंवा मन:प्रभावी पदार्थ [३][ किंवा नियंत्रित पदार्थ ] यांसह किंवा त्यांच्या जोडीला, वैधरीत्या उत्पादित केलेले, आंतरराज्यीय आयात केलेले, आंतरराज्यीय निर्यात केलेले, भारतात आयात केलेले, परिवहन केलेले, निर्मिलेले, कब्जात असलेले, वापरलेले, खरेदी किंवा विक्री केलेले कोणतेही अंमली औषधिद्रव्य किंवा मन:प्रभावी पदार्थ [३][किंवा नियंत्रित पदार्थ ] आणि पोटकलम (१) अन्वये जप्ती असे कोणतेही अंमली औषधिद्रव्य किंवा मन:प्रभावी पदार्थ, [३][ किंवा नियंत्रित पदार्थ ] सामग्री, उपकरणपात्र संच किंवा भांडी ज्यांमध्ये आढळून येतील अशी बारदाने, वेष्टने व आवरणे आणि अशा बारदानातील व वेष्टनामधील इतर द्रव्ये, कोणतीही असल्यास, ही तशाच प्रकारे जप्तीस पात्र असतील.

(३) कोणतेही अंमली औषधिद्रव्य किंवा मन:प्रभावी पदार्थ [३][ किंवा नियंत्रित पदार्थ ] किंवा पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) अन्वये जप्तीपात्र अशी कोणतीही वस्तू वाहून नेण्यासाठी वापरलेले कोणतेही जनावर किंवा वाहन हे त्या जनावरांच्या किंवा वाहनाच्या मालकाने, ते त्याच्या नकळत अथवा त्याने स्वत: त्याच्या अभिकर्त्याने, कोणताही असल्यास, आणि जनावराचा किंवा वाहनाचा प्रभार असलेल्या व्यक्तीने डोळेझाक केलेली नसताना, तशा प्रकारे वापरण्यात आले होते आणि अशा प्रकारे वापरले जाऊ नये, यासाठी त्यांच्यापैकी प्रत्येकाने सर्वतोपरी वाजवी खबरदारी घेतली होती, असे सिद्ध केले नसेल तर, जप्तीस पात्र असेल.

**निषिद्ध औषधिद्रव्ये किंवा पदार्थ लपविण्यासाठी वापरलेल्या मालाची जप्ती.**

**६१.** या अधिनियमान्वये जप्तीस पात्र असलेले कोणतेही [४][ अंमली औषधिद्रव्य, मन:प्रभावी पदार्थ किंवा नियंत्रित पदार्थ ] लपविण्यासाठी वापरण्यात आलेला कोणताही माल जप्तीस पात्र असेल.

**स्पष्टीकरण.—** या कलमात " माल " यामध्ये परिवहनाचे साधन म्हणून असलेल्या वाहनाचा समावेश होत नाही.

**निषिद्ध औषधिद्रव्ये किंवा पदार्थ यांच्या विक्रीच्या उत्पन्नाची जप्ती.**

**६२.** एखाद्या व्यक्तीने कोणतेही [५][ अंमली औषधिद्रव्य, मन:प्रभावी पदार्थ किंवा नियंत्रित पदार्थ ] या अधिनियमान्वये जप्तीस पात्र असल्याचे माहीत असताना किंवा तसे मानण्यास संयुक्तिक कारण असताना ते औषधिद्रव्य किंवा पदार्थ विकले तर, त्यांच्या विक्रीचे उत्पन्नही जप्तीस पात्र असेल.

---

[१] १९८९ चा अधिनियम २, कलम १६ द्वारे बदली दाखल करण्यात आले.

[२] २००१ चा अधिनियम ९, कलम २६ (क) अन्वये बदली दाखल करण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २६ (ख) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

[४] वरील अधिनियमाच्या कलम २७ अन्वये बदली दाखल करण्यात आले.

[५] वरील अधिनियमाच्या कलम २८ अन्वये बदली दाखल करण्यात आले.

६३. (१) या अधिनियमाखालील अपराध्यांच्या न्यायचौकशीत, आरोपीचा दोष सिद्ध झालेला असला, दोषमुक्त झालेला असला वा विनादोषारोप सोडण्यात आलेला असला तरी, न्यायालय, या अधिनियमान्वये ताब्यात घेण्यात आलेली कोणतीही वस्तू किंवा गोष्ट, कलम ६० किंवा कलम ६१ किंवा कलम ६२ अन्वये जप्तीस पात्र आहे किंवा नाही ते ठरवील आणि वस्तू तशी पात्र असल्याचा त्याने निर्णय घेतल्यास, त्यानुसार त्याला त्या वस्तूच्या जप्तीचा आदेश देता येईल. जप्ती करण्याची कार्यपद्धती.

(२) या अधिनियमान्वये ताब्यात घेण्यात आलेली कोणतीही वस्तू किंवा गोष्ट, कलम ६० किंवा कलम ६१ किंवा कलम ६२ अन्वये जप्तीपात्र असल्याचे दिसून येत असेल, परंतु तिच्याशी संबंधित अपराध करणारी व्यक्ती माहीत नसेल किंवा सापडत नसेल अशा बाबतीत, न्यायालयाला त्या संबंधात चौकशी करता येईल आणि त्याबाबतचे दायित्व ठरवता येईल आणि त्यानुसार जप्तीचा आदेश देता येईल :

परंतु, एखादी वस्तू किंवा गोष्ट यांच्या जप्तीचा कोणताही आदेश, ताब्यात घेण्याच्या दिनांकापासून एक महिना संपेपर्यंत किंवा त्यासंबंधात हक्कमागणी करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीचे म्हणणे ऐकून घेतल्याशिवाय आणि तिच्या हक्कमागणीच्या संबंधात तिने सादर केलेला पुरावा, कोणताही असल्यास, तो लक्षात घेतल्याशिवाय दिला जाणार नाही :

परंतु आणखी असे की, अंमली औषधिद्रव्य, मनःप्रभावी पदार्थ, [1][ नियंत्रित पदार्थ, ] अफूचे झाड, कोका वनस्पती किंवा कॅनाबिस वनस्पती यांच्या व्यतिरिक्त, अशी कोणतीही वस्तू किंवा गोष्ट, झपाट्याने व नैसर्गिकरीत्या, सडण्याची शक्यता असेल अथवा न्यायालयाच्या मते त्यांची विक्री त्यांच्या मालकाच्या लाभार्थ असू शकेल अशा बाबतीत, न्यायालयाला ती वस्तू किंवा गोष्ट विकण्याचे कोणत्याही वेळी निदेशित करता येईल आणि या पोट-कलमाच्या तरतुदी, व्यवहार्य असतील तेथवर, विक्रीच्या निव्वळ उत्पन्नास लागू होतील.

[2][ * * * * * ]

६४. (१) केंद्र सरकारचे किंवा राज्य शासनाचे जर असे मत असेल की, (अशा मताची कारणे लेखी नमूद करण्यात येतील) या अधिनियमाच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदीच्या किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमाच्या वा देण्यात आलेल्या आदेशाच्या व्यतिक्रमणाशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या संबंधित अथवा त्यामध्ये आतून सामील असल्याचे दिसून येणाऱ्या कोणत्याही व्यक्तीची साक्ष मिळवण्यासाठी तसे करणे आवश्यक व उचित आहे, तर ते, सरकार किंवा शासन अशा व्यक्तीला, हा अधिनियम किंवा भारतीय दंड संहिता (१८६० चा ४५), अथवा त्या काळापुरता अंमलात असलेला अन्य कोणताही केंद्रीय अधिनियम किंवा, यथास्थिति, राज्य अधिनियम यांखालील कोणत्याही अपराधाबद्दलच्या खटल्यातून, तिने अशा व्यतिक्रमणासंबंधीची एकंदर परिस्थिती पूर्णतः प्रामाणिकपणे उघड करावी या शर्तीवर, उन्मुक्ती देऊ शकेल. खटल्यातून उन्मुक्ती देण्याची शक्ती.

(२) संबंधित व्यक्तीला देण्यात आलेली आणि तिच्याकडून स्वीकारण्यात आलेली उन्मुक्ती ही, जेथपर्यंत त्या उन्मुक्तीची व्याप्ती असेल त्या मर्यादेपर्यंत, ज्या संबंधात अशी उन्मुक्ती देण्यात आली असेल, त्या अपराधाच्या कोणत्याही खटल्यातून त्या व्यक्तीला उन्मुक्त करील.

(३) केंद्र सरकारला, किंवा, यथास्थिति, राज्य शासनाला जर असे दिसून आले की, या कलमान्वये जिला उन्मुक्ती देण्यात आलेली आहे अशा कोणत्याही व्यक्तीने, ज्या शर्तीवर तिला अशी उन्मुक्ती देण्यात आली, त्यांचे पालन केलेले नाही किंवा ती जाणीवपूर्वक काहीतरी लपवीत आहे किंवा खोटी साक्ष देत आहे तर, केंद्र सरकार, किंवा, यथास्थिति, राज्य शासन, तशा आशयाचा निष्कर्ष नमूद करू शकेल आणि त्यानंतर उन्मुक्ती काढून घेण्यात आल्याचे समजण्यात येईल आणि ज्या संबंधात उन्मुक्ती देण्यात आली असेल त्या अपराधाबद्दल किंवा त्याच बाबीसंबंधात ती ज्या अन्य कोणत्याही अपराधाबद्दल दोषी असल्याचे आढळून येईल, त्या अपराधाबद्दल, त्या व्यक्तीची न्यायचौकशी करू शकेल.

[1] २००१ चा अधिनियम ९, कलम २९ (क) अन्वये बदली दाखल करण्यात आले.

[2] वरील अधिनियमाच्या कलम २९ (ख) अन्वये मूळ मजकूर वगळण्यात आला.

स्वेच्छेने उपचार करून घेणाऱ्या व्यक्तींना खटल्यातून उन्मुक्ती.

[1] [ **६४क.** कलम २७ अन्वये शिक्षापात्र अशा कोणत्याही अपराधाबद्दल किंवा अंमली औषधिद्रव्याच्या किंवा मन:प्रभावी पदार्थांच्या अल्प प्रमाणाच्या संबंधातील अपराधाबद्दल जिच्यावर आरोप करण्यात आलेला आहे, अशी जी कोणतीही व्यसनी व्यक्ती, शासनाकडून किंवा स्थानिक प्राधिकरणाकडून चालवल्या जाणाऱ्या किंवा मान्यता देण्यात आलेल्या रुग्णालयातून किंवा संस्थेतून, व्यसन कमी करण्यासाठी स्वेच्छेने वैद्यकीय उपचार घेऊ इच्छित असेल आणि असा उपचार घेत असेल ती व्यक्ती, कलम २७ अन्वये किंवा अंमली औषधिद्रव्याच्या किंवा मन:प्रभावी पदार्थांच्या अल्प प्रमाणासंबंधातील अपराधाबाबत कोणत्याही अन्य कलमा अन्वये खटला भरला जाण्यास पात्र असणार नाही :

परंतु, व्यसनी व्यक्तीने व्यसन कमी करण्यासाठी उपचार पूर्णपणे घेतला नाही तर, खटल्यामधून मिळणारी उन्मुक्ती काढून घेण्यात येईल. ]

**६५.** [2][ * * * * * ]

विवक्षित प्रकरणांमध्ये दस्तऐवजांसंबंधीचे गृहीतक.

**६६.** जेव्हा कोणताही दस्तऐवज,—

(एक) या अधिनियमान्वये वा अन्य कोणत्याही कायद्यान्वये कोणत्याही व्यक्तीकडून सादर करण्यात किंवा दाखल करण्यात अथवा कोणत्याही व्यक्तीच्या अभिरक्षेतून किंवा नियंत्रणातून ताब्यात घेण्यात आला असेल ; किंवा

(दोन) या अधिनियमान्वये एखादा अपराध एखाद्या व्यक्तीने, एखाद्या व्यक्तींकडून केल्याचे अभिकथित असेल त्या अपराधाच्या अन्वेषणाच्या ओघात, भारताबाहेरील कोणत्याही ठिकाणाहून (केंद्र सरकारकडून विहित करण्यात आलेल्या अशा प्राधिकरणाकडून किंवा व्यक्तीकडून आणि अशा रीतीने यथोचितरीत्या अधिप्रमाणित केलेल्या स्वरूपात) मिळाला असेल,

आणि असा दस्तऐवज तिच्याविरुद्ध किंवा ती आणि तिच्यासह संयुक्तरीत्या न्यायचौकशी करण्यात आली असेल अशी अन्य कोणतीही व्यक्ती यांच्याविरुद्ध, या अधिनियमाखालील कोणत्याही खटल्यात सादर करण्यात आला असेल अशा बाबतीत, न्यायालय,—

(क्) तद्विरुद्ध सिद्ध झाले नाही तर, अशा दस्तऐवजावरील सही आणि त्याचा अन्य जो भाग कोणत्याही विशिष्ट व्यक्तीकडून स्वाक्षरीत केल्याचे किंवा तिच्या हस्ताक्षरात असल्याचे न्यायालयाला वाजवीरीत्या गृहीत धरता येईल असा प्रत्येक भाग, त्या व्यक्तीच्या, हस्ताक्षरात आहे, आणि निष्पादित केलेल्या किंवा साक्षांकित केलेल्या दस्तऐवजाच्या बाबतीत तो ज्या व्यक्तीकडून अशा रीतीने निष्पादित किंवा साक्षांकित करणे अभिप्रेत असेल त्याच व्यक्तीकडून निष्पादित किंवा साक्षांकित करण्यात आला आहे, असे गृहित धरील ;

(ख्) असा दस्तऐवज पुराव्यात अन्यथा ग्राह्य असल्यास तो यथोचितरीत्या मुद्रांकित केलेला नसला तरीही पुराव्यात ग्राह्य धरील ;

(ग्) खंड (एक) खाली येणाऱ्या प्रकरणात तद्विरुद्ध सिद्ध झाले नाही तर, अशा दस्तऐवजातील मजकुराची सत्यताही गृहीत धरील.

माहिती, इत्यादी मागविण्याची शक्ती.

**६७.** या संबंधात केंद्र सरकारकडून वा राज्य शासनाकडून प्राधिकृत करण्यात आलेल्या कलम ४२ मध्ये उल्लेखिलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याला, या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीच्या व्यतिक्रमणासंबंधातील कोणत्याही चौकशीच्या ओघात ,—

(क्) या अधिनियमाच्या वा त्याखाली करण्यात आलेल्या कोणत्याही नियमाच्या वा आदेशाच्या तरतुदीचे कोणतेही व्यतिक्रमण झाले आहे किंवा कसे याबद्दल स्वत:ची खात्री करून घेण्यासाठी कोणत्याही व्यक्तीकडून माहिती मागविता येईल ;

---

[1] २००१ चा अधिनियम ९, कलम ३० अन्वये समाविष्ट करण्यात आले.

[2] १९८९ चा अधिनियम २, कलम १८ द्वारे मूळ कलम ६५ वगळण्यात आले.

(ख) चौकशी संबंधातील कोणताही उपयोगी वा संबद्ध दस्तऐवज वा वस्तू सादर करण्यास वा सुपूर्द करण्यात कोणत्याही व्यक्तीला आवश्यक करता येईल ;

(ग) प्रकरणाची वस्तुस्थिती व परिस्थिती माहीत असलेल्या कोणत्याही व्यक्तीची तपासणी घेता येईल.

**६८.** या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीन्वये वा त्याखाली करण्यात आलेल्या कोणत्याही नियमान्वये वा देण्यात आलेल्या आदेशान्वये कोणत्याही अधिकाऱ्याकडे निहित करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, तो कृती करीत असताना त्याला कोणताही अपराध करण्यात आल्यासंबंधातील कोणतीही माहिती त्याने कोठून मिळवली, ते सांगण्याची सक्ती केली जाणार नाही. **अपराध करण्यात आल्याबद्दलची माहिती.**

[१] [ प्रकरण पाच क

**निषिद्ध क्रयविक्रयातून मिळवलेली किंवा त्यात वापरलेली संपत्ती सरकारजमा करणे**

**६८क.** (१) या प्रकरणाच्या तरतुदी फक्त पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या व्यक्तींनाच लागू होतील. **प्रयुक्ति.**

(२) पोटकलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या व्यक्ती पुढीलप्रमाणे आहेत, त्या अशा :—

(क) या अधिनियमान्वये [२][ दहा ] वर्षे किंवा त्याहून अधिक मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेल्या अपराधाबद्दल दोष सिद्ध झाल्याचे ठरवण्यात आलेली प्रत्येक व्यक्ती ;

(ख) भारताबाहेरील फौजदारी अधिकारिता असलेल्या सक्षम न्यायालयाकडून तशाच अपराधाबद्दल दोष सिद्ध झाल्याचे ठरविण्यात आलेली प्रत्येक व्यक्ती ;

(ग) अंमली औषधिद्रव्ये व मनःप्रभावी पदार्थ विधिनिषिद्ध व्यापार प्रतिबंध अधिनियम, १९८८ (१९८८ चा ४६) अन्वये किंवा जम्मू व काश्मीर अंमली औषधिद्रव्ये व मनःप्रभावी पदार्थ यांच्या निषिद्ध क्रयविक्रयास प्रतिबंध अधिनियम, १९८८ (१९८८ चा जम्मू व काश्मीर अधिनियम २३) अन्वये जिच्या संबंधात स्थानबद्धता आदेश देण्यात आला असेल अशी प्रत्येक व्यक्ती :

परंतु, असा स्थानबद्धता आदेश, उक्त अधिनियमान्वये घटित करण्यात आलेल्या सल्लागार मंडळाच्या अहवालानुसार प्रत्याहत केलेला नसावा किंवा असा स्थानबद्धता आदेश, सक्षम अधिकारिता असलेल्या न्यायालयाकडून अपास्त करण्यात आलेला नसावा ;

[३][ (गग) या अधिनियमान्वये दहा वर्षे किंवा त्याहून अधिक मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेला कोणताही अपराध करण्यात आल्याबद्दल अटक करण्यात आलेली किंवा जिच्याविरुद्ध अटकेचे वॉरंट किंवा प्राधिकारपत्र काढण्यात आले आहे अशी प्रत्येक व्यक्ती आणि कोणत्याही अन्य देशाच्या कोणत्याही तत्सम कायद्यान्वये त्या सारखाच अपराध करण्याबद्दल अटक करण्यात आलेली किंवा जिच्या विरुद्ध अटकेचे वॉरंट किंवा प्राधिकारपत्र काढण्यात आलेले आहे अशी प्रत्येक व्यक्ती ;]

(घ) खंड (क) किंवा खंड (ख) किंवा खंड (ग) [४][ किंवा खंड (गग) ] मध्ये उल्लेखिलेल्या व्यक्तीची नातेवाईक असलेली प्रत्येक व्यक्ती ;

(ङ) खंड (क) किंवा खंड (ख) किंवा खंड (ग) [४][किंवा खंड (गग) ] मध्ये उल्लेखिलेल्या व्यक्तीची प्रत्येक सहयोगी व्यक्ती ;

(च) जर विद्यमान धारक, किंवा, यथास्थिति, अशा व्यक्तीनंतर आणि विद्यमान धारकापूर्वी अशी संपत्ती धारण करणारा कोणीही सद्‌भावपूर्वक पर्याप्त प्रतिफलासाठी हस्तांतरिती आहे किंवा होता, असे नसेल तर, खंड (क) किंवा खंड (ख) किंवा खंड (ग) [४][किंवा खंड (गग) ] मध्ये उल्लेखिलेल्या व्यक्तीकडून पूर्वी कोणत्याही वेळी धारण करण्यात आलेल्या कोणत्याही संपत्तीचा कोणताही धारक (या खंडात ज्याचा उल्लेख यापुढे " विद्यमान धारक " म्हणून केला आहे.)

---

[१] १९८९ चा अधिनियम २, कलम १९ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

[२] २००१ चा अधिनियम ९, कलम ३१ (एक) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ३१ (दोन) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ३१ (तीन) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

व्याख्या. ६८ख. या प्रकरणामध्ये, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,—

(क) " अपिलीय न्यायाधिकरण " याचा अर्थ, कलम ६८ढ अन्वये घटित केलेले सरकार जमा केलेल्या संपत्तीसाठी असलेले अपिलीय न्यायाधिकरण, असा आहे ;

(ख) या प्रकरणान्वये जिची संपत्ती सरकारजमा होण्यास पात्र असेल अशा व्यक्तीच्या संबंधातील " सहयोगी " याचा अर्थ,—

(एक) अशा व्यक्तीच्या निवासी वास्तूत (यात उपगृहांचा समावेश आहे) जी राहत होती किंवा राहत आहे, अशी कोणतीही व्यक्ती ;

(दोन) अशा व्यक्तीचे व्यवहार किंवा लेखे जी पाहता किंवा ठेवत आहे किंवा पाहत किंवा ठेवत होती अशी कोणतीही व्यक्ती ;

(तीन) अशी व्यक्ती, ज्याची सदस्य, भागीदार किंवा संचालक होती किंवा आहे, असा कंपनी अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) च्या अर्थांतर्गत, व्यक्तींचा कोणताही अधिसंघ, व्यक्तींचा निकाय, भागीदारी पेढी किंवा खाजगी कंपनी ;

(चार) उपखंड (तीन) मध्ये निर्देशिलेला व्यक्तींचा अधिसंघ, व्यक्तींचा निकाय, भागीदारी पेढी किंवा खाजगी कंपनी यांचा, अशी व्यक्ती ज्यावेळी सदस्य, भागीदार किंवा संचालक होती किंवा असेल अशा कोणत्याही वेळी, त्या व्यक्ती निकायाचा, भागीदारी पेढीचा किंवा खाजगी कंपनीचा सदस्य, भागीदार किंवा संचालक होती किंवा असलेली कोणतीही व्यक्ती ;

(पाच) उपखंड (तीन) मध्ये निर्देशिलेल्या व्यक्तींचा कोणताही अधिसंघ, व्यक्तींचा निकाय, भागीदारी पेढी किंवा खाजगी कंपनी यांचे व्यवहार किंवा लेखे पाहत किंवा ठेवत होती किंवा पाहत किंवा ठेवत आहे अशी कोणतीही व्यक्ती ;

(सहा) जेथे,—

(१) एखादा न्यास अशा व्यक्तीकडून निर्माण करण्यात आला असेल ;

किंवा

(२) अशा व्यक्तींकडून न्यासामध्ये अंशदान केलेल्या मत्तेचे (तिने यापूर्वी अंशदान केलेली कोणतीही मत्ता असल्यास, त्या मत्तेचे मूल्य धरून) मूल्य हे, अंशदान ज्या दिनांकास करण्यात आले त्या दिनांकास असलेल्या न्यासाच्या मत्तेच्या मूल्याच्या वीस टक्क्यांपेक्षा कमी नसेल,

—अशा बाबतीत त्या न्यासाचा विश्वस्त ;

(सात) जेव्हा लेखी नमूद करण्यात येतील अशा कारणांमुळे सक्षम प्राधिकरणाला असे वाटत असेल की, अशा व्यक्तींची कोणतीही मत्ता तिच्यावतीने अन्य कोणत्याही व्यक्तीकडून धारण करण्यात आली आहे, त्या बाबतीत ती अन्य व्यक्ती,

—असा आहे ;

(ग) " सक्षम प्राधिकारी " याचा अर्थ, केंद्र सरकारकडून कलम ६८घ अन्वये प्राधिकृत करण्यात आलेला त्याचा अधिकारी, असा आहे ;

(घ) " लपवणूक " याचा अर्थ, संपत्तीचे स्वरूप, साधन, विनियोग, ने-आण किंवा मालकी लपवून ठेवणे किंवा त्याबाबत बतावणी करणे, असा आहे आणि त्यामध्ये, अशा संपत्तीची इलेक्ट्रॉनिक पारेषणाद्वारे किंवा अन्य कोणत्याही साधनाद्वारे ने-आण करण्याचा किंवा तिच्या रूपांतरणाचा समावेश होतो ;

(ङ) " गोठवणे " याचा अर्थ, कलम ६८च अन्वये काढण्यात आलेल्या आदेशाद्वारे संपत्तीचे हस्तांतरण, रूपांतरण, विनियोग किंवा ने-आण यांस तात्पुरता प्रतिषेध करणे, असा आहे ;

(च) " ओळख पटवणे " यामध्ये, संपत्ती निषिद्ध क्रयविक्रयातून प्राप्त करण्यात आल्याचे किंवा त्यामध्ये वापरण्यात आली असल्याचे पुराव्यानिशी सिद्ध करण्याचा समावेश होतो ;

(छ) " बेकायदेशीररीत्या संपादित केलेली संपत्ती " याचा, जिला हे प्रकरण लागू होते अशा कोणत्याही व्यक्तीच्या संदर्भातील अर्थ,—

(एक) अशा व्यक्तीकडून—मग ती या प्रकरणाच्या प्रारंभापूर्वी असो वा नंतर—[१] [ या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींच्या उल्लंघनातून ] प्राप्त करण्यात वा मिळविण्यात आलेली वा त्याच्याशी संबंधित अशी प्राप्ती, कमाई वा मत्ता यातून किंवा याद्वारे पूर्णत: वा अंशत: संपादित करण्यात आलेली कोणतीही संपत्ती, असा आहे ; किंवा

(दोन) अशा व्यक्तीकडून—मग ती या प्रकरणाच्या प्रारंभापूर्वी असो वा नंतर—प्रतिफलार्थ वा उपखंड (एक) मध्ये निर्देशिलेल्या कोणत्याही संपत्तीशी किंवा अशा संपत्तीपासूनची प्राप्ती किंवा कमाई यांच्याशी पूर्णत: वा अंशत: संबंधित अशा अन्य कोणत्याही साधनाद्वारे संपादित करण्यात आलेली कोणतीही संपत्ती, असा आहे ;

आणि त्यामध्ये पुढील बाबींचा समावेश होतो.

(क) अशा व्यक्तीकडून—धारण करण्यात आलेली जी कोणतीही संपत्ती, अशी व्यक्ती किंवा त्या संपत्तीच्या पूर्वीच्या कोणत्याही धारकानंतर कोणत्याही वेळी जिने संपत्ती धारण केली होती अशी कोणतीही अन्य व्यक्ती, किंवा, असे पूर्वीचे धारक दोन किंवा अधिक असतील अशा बाबतीत, अशा पूर्वीच्या धारकांपैकी शेवटचा धारक हा, पर्याप्त प्रतिफलासाठी सद्‌भावपूर्वक हस्तांतरिती आहे किंवा होता, असे नसल्यास, अशा पूर्वीच्या धारकाने ती धारण करण्याचे बंद केले नसते तर, या खंडान्वये जी त्यापूर्वीच्या धारकाच्या संबंधात बेकायदेशीररीत्या संपादित केलेली संपत्ती ठरली असती, अशी कोणतीही संपत्ती ;

(ख) अशा व्यक्तीने—मग तो या प्रकरणाच्या प्रारंभी असो वा नंतर—प्रतिफलार्थ किंवा अन्य कोणत्याही साधनाद्वारे, बाब (क) खाली येणाऱ्या कोणत्याही संपत्तीशी पूर्णत: वा अंशत: संबंधित अशी संपादित केलेली संपत्ती किंवा अशा संपत्तीपासूनचे उत्पन्न व कमाई ;

(ज) ' मालमत्ता ' याचा अर्थ, मूर्त व अमूर्त, स्थावर वा जंगम आणि दृश्य वा अदृश्य असलेल्या सर्व वर्णनाच्या मालमत्ता किंवा मत्ता, आणि निषिद्ध व्यापारामध्ये वापर करण्यात आलेल्या किंवा त्यामधून निर्माण केलेल्या मालमत्तेवर किंवा मत्तांवर मालकीहक्क असल्याचा, किंवा त्यामध्ये हितसंबंध असल्याचा साक्षीपुरावा देणारे विलेख किंवा संलेख, असा आहे.

(झ) " नातलग " याचा अर्थ,—

(१) व्यक्तीचा विवाहसाथी ;

(२) व्यक्तीचा भाऊ किंवा बहीण ;

(३) व्यक्तीच्या विवाहसाथीचा भाऊ किंवा बहीण ;

(४) व्यक्तीचा कोणताही वंशपरंपरागत पूर्वज वा वंशज ;

(५) व्यक्तीच्या विवाहसाथीचा कोणताही वंशपरंपरागत पूर्वज वा वंशज ;

(६) उपखंड (२), उपखंड (३), उपखंड (४) किंवा उपखंड (५) मध्ये उल्लेखिलेल्या व्यक्तीचा विवाहसाथी ;

(७) उपखंड (२) किंवा उपखंड (३) मध्ये उल्लेखिलेल्या व्यक्तीचा वंशपरंपरागत वंशज, असा आहे ;

(ञ) " शोध घेणे " याचा अर्थ, संपत्तीचे स्वरूप, साधन, विनियोग, ने-आण, हक्क किंवा मालकी निर्धारित करणे, असा आहे ;

(ट) " न्यास " यामध्ये अन्य कोणत्याही कायदेशीर आबंधनाचा समावेश होतो.

**बेकायदेशीररीत्या संपादित केलेली संपत्ती धारण करण्यास प्रतिबंध.**

**६८ग.** (१) या प्रकरणाच्या प्रारंभापासून असल्याप्रमाणे, हे प्रकरण लागू होत असेल अशा कोणत्याही व्यक्तीने, स्वत: किंवा तिच्यावतीने अन्य कोणत्याही व्यक्तीमार्फत बेकायदेशीररीत्या संपादित केलेली कोणतीही संपत्ती धारण करणे वैध असणार नाही.

[१] २००१ चा अधिनियम ९, कलम ३२ अन्वये दाखल करण्यात आले.

(२) जेव्हा कोणतीही व्यक्ती पोटकलम (१) चे व्यतिक्रमण करून बेकायदेशीररीत्या संपादित केलेली कोणतीही संपत्ती धारण करील अशा बाबतीत अशी संपत्ती या प्रकरणाच्या तरतुदींनुसार केंद्र सरकारकडे सरकारजमा होण्यास पात्र असेल :

[१][ परंतु, हा अधिनियम जिला लागू होतो अशा व्यक्तीकडून जर कोणतीही संपत्ती, या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या अपराधाबद्दल तिला अटक करण्यात आल्याच्या किंवा तिच्या अटकेचे अधिपत्र अथवा अटकेसाठी प्राधिकारपत्र काढल्याच्या किंवा, यथास्थिति, स्थानबद्धता आदेश काढल्याच्या दिनांकाच्या सहा वर्षे आधीच्या कालावधीत संपादित करण्यात आली असेल तर, अशी संपत्ती या प्रकरणान्वये सरकारजमा केली जाणार नाही. ]

**सक्षम प्राधिकारी.**

**६८घ.** (१) केंद्र सरकार, **राजपत्रात** प्रकाशित करण्यात आलेल्या आदेशाद्वारे, कोणताही सीमाशुल्क समाहारक किंवा उत्पादनशुल्क समाहारक किंवा आयकर आयुक्त किंवा केंद्र सरकारचा तुल्य दर्जाचा अन्य कोणताही अधिकारी यास, या प्रकरणाखालील सक्षम प्राधिकाऱ्याची कार्ये पार पाडण्यास प्राधिकृत करू शकेल.

(२) केंद्र सरकार आदेशाद्वारे निदेशित करील अशा व्यक्ती किंवा व्यक्तिवर्ग यांच्या संबंधात सक्षम प्राधिकारी आपली कार्ये पार पाडतील.

**बेकायदेशीररीत्या संपादित केलेली संपत्ती ओळखणे.**

**६८ङ.** (१) [२][ कलम ५३ अन्वये शक्ती प्रदान करण्यात आलेला प्रत्येक अधिकारी आणि पोलीस ठाण्याचा प्रत्येक प्रभारी अधिकारी यांची, जिला हे प्रकरण लागू होते अशी व्यक्ती, बेकायदेशीरपणे संपादित करण्यात आलेली संपत्ती धारण करीत असल्याबद्दल खात्री पटली तर, अशा संपत्तीचा शोध घेण्यासाठी आणि ती ओळखण्यासाठी, आवश्यक ती उपाययोजना करण्याची कार्यवाही करील व तसे करण्याची कारणे लेखी नमूद करील. ]

(२) पोटकलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या उपाययोजनांमध्ये, कोणतीही व्यक्ती, ठिकाण, संपत्ती, मत्ता, दस्तऐवज, कोणतीही बँक किंवा सरकारी वित्तीय संस्था यातील कोणतीही लेखापुस्तके किंवा अन्य कोणत्याही संबद्ध बाबी यांची चौकशी, अन्वेषण किंवा सर्वेक्षण यांचा समावेश करता येईल.

(३) पोटकलम (२) मध्ये उल्लेखिलेली कोणतीही चौकशी, अन्वेषण किंवा सर्वेक्षण हे, सक्षम प्राधिकारी यासंबंधात करील किंवा काढील अशा निदेशांनुसार किंवा मार्गदर्शक तत्त्वानुसार पोटकलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या अधिकाऱ्याकडून पार पाडण्यात येईल.

**बेकायदेशीरपणे संपादित करण्यात आलेली संपत्ती सक्तीने ताब्यात घेणे किंवा तिची गोठवणूक करणे.**

**६८च.** (१) कलम ६८ङ अन्वये चौकशी किंवा अन्वेषण करणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याला असे मानण्यास कारण असेल की, ज्या संबंधात अशी चौकशी किंवा अन्वेषण करण्यात येत आहे अशी कोणतीही संपत्ती ही बेकायदेशीरपणे संपादित केलेली संपत्ती आहे, आणि या प्रकरणान्वये, अशा संपत्तीच्या सरकारजमा करण्याच्या संबंधीची कोणतीही कार्यवाही ज्यामुळे विफल होईल अशा कोणत्याही रीतीने, अशा संपत्तीची लपवणूक होण्याची, ती हस्तांतरित होण्याची किंवा ती हाताळली जाण्याची शक्यता आहे, अशा बाबतीत त्याला, अशी संपत्ती ताब्यात घेण्याचा आदेश देता येईल आणि जेव्हा अशी संपत्ती ताब्यात घेणे व्यवहार्य नसेल अशावेळी, त्याला असा आदेश देता येईल की, असा आदेश देणाऱ्या अधिकाऱ्याच्या किंवा सक्षम प्राधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीखेरीज अशी संपत्ती हस्तांतरित करता येणार नाही किंवा, अन्यथा तिची हाताळणी केली जाणार नाही आणि अशा आदेशाची प्रत संबंधित व्यक्तींवर बजावण्यात येईल :

परंतु, या पोटकलमाखाली देण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाची सक्षम प्राधिकाऱ्याला यथोचितरीत्या माहिती देण्यात येईल आणि अशा आदेशाची प्रत, तो देण्यात आल्यापासून अठ्ठेचाळीस तासांच्या आत सक्षम प्राधिकाऱ्याकडे पाठवण्यात येईल.

---

[१] २००१ चा अधिनियम क्रमांक ९, कलम ३३ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३४ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.

(२) पोटकलम (१) अन्वये देण्यात आलेला कोणताही आदेश तो, देण्यात आल्यापासून तीस दिवसांच्या कालावधीत सक्षम अधिकाऱ्याच्या आदेशाद्वारे पक्का करण्यात आल्याखेरीज, परिणामक होणार नाही.'

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनासाठी, " संपत्तीचे हस्तांतरण " याचा अर्थ, संपत्तीचा कोणताही विनियोग, अभिहस्तांतरण, अभिहस्तांकन, व्यवस्था, सुपूर्दगी, प्रदान किंवा इतर अन्य संक्रमण, असा आहे आणि पूर्ववर्ती गोष्टींच्या सर्वसाधारणतेस मर्यादा न घालता त्यामध्ये,—

(क) संपत्तीचा न्यास उभारणे ;

(ख) संपत्तीच्या संबंधात कोणताही पट्टा, गहाण, प्रभार, सुविधाधिकार, लायसन, अधिकार, भागीदारी, किंवा हितसंबंध मंजूर करणे किंवा निर्माण करणे ;

(ग) संपत्तीचा मालक नव्हे अशा कोणत्याही व्यक्तीकडे निहित असलेल्या संपत्तीच्या नेमणुकीच्या अधिकाराचा अधिकार, आदात्याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीच्या नावे संपत्तीचा विनियोग करण्याचे निश्चित करतेवेळी वापर करणे ; आणि

(घ) कोणत्याही व्यक्तीने, आपल्या स्वतःच्या संपत्तीचे मूल्य प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे कमी करण्याच्या व अन्य कोणत्याही व्यक्तीच्या संपत्तीचे मूल्य वाढविण्याच्या उद्देशाने केलेला कोणताही संव्यवहार,

या गोष्टींचा समावेश होतो.

**या प्रकरणान्वये सक्तीने ताब्यात घेतलेल्या किंवा सरकारजमा केलेल्या संपत्तीचे व्यवस्थापन.**

**६८छ.** (१) केंद्र सरकार, **राजपत्रात** प्रकाशित केलेल्या आदेशाद्वारे, प्रशासकाची कार्ये पार पाडण्यासाठी, त्याला योग्य वाटतील तितक्या (शासनाच्या सहसचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या) आपल्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करू शकेल.

(२) पोटकलम (१) अन्वये नियुक्त करण्यात आलेला प्रशासक, जिच्यासंबंधात कलम ६८च याचे पोटकलम (१) किंवा कलम ६८झ अन्वये आदेश देण्यात आला असेल ती संपत्ती, विहित करण्यात येईल अशा रीतीने आणि अशा शर्तींच्या अधीनतेने ताब्यात घेईल आणि तिची व्यवस्था लावील.

(३) प्रशासक, केंद्र सरकारकडे सरकारजमा करण्यात आलेली संपत्ती निकालात काढण्यासाठीही, केंद्र सरकार निदेशित करील अशा उपाययोजना करील.

**संपत्ती सरकारजमा करण्याची नोटीस.**

**६८ज.** (१) जिला हे प्रकरण लागू होते अशा कोणत्याही व्यक्तीकडून स्वतः किंवा तिच्या वतीने, अन्य कोणत्याही व्यक्तीमार्फत धारण करण्यात आलेल्या संपत्तीचे मूल्य, त्या व्यक्तीची प्राप्ती, कमाई किंवा मत्ता यांची ज्ञात साधने आणि कलम ६८च अन्वये किंवा अन्यथा, अन्वेषण करणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या अहवालामुळे सक्षम प्राधिकरणाला उपलब्ध झालेली अन्य कोणतीही माहिती किंवा सामग्री लक्षात घेता, सक्षम प्राधिकरणास जर असे समजण्यास (अशा समजाची कारणे लेखी नमूद करण्यात येतील) कारण असेल की, अशी सर्व किंवा त्यांपैकी कोणतीही संपत्ती बेकायदेशीररीत्या संपादित करण्यात आलेली संपत्ती आहे तर अशा बाबतीत, ते अशा व्यक्तीवर (यात यापुढे बाधित व्यक्ती म्हणून उल्लेखिलेली) नोटीस बजावू शकेल व त्या नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या तीस दिवसांच्या कालावधीत, तिने अशी संपत्ती ज्यामधून किंवा ज्याद्वारे संपादित केली असेल त्या तिच्या प्राप्तीची, कमाईची किंवा मत्तेची साधने, ज्याचा ती आधार घेते तो पुरावा आणि इतर संबद्ध माहिती व तपशील दर्शविण्यास आणि अशा संपत्तीपैकी सर्व, किंवा, यथास्थिति, कोणतीही संपत्ती, अवैधरीत्या संपादित केलेली संपत्ती असल्याचे का घोषित केले जाऊ नये आणि या प्रकरणान्वये ती केंद्र सरकारकडे सरकारजमा का केली जाऊ नये, याबद्दलची कारणे दाखविण्यास फर्मावणारी नोटीस बजावू शकेल.

(२) जेव्हा एखाद्या व्यक्तीला पोटकलम (१) खाली दिलेल्या नोटिशीमध्ये, कोणतीही संपत्ती अशा व्यक्तीच्या वतीने अन्य कोणत्याही व्यक्तीकडून धारण करण्यात आल्याचे विनिर्दिष्ट करण्यात आले असेल अशा बाबतीत, त्या नोटिशीची प्रत, अशा अन्य व्यक्तीवरही बजावण्यात येईल :

[१] [ परंतु, संपत्ती सरकारजमा करण्याची अशी नोटीस, कलम ६८क, पोटकलम (२), खंड (ग्ग्) मध्ये उल्लेखिलेल्या कोणत्याही व्यक्तीवर किंवा त्या खंडात उल्लेखिलेल्या तिच्या कोणत्याही नातलगावर किंवा त्या खंडात उल्लेखिलेल्या तिच्या सहयोगी व्यक्तीवर किंवा पूर्वी कोणत्याही वेळी ती संपत्ती जिने धारण केली होती अशा त्या खंडात उल्लेखिलेल्या कोणत्याही धारकावर बजावण्यात येणार नाही. ]

विवक्षित प्रकरणांमध्ये संपत्ती सरकारजमा करणे.

**६८झ.** (१) सक्षम प्राधिकरण, कलम ६८ज अन्वये काढण्यात आलेल्या कारणे दाखवा नोटिशीला देण्यात आलेले स्पष्टीकरण, कोणतेही असल्यास, आणि त्याच्याकडे उपलब्ध असलेली सामग्री लक्षात घेतल्यानंतर आणि बाधित व्यक्तीला (आणि बाधित व्यक्ती, नोटिशीत विनिर्दिष्ट केलेली संपत्ती अन्य कोणत्याही व्यक्तीमार्फत धारण करीत असेल अशा बाबतीत, अशा अन्य कोणत्याही व्यक्तीलादेखील) तिचे म्हणणे ऐकून घेण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, आदेशाद्वारे, प्रस्तुत सर्व किंवा त्यापैकी कोणतीही संपत्ती ही अवैधरीत्या संपादित केलेली संपत्ती आहे किंवा कसे, याबद्दलचा निष्कर्ष नमूद करू शकेल :

परंतु, जर बाधित व्यक्ती (आणि बाधित व्यक्ती, नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात आलेली कोणतीही संपत्ती अन्य कोणत्याही व्यक्तीमार्फत धारण करीत असेल अशा बाबतीत, अशी अन्य व्यक्तीदेखील) कारणे दाखवा नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या तीस दिवसांच्या कालावधीत सक्षम प्राधिकरणापुढे हजर झाली नाही किंवा त्याच्यापुढे आपली बाजू तिने मांडली नाही तर, सक्षम प्राधिकरण त्याच्यासमोर उपलब्ध असलेल्या पुराव्याच्या आधारे, या पोटकलमान्वये एकपक्षी निष्कर्ष नमूद करू शकेल.

(२) कारणे दाखवा नोटिशीमध्ये उल्लेख केलेल्यांपैकी काही संपत्ती ही अवैधरीत्या संपादित केलेली संपत्ती असल्याची सक्षम प्राधिकरणाची खात्री असेल, परंतु, नेमकी अशी संपत्ती ओळखणे त्याला शक्य नसेल अशा बाबतीत, सक्षम प्राधिकरणाने त्याच्या निर्णयशक्तीनुसार, संपादित केलेल्या संपत्तीपैकी अवैधरीत्या संपादित केलेली संपत्ती विनिर्दिष्ट करणे आणि त्यानुसार पोट-कलम (१) अन्वये निष्कर्ष नमूद करणे कायदेशीर ठरेल.

(३) कोणतीही संपत्ती ही अवैधरीत्या संपादित केलेली संपत्ती आहे, अशा आशयाचा निष्कर्ष सक्षम प्राधिकरण या कलमान्वये नमूद करील अशा बाबतीत, ते असे घोषित करील की, अशी संपत्ती या प्रकरणाच्या तरतुदींच्या अधीनतेने, केंद्र सरकारकडे सर्व भारापासून मुक्त अशा स्वरूपात सरकारजमा झालेली आहे :

[२] [ परंतु, कलम ६८ क, पोटकलम (२), खंड (ग्ग्) मध्ये उल्लेखिलेल्या कोणत्याही व्यक्तीची किंवा त्या खंडात उल्लेखिलेल्या तिच्या कोणत्याही नातलगाची किंवा तिच्या सहयोगी व्यक्तीची किंवा पूर्वी कोणत्याही वेळी जिने ती संपत्ती धारण केली होती अशा त्या खंडात उल्लेखिलेल्या व्यक्तीची अवैधरीत्या संपादित केलेली कोणतीही संपत्ती सरकारजमा केली जाणार नाही. ]

(४) जेव्हा कंपनीचे कोणतेही शेअर्स या कलमान्वये केंद्र सरकारकडे सरकारजमा होतील तेव्हा, कंपनी अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) मध्ये किंवा कंपनीच्या अधिसंघ नियमावलीमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कंपनी, केंद्र सरकारची. अशा शेअर्सचा हस्तांतरिती म्हणून तात्काळ नोंदणी करील.

शाबितीचा भार.

**६८ञ.** या प्रकरणाखालील कोणत्याही कार्यवाहीमध्ये, कलम ६८ज अन्वये बजावण्यात आलेल्या नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात आलेली कोणतीही संपत्ती अवैधरीत्या संपादित केलेली नाही, हे सिद्ध करण्याचा भार बाधित व्यक्तीवर असेल.

सरकारजमा करण्याऐवजी द्रव्यदंड.

**६८ट.** (१) कोणतीही संपत्ती कलम ६८झ अन्वये केंद्र सरकारकडे सरकारजमा असल्याची घोषणा सक्षम प्राधिकरण करील अशा बाबतीत, आणि अवैधरीत्या संपादित करण्यात आलेल्या संपत्तीच्या फक्त एखाद्या भागाचे साधन, सक्षम प्राधिकरणाची खात्री होईल अशा रीतीने सिद्ध झालेले नसेल अशा बाबतीत प्राधिकरण, बाधित व्यक्तीला, सरकारजमा करण्याऐवजी अशा भागाच्या बाजारमूल्याइतका द्रव्यदंड भरण्याचा विकल्प देण्याचा आदेश देईल.

---

[१] २००१ चा अधिनियम क्रमांक ९, कलम ३५ द्वारे हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३६ द्वारे हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

(२) पोटकलम (१) अन्वये द्रव्यदंड बसविण्याचा आदेश देण्यापूर्वी, बाधित व्यक्तीला तिचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात येईल.

(३) बाधित व्यक्तीने, पोटकलम (१) अन्वये देय असलेला द्रव्यदंड, त्यासंबंधात मंजूर केलेल्या मुदतीत भरला तर अशा बाबतीत, सक्षम प्राधिकरणाला, आदेशाद्वारे, कलम ६८ झ खालील सरकारजमा झाल्याची घोषणा प्रत्याहृत करता येईल आणि त्यानंतर अशी संपत्ती मुक्त असेल.

**विवक्षित न्यास संपत्तीच्या संबंधातील कार्यपद्धती.**

**६८ठ.** कलम ६८ख च्या खंड (ख) च्या उप खंड (सहा) मध्ये निर्देशिलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या बाबतीत, सक्षम प्राधिकरणाला, त्याच्याकडे उपलब्ध असलेली माहिती व सामग्री यांच्या आधारे जर असे समजण्यास (अशा समजाची कारणे लेखी नमूद करण्यात येतील) कारण असेल की, न्यासामध्ये धारण केलेली कोणतीही संपत्ती ही अवैधरीत्या संपादित केलेली संपत्ती आहे, तर ते, न्यासकर्त्यावर किंवा, यथास्थिति, अशी संपत्ती, न्यास किंवा विश्वस्त यांनी ज्या मत्तेमधून किंवा ज्या मत्तेद्वारे संपादित केली असेल तिच्या अंशदात्यांवर नोटीस बजावून, नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या तीस दिवसांच्या कालावधीत, अशी संपत्ती, ज्यामधून किंवा ज्याद्वारे संपादित करण्यात आली त्या पैशाचे किंवा इतर मत्तेचे साधन, किंवा, यथास्थिति, अशी संपत्ती संपादित करण्यासाठी न्यासाकडे अंशदान केलेला पैसा किंवा इतर मत्ता यांचे साधन, विशद करण्याची मागणी करील आणि त्यानंतर अशी नोटीस ही, कलम ६८ ज अन्वये बजावण्यात आलेली नोटीस असल्याचे समजण्यात येईल आणि त्यानुसार या प्रकरणाच्या अन्य सर्व तरतुदी लागू होतील.

**स्पष्टीकरण.---** या कलमाच्या प्रयोजनार्थ, " अवैधरीत्या संपादित केलेली संपत्ती " यामध्ये, न्यासाने धारण केलेल्या कोणत्याही संपत्तीच्या संबंधात,---

(एक) जी संपत्ती , न्यासकर्त्याकडून किंवा अशा संपत्तीचे न्यासामध्ये अंशदान करणाऱ्या व्यक्तीकडून धारण करणे चालू राहिले असते तर, अशा न्यासकर्त्याच्या किंवा अंशदात्याच्या संबंधात ती अवैधरीत्या संपादित केलेली संपत्ती ठरली असती, अशी कोणतीही संपत्ती ;

(दोन) कोणत्याही व्यक्तीकडून करण्यात आलेल्या अंशदानातून न्यासाने संपादित केलेली जी संपत्ती, अशा व्यक्तीने जर ती संपत्ती अशा अंशदानातून संपादित केली असती तर, अवैधरीत्या संपादित केलेली संपत्ती ठरली असती, अशी कोणतीही संपत्ती, यांचा समावेश होतो.

**विवक्षित हस्तांतरणे रद्दबातल करणे.**

**६८ड.** कलम ६८ च च्या पोटकलम (१) अन्वये आदेश दिल्यानंतर किंवा कलम ६८ज किंवा कलम ६८ठ अन्वये नोटीस काढल्यानंतर जेव्हा, उक्त आदेशात किंवा नोटिशीत उल्लेखिलेली एखादी संपत्ती, कोणत्याही पद्धतीने असो, हस्तांतरित करण्यात येईल तेव्हा असे हस्तांतरण, या प्रकरणाखालील कार्यवाहीच्या प्रयोजनार्थ, दुर्लक्षित केले जाईल आणि अशी संपत्ती त्यानंतर केंद्र सरकारकडे कलम ६८झ अन्वये सरकारजमा झाल्यास, अशा संपत्तीचे हस्तांतरण रद्दबातल ठरल्याचे मानण्यात येईल.

**अपिलीय न्यायाधिकरणाची घटना.**

**६८ढ.** (१) केंद्र सरकार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, " सरकारजमा संपत्तीसाठी अपिलीय न्यायाधिकरण " नावाचे अपिलीय न्यायाधिकरण घटित करू शकेल. त्यात अध्यक्ष आणि केंद्र सरकारला योग्य वाटतील इतके, (शासनाच्या सहसचिवापेक्षा कमी दर्जाचे नसतील असे केंद्र सरकारचे अधिकारी असलेले) व त्या शासनाकडून, कलम ६८च, कलम ६८झ, कलम ६८ट चे पोट-कलम (१) किंवा कलम ६८ठ अन्वये देण्यात आलेल्या आदेशांविरुद्धच्या अपिलांची सुनावणी करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेले इतर सदस्य, यांचा समावेश असेल.

(२) अपिलीय न्यायाधिकरणाचा अध्यक्ष हा, सर्वोच्च न्यायालयाचा किंवा उच्च न्यायालयाचा न्यायाधीश आहे अशी, किंवा होती अशी, किंवा होण्यास अर्ह असेल अशी, व्यक्ती असेल.

(३) अध्यक्ष व इतर सदस्य यांच्या सेवेच्या अटी व शर्ती विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

**अपिले.**

**६८ण.** (१) [१][ कलम ६८ ङ, पोटकलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याला किंवा ] कलम ६८ च, कलम ६८ झ, कलम ६८ ट चे पोटकलम (१) किंवा कलम ६८ ठ अन्वये देण्यात आलेल्या सक्षम प्राधिकरणाच्या आदेशान्वये व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीला, असा आदेश तिच्यावर बजावण्यात आल्याच्या तारखेपासून पंचेचाळीस दिवसांच्या आत, अपिलीय न्यायाधिकरणाकडे अपील दाखल करता येईल :

[१] २००१ चा अधिनियम क्रमांक ९, कलम ३७ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

परंतु, अपीलकर्त्याला अपील वेळेवर दाखल करण्यास पुरेशा कारणास्तव प्रतिबंध झाला होता अशी अपिलीय न्यायाधिकरणाची खात्री झाली तर, त्याला उक्त पंचेचाळीस दिवसांच्या कालावधीनंतरही, मात्र, पूर्वोक्त दिनांकापासून साठ दिवसांच्या आत अपील दाखल करून घेता येईल.

(२) पोटकलम (१) अन्वये अपील स्वीकारल्यानंतर, अपिलीय न्यायाधिकरण, अपीलकर्त्याला, त्याची तशी इच्छा असेल तर, त्याचे म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर आणि न्यायाधिकरणाला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, ज्याविरुद्ध अपील करण्यात आले आहे तो आदेश कायम करू शकेल, त्यात बदल करू शकेल किंवा तो रद्द करू शकेल.

(३) अपिलीय न्यायाधिकरणाच्या शक्ती व कार्ये, तीन सदस्यांनी बनलेल्या आणि अपिलीय न्यायाधिकरणाच्या अध्यक्षाकडून घटित झालेल्या न्यायपीठांकडून वापरण्यात व पार पाडण्यात येतील.

(४) पोटकलम (३) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या कलमाखालील अपिले शीघ्रतेने निकालात काढण्यासाठी तसे करणे अध्यक्षाला आवश्यक वाटेल अशा बाबतीत, तो दोन सदस्यांचे न्यायपीठ घटित करू शकेल आणि अशा प्रकारे घटित करण्यात आलेल्या न्यायपीठाला अपिलीय न्यायाधिकरणाच्या शक्ती व कार्ये वापरता व पार पाडता येतील :

परंतु, अशा प्रकारे घटित झालेल्या न्यायपीठाच्या सदस्यांमध्ये कोणत्याही मुद्यावर वा मुद्यांवर मतभेद झाल्यास, ज्या मुद्यावर वा मुद्यांवर त्यांचा मतभेद आहे ते मुद्दे सदस्य नमूद करतील आणि असा मुद्दा किंवा मुद्दे सुनावणीसाठी (अध्यक्षाकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा) तिसऱ्या सदस्याकडे निर्देशित करण्यात येतील आणि त्या सदस्याच्या अभिप्रायानुसार असा मुद्दा किंवा असे मुद्दे यांवर निर्णय घेण्यात येईल.

(५) अपिलीय न्यायाधिकरण आपली कार्यपद्धती विनियमित करू शकेल.

(६) अपिलीय न्यायाधिकरणाकडे अर्ज आल्यानंतर आणि विहित फी भरण्यात आल्यानंतर, न्यायाधिकरण, कोणत्याही अपिलातील पक्षकाराला किंवा अशा पक्षकाराकडून त्याच्यावतीने प्राधिकृत करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीला, कार्यालयीन वेळांमध्ये कोणत्याही वेळी, न्यायाधिकरणाचे कोणतेही संबद्ध अभिलेख व नोंदवह्या तपासण्यास आणि त्याच्या कोणत्याही भागांची प्रमाणित प्रत घेण्यास परवानगी देऊ शकेल.

**वर्णनातील चुकांमुळे नोटीस किंवा आदेश विधिबाह्य न ठरणे.**

**६८त.** या कलमान्वये काढण्यात आलेली किंवा बजावण्यात आलेली कोणतीही नोटीस, केलेली कोणतीही घोषणा, आणि काढलेला कोणताही आदेश हा, त्यामध्ये नमूद केलेल्या संपत्तीच्या किंवा व्यक्तीच्या वर्णनातून जर ती संपत्ती किंवा व्यक्ती यांची ओळख पटत असेल तर, त्या नमूद केलेल्या वर्णनात कोणतीही चूक झाल्याच्या कारणावरून विधिबाह्य असल्याचे समजले जाणार नाही.

**अधिकारितेस रोध.**

**६८थ.** या प्रकरणान्वये काढण्यात आलेला कोणताही आदेश किंवा करण्यात आलेली कोणतीही घोषणा त्यामध्ये तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, अपिलपात्र असणार नाही, आणि या प्रकरणाद्वारे वा अन्वये जी निर्धारित करण्याची अपिलीय न्यायाधिकरण किंवा कोणतेही सक्षम प्राधिकरण यांना अधिकार प्रदान करण्यात आला असेल, अशा कोणत्याही बाबीसंबंधात कोणत्याही दिवाणी न्यायालयाला अधिकारिता असणार नाही, आणि या प्रकरणाद्वारे वा अन्वये प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही अधिकारास अनुलक्षून करण्यात आलेल्या किंवा करावयाच्या कोणत्याही कारवाईबाबत कोणत्याही न्यायालयाकडून वा अन्य प्राधिकरणाकडून कोणताही आदेश दिला जाणार नाही.

**सक्षम प्राधिकरण आणि अपिलीय न्यायाधिकरण यांना दिवाणी न्यायालयाच्या शक्ती असणे.**

**६८द.** सक्षम प्राधिकरण आणि अपिलीय न्यायाधिकरण यांना दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) पुढील दाव्याची न्यायचौकशी करतेवेळी खालील बाबतीत दिवाणी न्यायालयाच्या सर्व शक्ती असतील :—

(क) कोणत्याही व्यक्तीला समन्स पाठवणे आणि तिला उपस्थित राहण्यास भाग पाडणे आणि तिची शपथेवर तपासणी करणे ;

(ख) दस्तऐवजांचा शोध घेऊन ते सादर करण्यास फर्मावणे ;

(ग) पुरावा शपथपत्रांवर स्वीकारणे ;

(घ) कोणताही सरकारी अभिलेख किंवा त्यातील प्रत यांची कोणतेही न्यायालय किंवा कार्यालय यांच्याकडे मागणी करणे ;

(ङ्) साक्षीदार किंवा दस्तऐवज यांच्या तपासणीसाठी आयोगपत्रे काढणे ;

(च्) विहित करण्यात येईल अशी अन्य कोणतीही बाब.

**६८ध.** (१) अन्य कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी सक्षम प्राधिकरणाच्या मते, या प्रकरणाच्या प्रयोजनांसाठी उपयोगी ठरतील किंवा प्रयोजनांशी संबद्ध असतील अशा व्यक्तींच्या, मुद्यांच्या किंवा बाबींच्या संबंधातील माहिती, केंद्र सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या कोणत्याही अधिकाऱ्याकडून वा प्राधिकाऱ्याकडून मागवण्याचा सक्षम प्राधिकरणाला अधिकार असेल. **सक्षम प्राधिकरणाला माहिती.**

(२) कलम ६८ न मध्ये निर्देशिलेला प्रत्येक अधिकारी, त्याच्याकडे उपलब्ध असलेली कोणतीही माहिती त्या अधिकाऱ्याच्या मते या प्रकरणाच्या प्रयोजनासाठी सक्षम प्राधिकरणाला उपयोगी असेल तर, अशी माहिती सक्षम प्राधिकरणाकडे आपण होऊन सादर करील.

**६८न.** या प्रकरणाखालील कोणत्याही कार्यवाहीच्या प्रयोजनार्थ, खालील अधिकाऱ्यांना, याद्वारे कलम ६८छ अन्वये नियुक्त करण्यात आलेला प्रशासक, सक्षम प्राधिकरण आणि अपिलीय न्यायाधिकरण यांना सहाय्य करण्याची शक्ती प्रदान करण्यात आली आहे आणि सहाय्य करण्यास फर्माविण्यात आले आहे :— **विवक्षित अधिकाऱ्यांनी प्रशासक, सक्षम प्राधिकरण आणि अपिलीय न्यायाधिकरण यांना सहाय्य करणे.**

(क्) अंमली औषधिद्रव्ये नियंत्रण केंद्र अधिकारी ;

(ख्) सीमाशुल्क विभाग अधिकारी ;

(ग्) केंद्रीय उत्पादन शुल्क विभाग अधिकारी ;

(घ्) आयकर विभाग अधिकारी ;

(ङ्) परकीय चलन विनियमन अधिनियम, १९७३ (१९७३ चा ४६) अन्वये नियुक्त करण्यात आलेले बजावणी अधिकारी ;

(च्) पोलीस अधिकारी ;

(छ्) अंमली औषधिद्रव्ये विभाग अधिकारी ;

(ज्) केंद्रीय अर्थशास्त्रीय गुप्तवार्ता केंद्र अधिकारी ;

(झ्) महसूल गुप्तवार्ता संचालनालय अधिकारी ;

(ञ्) केंद्र सरकारकडून यासंबंधात **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येतील असे केंद्र सरकारचे किंवा राज्य शासनाचे इतर अधिकारी.

**६८प.** (१) या प्रकरणान्वये कोणतीही संपत्ती केंद्र सरकारकडे सरकारजमा केल्याचे घोषित केले असेल अशा बाबतीत, किंवा बाधित व्यक्तीने, कलम ६८ ट च्या पोटकलम (१) अन्वये देय असलेला द्रव्यदंड, त्या कलमाच्या पोटकलम (३) अन्वये तो भरण्यासाठी देण्यात आलेल्या मुदतीत, भरला नसेल अशा बाबतीत, सक्षम प्राधिकरण, बाधित व्यक्तीला तसेच, त्या संपत्तीचा कब्जा असलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीला, तिचा कब्जा, कलम ६८छ अन्वये नियुक्त करण्यात आलेल्या प्रशासकाकडे किंवा त्याच्याकडून यासंबंधात यथोचितरीत्या प्राधिकृत करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीकडे, आदेशाची बजावणी झाल्यापासून, तीस दिवसांच्या आत अभ्यर्पित किंवा सुपूर्द करण्याचा आदेश देऊ शकेल. **कब्जा घेण्याची शक्ती.**

(२) पोटकलम (१) अन्वये देण्यात आलेल्या आदेशाचे अनुपालन करण्यास कोणत्याही व्यक्तीने नकार दिला किंवा कसूर केली तर, प्रशासक संपत्तीचा कब्जा घेऊ शकेल आणि त्या प्रयोजनासाठी आवश्यक अशा बलाचा वापर करू शकेल.

(३) पोटकलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, प्रशासक, पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या कोणत्याही संपत्तीचा कब्जा घेण्याच्या प्रयोजनार्थ, त्याच्या मदतीसाठी कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यांच्या सेवेची मागणी करू शकेल आणि अशा मागणीचे अनुपालन करणे हे अशा पोलीस अधिकाऱ्याचे कर्तव्य असेल.

**६८फ.** अभिलेखावरून दिसून येणाऱ्या कोणत्याही चुकांचे परिशोधन करण्याच्या दृष्टीने, सक्षम प्राधिकरण, किंवा, यथास्थिति, अपिलीय न्यायाधिकरण, त्याने दिलेला कोणताही आदेश, त्या आदेशाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीत विशोधित करू शकेल : **चुकांचे परिशोधन.**

परंतु, अशा कोणत्याही विशोधनामुळे कोणतीही व्यक्ती बाधित होण्याचा संभव असेल तर, अशा व्यक्तीला तिचे म्हणणे ऐकून घेण्याची वाजवी संधी देण्यात आल्याशिवाय, तसे विशोधन केले जाणार नाही.

अन्य कायद्याखालील निष्कर्ष या प्रकरणाखालील कार्यवाहीसाठी निर्णायक असणार नाहीत.

**६८ब.** कोणत्याही अधिकाऱ्याचा किंवा प्राधिकरणाचा अन्य कोणत्याही कायद्याखालील कोणताही निष्कर्ष या प्रकरणाखालील कार्यवाहीच्या प्रयोजनांसाठी निर्णायक असणार नाही.

नोटीसा व आदेश यांची बजावणी.

**६८भ.** या प्रकरणाखाली काढण्यात आलेली कोणतीही नोटीस किंवा देण्यात आलेला कोणताही आदेश पुढील रीतीने बजावण्यात येईल :—

(क्) जिच्यासाठी तो उद्देशित आहे त्या व्यक्तीला किंवा तिच्या अभिकर्त्याला नोटीस किंवा आदेश प्रत्यक्ष देऊन अथवा नोंदणीकृत डाकेने पाठवून ;

(ख्) खंड (क्) मध्ये तरतूद केलेल्या रीतीने नोटीस किंवा आदेश यांची बजावणी करता येत नसेल तर, ज्या संपत्तीशी संबंधित ती नोटीस किंवा तो आदेश काढण्यात किंवा देण्यात आला असेल, त्या मालमत्तेतील ठळक जागी तो लावून अथवा ज्या व्यक्तीसाठी तो उद्देशित असेल, ती व्यक्ती त्यापूर्वी जेथे राहत असल्याचे ज्ञात असेल, अशा परिवास्तूच्या दर्शनी भागावर किंवा जेथे ती व्यवसाय चालवत असेल किंवा नफ्यासाठी व्यक्तिशः काम करीत असेल अशा ठिकाणी लावून.

या प्रकरणान्वये ज्या संपत्तीच्या संबंधात कार्यवाही करण्यात आली असेल ती संपादित करण्याबद्दल शिक्षा.

**६८म.** या प्रकरणान्वये ज्या कोणत्याही संपत्तीसंबंधात कार्यवाही प्रलंबित असेल अशी कोणतीही संपत्ती जिने जाणीवपूर्वक संपादित केली आहे, मग ती कोणत्याही पद्धतीने मिळवण्यात आलेली असो, अशी कोणतीही व्यक्ती पाच वर्षांपर्यंत असू शकेल, अशा मुदतीच्या कारावासाच्या आणि पन्नास हजार रुपयांपर्यंत असू शकेल अशा द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल.

विवक्षित प्रकरणांमध्ये संपत्ती मुक्त करणे.

[1][ **६८य.** (१) जेव्हा एखाद्या स्थानबद्ध व्यक्तीचा स्थानबद्धता आदेश रद्द करण्यात येईल किंवा मागे घेण्यात येईल तेव्हा, या प्रकरणान्वये ताब्यात घेतलेली किंवा गोठवलेली संपत्ती मुक्त करण्यात येईल.

(२) जेव्हा कलम ६८क, पोटकलम (२) च्या खंड (क्) किंवा खंड (ख्) किंवा खंड (ग्ग्) मध्ये निर्देशिलेल्या कोणत्याही व्यक्तीस, या अधिनियमान्वये किंवा इतर कोणत्याही देशाच्या कोणत्याही तत्संबंधित कायद्यान्वये दोषमुक्त किंवा आरोपमुक्त करण्यात आले असेल आणि अशा दोषमुक्तीविरुद्ध कोणतेही अपील दाखल केले नसेल किंवा जेव्हा अपील करण्यात आले असेल तेव्हा, ते फेटाळण्यात आले असेल व परिणामी अशी संपत्ती जप्त केलेली नसेल किंवा अशा व्यक्तीच्या अटकेचे अधिपत्र अथवा अटकेसाठी काढलेले प्राधिकारपत्र मागे घेतलेले असेल तेव्हा, या प्रकरणाखाली ताब्यात घेतलेली किंवा गोठवलेली संपत्ती मुक्त होईल. ]

## प्रकरण सहा

## **संकीर्ण**

सद्भावनापूर्वक केलेल्या कृतीस संरक्षण.

**६९.** या अधिनियमाखालील कोणत्याही शक्ती वापर करणारे किंवा कोणतीही कार्ये पार पाडणारे किंवा कोणत्याही कर्तव्याचे पालन करणारे केंद्र सरकार किंवा राज्य शासन, किंवा केंद्र सरकारचा वा राज्य शासनाचा कोणताही अधिकारी किंवा अन्य कोणतीही व्यक्ती यांच्याविरुद्ध या अधिनियमान्वये वा त्या अन्वये करण्यात आलेला कोणताही नियम वा आदेश याअन्वये सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही कृतीबद्दल, कोणताही दावा, खटला किंवा अन्य वैध कार्यवाही केली जाणार नाही.

---

१. २००१ चा अधिनियम क्रमांक ९, कलम ३८ अन्वये समाविष्ट करण्यात आले.

**नियम तयार करताना केंद्र सरकार व राज्य शासन यांनी आंतरराष्ट्रीय अभिसंधी लक्षात घेणे.**

**७०.** केंद्र सरकारला वा राज्य शासनाला या अधिनियमान्वये नियम करण्याचा अधिकार प्रदान करण्यात आला असेल अशा बाबतीत, केंद्र सरकारला किंवा, यथास्थिति, राज्य शासनाला, या अधिनियमाच्या अन्य तरतुदीच्या अधिनतेने नियम करतेवेळी, भारत ज्यामध्ये एक पक्ष आहे असा, अंमली औषधिद्रव्यावरील एकेरी अभिसंधी, १९६१, उक्त अभिसंधी विशोधित करणारा अभिसंधीचा प्रोटोकॉल, १९७२ आणि मन:प्रभावी पदार्थ अभिसंधी, १९७१ यांच्या तरतुदी आणि भारत ज्यामध्ये एक पक्ष बनू शकेल असा, अंमली औषधिद्रव्ये व मन:प्रभावी पदार्थ यांच्या संबंधातील कोणतीही आंतरराष्ट्रीय अभिसंधी यांची कोणतीही तरतूद लक्षात घेऊन नियम करता येतील.

**व्यसनी व्यक्ती शोधून काढणे, त्यांच्यावर उपचार करणे, इ. साठी आणि अंमली औषधिद्रव्ये व मन:प्रभावी पदार्थ यांचा पुरवठा करण्यासाठी केंद्रे स्थापन करण्याची शासनाची शक्ती.**

**७१.** (१) शासन, स्वेच्छानिर्णयानुसार, व्यसनी व्यक्ती शोधून काढणे, त्यांच्यावर उपचार करणे, त्यांना शिक्षण देणे, त्यांची नंतरची जपणूक, त्यांचे पुनर्वसन, त्यांचे पुन: सामाजिक एकात्मीकरण करणे यांसाठी आणि शासनाकडे नोंदणी करण्यात आलेल्या व्यसनी व्यक्तींना आणि असा पुरवठा ही, वैद्यकीय गरज असेल अशा व्यक्तींना, संबंधित शासनाकडून विहित करण्यात आल्या असतील अशा शर्तींच्या अधिनतेने आणि अशा रीतीने, कोणतीही अंमली औषधिद्रव्ये व मन:प्रभावी पदार्थ यांचा पुरवठा करण्यासाठी त्याला योग्य वाटतील तेवढी केंद्रे स्थापन करू शकेल.

(२) शासन, पोटकलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या केंद्राची स्थापना, त्यांची नेमणूक, त्यांचे परिरक्षण, व्यवस्थापन व अधीक्षण यांसाठी आणि त्यातून अंमली औषधिद्रव्ये व मन:प्रभावी पदार्थ यांचा पुरवठा करण्यासाठी, तसेच अशा केंद्रामध्ये नोकरीस ठेवलेल्या व्यक्तींची नियुक्ती, त्याचे प्रशिक्षण, त्यांचे अधिकार व कर्तव्ये यासाठी तरतूद करणारे, या अधिनियमाशी सुसंगत असे नियम करू शकेल.

**शासनाला देय असलेल्या रकमांची वसुली.**

**७२.** (१) या अधिनियमाच्या किंवा या अन्वये करण्यात आलेल्या कोणत्याही नियमाच्या वा आदेशाच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदीन्वये केंद्र सरकारला वा राज्य शासनाला प्रदेय असलेल्या कोणत्याही लायसन फीच्या संबंधात किंवा कोणत्याही प्रकारच्या अन्य रकमे संबंधात, अशा रकमेच्या प्रदानाची मागणी करण्याचा अधिकार प्रदान करण्यात आलेल्या, केंद्र सरकारचा किंवा, यथास्थिति, राज्य शासनाच्या अधिकाऱ्याला, अशी रक्कम ज्या व्यक्तीकडून वसुलीयोग्य किंवा देय असेल, अशा व्यक्तीला देणे असलेल्या कोणत्याही पैशांतून त्या रकमेएवढी रक्कम वजा करता येईल किंवा अशा व्यक्तीच्या मालकीच्या कोणत्याही मालावर टाच आणून व त्याची विक्री करून अशी रक्कम वसूल करता येईल आणि ती रक्कम अशा तऱ्हेने वसूल झाली नाही तर, ती त्या व्यक्तीकडून किंवा तिच्या जामीनदाराकडून (कोणताही असल्यास), ती जणू काही जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करण्यात येईल.

(२) जेव्हा कोणतीही व्यक्ती, या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या कोणत्याही नियमांचे अनुपालन करून, कोणतेही कृत्य पार पाडण्यासाठी किंवा कोणत्याही कृत्यापासून अप्रवृत्त राहण्यासाठी (कलम ३४ व कलम ३९ खालील बंधपत्राव्यतिरिक्तचे) बंधपत्र देईल अशा बाबतीत, अशा रीतीने ते कृत्य पार पाडणे किंवा त्यापासून अप्रवृत्त राहणे म्हणजे, भारतीय संविदा अधिनियम, १८७२ (१८७२ चा ९) याच्या कलम ७४ च्या अर्थांतर्गत सार्वजनिक कर्तव्य असल्याचे समजण्यात येईल ; आणि अशा बंधपत्राच्या शर्तीचा तिच्याकडून भंग झाल्यास, अशा भंगाच्या बाबतीत त्या बंधपत्रात नमूद केल्यानुसार देय असलेली अशी संपूर्ण रक्कम, तिच्याकडून किंवा तिच्या जामीनदाराकडून (कोणताही असल्यास) ती जणू काही जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करण्यात येईल.

**अधिकारितेस रोध.**

**७३.** कोणतेही दिवाणी न्यायालय, या अधिनियमान्वये किंवा त्याखाली करण्यात आलेल्या कोणत्याही नियमान्वये, खालीलपैकी कोणत्याही बाबी संबंधात देण्यात आलेला कोणताही निर्णय वा आदेश याविरुद्ध कोणताही दावा किंवा कार्यवाही विचारार्थ स्वीकारणार नाही, त्या अशा—

(क) अफूच्या झाडाच्या लागवडीचे कोणतेही लायसन अडवून ठेवणे, नाकारणे किंवा रद्द करणे ;

(ख) वजन, तपासणी, अफूची प्रत आणि सांद्रता यांनुसार वर्गीकरण आणि अशा तपासणीनुसार ठरविण्यात आलेल्या प्रमाण किमतीत कपात करणे किंवा ती वाढविणे ;

(ग) कोणत्याही विजातीय पदार्थांबरोबर भेसळ केल्याचे आढळून आलेली अफू जप्त करणे.

संक्रमणकालीन तरतूद. **७४.** ज्यासाठी या अधिनियमात तरतूद करण्यात आली आहे अशा कोणत्याही बाबींसंबंधात, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी, कोणत्याही शक्तींचा वापर करणारा किंवा कोणतीही कर्तव्ये पार पाडणारा शासनाचा प्रत्येक अधिकारी वा इतर कर्मचारी, अशा प्रारंभानंतर, या अधिनियमाच्या संबद्ध तरतुदीन्वये, तो अशा प्रारंभाच्या लगतपूर्वी जे पद आणि पदनाम धारण करत होता, त्याच पदावर त्याच पदनामाने नियुक्त केला असल्याचे समजण्यात येईल.

निदेश देण्याची केंद्र सरकारची शक्ती. [1][ **७४क.** केंद्र सरकार, या अधिनियमाच्या तरतुदीची अंमलबजावणी करण्यासंबंधात, त्याला योग्य वाटतील असे निदेश, राज्य शासनाला देऊ शकेल आणि राज्य शासन अशा निदेशांचे अनुपालन करील. ]

प्रत्यायोजित करण्याचा शक्ती. **७५.** (१) केंद्र सरकारला, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्ती व मर्यादा यांच्या अधिनतेने, या अधिनियमाखालील त्याची शक्ती (नियम करण्याची शक्ती खेरीज करुन) व कार्ये यांपैकी त्याला आवश्यक व उचित वाटतील असे अधिकार व कार्ये, मंडळ किंवा अन्य कोणतेही प्राधिकरण वा अंमली पदार्थ आयुक्त यांच्याकडे प्रत्यायोजित करता येतील.

(२) राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्ती व मर्यादा यांच्या अधीनतेने, या अधिनियमाखालील त्याची शक्ती, (नियम करण्याचा अधिकार खेरीज करुन) व कार्ये यांपैकी त्याला आवश्यक व उचित वाटतील अशी शक्ती व कार्ये त्या शासनाचा कोणताही प्राधिकारी वा अधिकारी यांच्याकडे प्रत्यायोजित करू शकेल.

केंद्र सरकारची नियम करण्याची शक्ती. **७६.** (१) या अधिनियमाच्या इतर तरतुदींच्या अधीनतेने, केंद्र सरकार **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करू शकेल.

(२) पूर्वगामी शक्तीच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, अशा नियमांद्वारे खालील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही बाबींसाठी तरतुदी करता येतील, त्या अशा :—

(क) कलम २ च्या खंड (पाच), (सहा), (चौदा) व (पंधरा) यांच्या प्रयोजनासाठी द्रवरूप सिद्ध पदार्थांच्या बाबतीत टक्केवारी मोजण्याची पद्धत ;

(ख) शांतता राखण्यासाठी कलम ३४ अन्वये बंधपत्र निष्पादित करावयाचा नमुना ;

(ग) कलम ३९ च्या पोटकलम (१) अन्वये दोष सिद्ध झालेल्या व्यसनी व्यक्तीला वैद्यकीय उपचारार्थ मुक्त करण्यासाठी निष्पादित करावयाचे बंधपत्र आणि त्या कलमाच्या पोटकलम (२) अन्वये योग्य समज देण्यात आल्यानंतर तिच्या मुक्ततेपूर्वी अशा दोष सिद्ध झालेल्या व्यक्तीकडून निष्पादित करावयाचे बंधपत्र, यांचा नमुना ;

[2][ (गक) कलम ५० क अन्वये "नियंत्रित सुपूर्दगी" करण्याची रीत ; ]

(घ) भारताबाहेरील कोणत्याही ठिकाणाहून प्राप्त झालेला दस्तऐवज, कलम ६६ च्या पोटकलम (२) अन्वये ज्याच्याकडून अधिप्रमाणित करून घेण्यात येईल तो प्राधिकारी किंवा व्यक्ती व अधिप्रमाणनाची रीत ;

[3][ (घक) कलम ६८छ, पोटकलम (२) अन्वये प्रशासकाकडून ज्या रीतीने आणि ज्या शर्तींच्या अधीनतेने संपत्तीचे व्यवस्थापन करण्यात येईल ती रीत व त्या शर्ती ;

(घख) कलम ६८ढ, पोटकलम (३) खालील अपिलीय न्यायाधिकरणाचा अध्यक्ष व इतर सदस्य यांच्या सेवेच्या अटी व शर्ती ;

(घग) अपिलीय प्राधिकरणाचे अभिलेख व नोंदवह्या यांच्या तपासणीसाठी किंवा त्यांच्या कोणत्याही भागाची प्रमाणित प्रत मिळविण्यासाठी कलम ६८ण याच्या पोटकलम (६) अन्वये द्यावयाची फी ;

(घघ) सक्षम प्राधिकरण आणि अपिलीय न्यायाधिकरण यांच्याकडून कलम ६८द याच्या खंड (च) अन्वये वापरता येऊ शकतील अशा दिवाणी न्यायालयाच्या शक्ती ;

---

[1] १९८९ चा अधिनियम २, कलम २० द्वारे समाविष्ट करण्यात आले.

[2] २००१ चा अधिनियम ९, कलम ३९ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

[3] १९८९ चा अधिनियम २, कलम २१ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

(घ्ङ्) या अधिनियमान्वये जप्त करण्यात आलेल्या सर्व जिनसा व वस्तू यांची विल्हेवाट ;

(घ्च्) नमुने घेणे आणि अशा नमुन्यांची चाचणी व विश्लेषण ;

(घ्छ्) अधिकारी, खबरे व इतर व्यक्ती यांना द्यावयाची बक्षिसी ; ]

(ङ्) केंद्र सरकारकडे नोंदणी करण्यात आलेल्या व्यसनी व्यक्तींना आणि इतरांना, कलम ७१ च्या पोट-कलम (१) अन्वये वैद्यकीय गरजेपोटी अंमली औषधिद्रव्ये व मनःप्रभावी पदार्थ पुरविण्याच्या शर्ती व रीत ;

(च्) कलम ७१ च्या पोटकलम (१) अन्वये केंद्र सरकारकडून स्थापन करण्यात आलेल्या केंद्राची आस्थापना, नियुक्ती, परिरक्षण, व्यवस्थापन व अधीक्षण आणि अशा केंद्रांमध्ये नोकरीस ठेवलेल्या व्यक्तींची नियुक्ती, प्रशिक्षण, त्यांचे अधिकार व कर्तव्ये ;

(छ्) अंमली औषधिद्रव्ये व मनःप्रभावी पदार्थ सल्लागार समितीचा अध्यक्ष व सदस्य यांच्या पदाचा कालावधी, नैमित्तिक रिक्त पदे भरण्याची रीत आणि त्यांना प्रदेय भत्ते आणि ज्यांच्या अधीनतेने कलम ६ च्या पोटकलम (५) खालील उपसमितीत सदस्येतर व्यक्तींची नियुक्ती करावयाची असेल त्या शर्ती व बंधने ;

(ज्) विहित करावयाची किंवा करता येईल अशी अन्य कोणतीही बाब.

**नियम व अधिसूचना संसदेपुढे मांडणे.**

**७७.** [१][ या अधिनियमान्वये, केंद्र शासनाकडून करण्यात आलेला प्रत्येक नियम आणि कलम २ चे खंड (सात क), खंड (अकरा), खंड (तेवीस क्), कलम ३, कलम ७ क, कलम ९ क आणि कलम २७ चा खंड (क) अन्वये काढण्यात आलेली प्रत्येक अधिसूचना किंवा आदेश ] तो करण्यात किंवा ती काढण्यात आल्यानंतर, होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवला जाईल आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर त्या नियमात किंवा अधिसूचनेत [१][ किंवा आदेशात ] कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहाचे मतैक्य झाले अथवा तो नियम किंवा अधिसूचना [१][ किंवा आदेश ] करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहाचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम किंवा ती अधिसूचना [१][ किंवा आदेश ] अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा यथास्थिति, मुळीच परिणामक होणार नाही ; तथापि, अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली किंवा त्या अधिसूचनेखाली [१][ किंवा आदेशाखाली ] करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.

**नियम करण्याची राज्य शासनाची शक्ती.**

**७८.** (१) या अधिनियमाच्या तरतुदीच्या अधीनतेने, राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करू शकेल.

(२) पूर्वगामी शक्तीच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, अशा नियमांद्वारे खालील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही बाबींसाठी तरतुदी करता येतील, त्या अशा :—

(क्) राज्य शासनाकडे नोंदणी करण्यात आलेल्या आणि इतर व्यसनी व्यक्तींना कलम ७१ च्या पोट-कलम (१) अन्वये वैद्यकीय गरज म्हणून अंमली औषधिद्रव्ये व मनःप्रभावी पदार्थ पुरवण्याच्या शर्ती व रीत ;

(ख्) कलम ७१ च्या पोटकलम (१) अन्वये स्थापन करण्यात आलेल्या केंद्राची आस्थापना, नेमणूक, परिरक्षण, व्यवस्थापन, अधीक्षण आणि अशा केंद्रामध्ये नोकरीस ठेवलेल्या व्यक्तींची नियुक्ती, प्रशिक्षण, त्यांची शक्ती व कर्तव्ये ;

(ग्) विहित करावयाची वा करता येईल अशी अन्य कोणतीही बाब.

(३) या अधिनियमान्वये राज्य शासनाकडून करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, त्या राज्याच्या विधानमंडळासमोर मांडण्यात येईल.

---

[१] २००१ चा अधिनियम क्रमांक ९, कलम ४० अन्वये मूळ मजकुराऐवजी दाखल केले.

**सीमाशुल्क अधिनियम, १९६२ याच्या तरतुदी लागू होणे.**

७९. अंमली औषधिद्रव्ये व मन:प्रभावी पदार्थ यांची भारतातील आयात, भारतातून निर्यात आणि त्यांचे वाहनांतरण या अधिनियमाद्वारे वा अन्वये लादण्यात आलेले सर्व प्रतिषेध आणि निर्बंध हे सीमाशुल्क अधिनियम, १९६२ (१९६२ चा ५२) द्वारे वा अन्वये लादण्यात आलेले प्रतिषेध व निर्बंध असल्याचे समजण्यात येईल आणि त्या अधिनियमाच्या तरतुदी त्यानुसार लागू होतील :

परंतु, एखादी गोष्ट करणे हा त्या अधिनियमान्वये आणि या अधिनियमान्वये शिक्षापात्र असा अपराध असेल त्याबाबतील या अधिनियमातील किंवा या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे अपराध्याला या अधिनियमान्वये शिक्षा होण्यास प्रतिबंध होणार नाही.

**औषधिद्रव्ये व सौंदर्य प्रसाधने अधिनियम, १९४० याच्या तरतुदी लागू होण्यास रोध नसणे.**

८०. या अधिनियमाच्या तरतुदी किंवा त्या अन्वये केलेले नियम हे, औषधिद्रव्ये व सौंदर्य प्रसाधने अधिनियम, १९४० (१९४० चा २३) किंवा त्याखाली करण्यात आलेले नियम यांना जोड म्हणून असतील, त्यांना न्यूनकारी म्हणून नव्हे.

**राज्य व विशेष विधीची व्यावृत्ती.**

८१. या अधिनियमातील किंवा त्याअन्वये करण्यात आलेल्या नियमातील कोणत्याही गोष्टीमुळे, कॅनाबिस रोपट्याच्या लागवडीसाठी किंवा त्याच्या वापरासाठी अथवा कोणतेही अंमली औषधिद्रव्ये वा मन:प्रभावी पदार्थ यांच्या भारतांतर्गत क्रयविक्रयासाठी या अधिनियमाद्वारे लादण्यात आले नसतील असे कोणतेही निर्बंध किंवा तरतूद करण्यात आलेली नसेल अशी शिक्षा लादणारा किंवा तरतूद करणारा अथवा या अधिनियमाद्वारे वा अन्वये लादण्यात आलेले तत्सम निर्बंध किंवा तरतूद करण्यात आलेली तत्सम शिक्षा यापेक्षा अधिक तीव्रतेने निर्बंध किंवा शिक्षा लादणारा त्या काळापुरता अंमलात असणारा कोणताही प्रांतिक अधिनियम किंवा कोणत्याही राज्य विधानमंडळाचा कोणताही अधिनियम वा त्या अन्वये करण्यात आलेला कोणताही नियम, यांच्या विधिग्राह्यतेवर परिणाम होणार नाही.

**निरसन व व्यावृत्ती.**

८२. (१) अफू अधिनियम, १८५७ (१८५७ चा १३), अफू अधिनियम, १८७८ (१८७८ चा १) आणि घातक औषधिद्रव्ये अधिनियम, १९३० (१९३० चा २) हे याद्वारे निरसित करण्यात येत आहेत.

(२) असे निरसन झाले तरीही, पोटकलम (१) द्वारे निरसित करण्यात आलेल्या कोणत्याही अधिनियमितीअन्वये केलेली किंवा करण्याचे अभिप्रेत असलेली कोणतीही गोष्ट अथवा करण्यात आलेली किंवा करण्याचे अभिप्रेत असलेली कोणतीही कृती या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसेल तेथवर ती, या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींन्वये करण्यात आल्याचे समजण्यात येईल.

**अडचणी दूर करण्याची शक्ती.**

८३. (१) या अधिनियमाच्या तरतुदी परिणामक करताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, केंद्र सरकार **राजपत्रात** प्रकाशित करण्यात आलेल्या आदेशाद्वारे अडचण दूर करण्यासाठी आवश्यक वा उचित वाटतील अशा, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील अशा तरतुदी करू शकेल :

परंतु, या अधिनियमाला राष्ट्रपतींची अनुमती मिळाली असेल त्या दिनांकापासून तीन वर्षांचा कालावधी संपल्यानंतर असा कोणताही आदेश देता येणार नाही.

(२) या कलमान्वये देण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो देण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, संसदेच्या सभागृहासमोर मांडण्यात येईल.

## अनुसूची

[ कलम २ चा खंड (तेवीस) पहा ]

**मन:प्रभावी पदार्थांची सूची**

| अनुक्रमांक | आंतरराष्ट्रीय एकस्वाधिकारेतर नावे | अन्य एकस्वाधिकारेतर नावे | रसायनाचे नाव |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | .... | डीइटी | एन, एन—डायथीलट्रिप्टामीन |
| २ | .... | डीएमएचपी | ३-(१,२ डायमेथीलहेप्टील)-१-हायड्रॉक्सी-७, ८, ९, १०-टेट्राहायड्रो-६, ६, ९-ट्रायमेथील-६ एच-डायबेंझो (बी. डी.) पीरन. |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ३ | .... | डीएमटी .. | एन, एन-डायमेथीलट्रिप्टामीन. |
| ४ | (+) लायसर्गाइड एलएससीडी, | एलएसडी-२५ .. | (+)-एन, एन-डाएथीलसर्गामाइड (डी-लायसर्जिक अॅसिड डायएथीलॅमाईड). |
| ५ | .... | मेस्कालीन .. | ३, ४, ५ ट्रायमेथॉक्सीफेनएथिलामाईन. |
| ६ | .... | पॅराहेक्झील .. | ३-हेक्झील-१-हायड्रोक्झी-७, ८, ९, १०, टेट्राहायड्रो-६ ६, ९-ट्रायमेथील-६ एच-डायबेन्झो (बी.डी.) पीरॅन. |
| ७ | इटीसायक्लीडाइन .. | पीसीई .. | एन-एथील-१-फेनीलसायक्लो हेक्झीलामाइन |
| ८ | रोलीसायक्लीडाइन .. | पीएचपी, पीसीपीवाय | १-(१-फॅनीसायक्लोहेक्झील) पायरोलिडाइन. |
| ९ | .... | सिलोसिन, सिलॉट्रसिन | ३-(२-डायमेथिलअमीनोएथील)-४हायड्रोक्झीडोल |
| १० | सिलोसायबाइन .. | .... | ३-(२-डीमेथिलअमनोमेथील)-इनडोल-४-वायएल डायहायड्रोजन फॉस्फेट. |
| ११ | .... | एसटीपी, डीओएम | २-अमिनो-१-(२, ५, डायमेथॉक्झी-४-मेथिल) फिनाईलप्रॉपेन. |
| १२ | टेनोसायक्लीडाइन .. | टीसीपी .. | १[ (१—(२-थीनाईल) सायक्लोहेक्झील पीपरीडीन. ] |
| १३ | .... | टीएचसी, | टॅट्राहायडोकॅन्नाबीनोल्स, खालील समघटक :— ६ अ (१ ओअ) |
| १४ | .... | डीओबी .. | २, ५—डायमेथॉक्झी-४-ब्रोमोॲम्फिटामाईन. |
| १५ | .... | एमडीए .. | ३, ४-मेथिलिनडायऑक्झि ॲम्फिटामाइन. |
| १६ | ॲम्फिटामाईन .. | .... | (±) —२-अमिनो-१-फिनाईलप्रॉपेन. |
| १७ | डेक्सॲम्फिटामाईन .. | .... | (+) —२-अमिनो-१-फिनाईलप्रॉपेन. |
| १८ | मेक्लोक्वॉलॉन .. | .... | ३-(ओ-क्लोरोफिनाईल)—२-मिथाईल-४ (३ एच) क्वीनाझोलिनोन. |
| १९ | मेथमफेटामाईन .. | .... | (+)—२-मिथाईलअमिनो-१-फिनाईलप्रॉपेन. |
| *२० | मेथॅक्वॉलॉन .. | .... | २—मिथाईल—३-ओ-टॉलील-४ (३ एच)—क्वीनाझोलीनोन. |
| २१ | मिथाईलफेनीडेट .. | .... | २-फिनाईल-२ (२-पीपरीडील) अॅसेटीक अॅसीड, मिथाईल इस्टर. |
| २२ | फेन्सिक्लिडाइन .. | पीसीपी .. | १—(१—फिनाईलसायक्लोहेग्झिल) पीपरीडीन. |
| २३ | फेनमेट्राझाइन .. | .... | ३—मिथाईल-२—फिनाईलमॉर्फोलीन. |
| २४ | ॲमोबार्बिटल .. | .... | ५-एथील-५- (३-मेथिलब्युटिल) बार्बिट्युरिक अॅसिड. |
| २५ | सायक्लोबार्बिटल .. | .... | ५—(१—सायक्लोहेक्झेन-१—आयएल)—५— एथीलबार्बिट्युरिक अॅसिड. |
| २६ | ग्लूटेथीमाइड .. | .... | २—एथिल—२—फिनाईलग्लूटेरीमाइड. |

* मेथॉक्वऑलोनच्या निर्मितीवर, विक्रीवर आणि आयातीवर (तसेच ते तयार करण्यावरही) बंदी घालण्यात आलेली आहे (३१ जानेवारी १९८४ रोजी व तेव्हापासून) पहा, एमएच आणि एफडब्ल्यू. अधिसूचना क्रमांक जीएसआर-५७७ (ई) आणि ५७८ (ई) दिनांक २३ जुलै १९८३ आणि जीएसआर .४८ (ई) व ४९ (ई), दिनांक ३१ जानेवारी १९८४ वैद्यकीय आणि वैज्ञानिक प्रयोजनांसाठी असेल ती खेरीज करून त्याची आयात/निर्यात ही प्रतिषिद्ध आहे. पहा, वित्त मंत्रालय (डीओआर.) अधिसूचना जीएसआर-३९७, दिनांक २४ एप्रिल १९८२ आणि अधिसूचना जीएसआर. १७१, दिनांक २६ फेब्रुवारी १९८३.

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| २७ | पेंटाझोसाईन | .. .... | १. २, ३, ४, ५, ६—हेक्झाहायड्रा—६, ११—डायमेथिल-३-(३—मेथिल—२ ब्युटोनील) २, ६ मेथानो—३ बेनझोझोसीन—८—ओएल. |
| २८ | पेन्टोबार्बिटल | .. .... | ५—एथिल—५—(१-मेथिलब्युटल) बार्बिटयुरिक ॲसिड. |
| २९ | सिकोबार्बिटल | .. .... | ५—अलिल—५ (१-मेथिलबुटल) बार्बिट्युरिक ॲसिड |
| **३० | अल्प्राझोलम | .. .... | ८-क्लोरो-१-मेथिल—६—फिनाईल—४एच—एस ट्रायझोलो [ ४, ३-ए ] [ १-४ ] बेंझोडायझेपाइन |
| ३१ | अम्फेप्रामोन | .. .... | २—(डायएथिलामिनी) प्रॉपीओफिनोन |
| ३२ | बार्बिटल | .. .... | ५—५—डायएथिलबार्बिट्युरिक ॲसिड |
| ३३ | बेंझफोटामाइन | .. .... | अल्फा—चेन्झील—एन, ए-डायमेथिलफेनेथिलामाइन |
| ३४ | ब्रोमझेपम | .. .... | ७—ब्रोमो-१, ३-डायहायड्रो—५ (२—पायरिडिल)—२ एच-१, ४—बेन्झॉडायझेपाइन-२-एक. |
| ३५ | कॅमाझिपम | .. .... | ७-क्लोरा—१, ३—डायहायड्रा—३—डायहायड्रोक्झी-१—मेथिल-५-फिनाईल-२एच-१, ४—बेन्झोडायझेपाइन-२—एक डायमिथिल कार्बामेट (इस्टर). |
| ३६ | क्लोरडायझेपॉक्साईड | .... | ७-क्लोरो—२—(मेथिलामीनो)—५—फिनाईल-३ एच-१, ४—बेन्झोडायेपाइन--४---ऑक्साईड. |
| ३७ | क्लोबाझम | .. .... | ७ क्लोरो—१—मेथिल—५—फिनाईल-१ एच-१ ५—बेन्झोडायझेपाइन—२, ४ (३ एच, ५ एच)—डायोन. |
| ३८ | क्लोनॅझेपम | .. .... | ५—(ओ—क्लोराफिनाईल)—१, ३—डायहायड्रो-७, नायट्रो-२ एच-१, ४—बेन्झोडायझेपाइन--२—एक. |
| ३९ | क्लोराझेपेट | .. .... | ७—क्लोरो—२, ३—डिहायड्रो—२—ऑक्सो—५—फिनाईल-१ एच, ४—बेन्झोडायझेपाइन—३—कार्बोक्सिलिक ॲसिड. |
| ४० | क्लोटीआझेपम | .. .... | ५—(ओ—क्लोरोफिनाईल)—७—एथिल—१, ३—डयहायड्रे—१—मेथिल—२ एच—थिनो [ २, ३—इ ]—१, ४—डायझेपाइन—२—एक. |
| ४१ | क्लोक्झॅझोलम | .. .... | १०—क्लोरो—११बी—(ओ—क्लोरोफिनाईल)—२, ३, ७, ११बी—टेट्राहायड्रोऑक्झॅलो—[ ३, २—डी ] (१, ४) बेन्झोडायझेपाइन—६ (५ एच) एक. |
| ४२ | डेलोराझेपाम | .. .... | ७—क्लोरो—५—(ओ—क्लोरोफिनाईल)—१, ३—डिहायड्रो—२ एच—१, ४—बेन्झोडायझेपाइन—२—एक. |
| ४३ | डायझेपाम | .. .... | ७-क्लोरो—१, ३—डिहायड्रो—१—मेथिल—५—फिनाईल—२ एच—१, ४—बेन्झोडायझेपाइन—२---एक. |
| ४४ | एस्टाझोलम | .. .... | ८—क्लोरो—६—फिनाईल—४ एचएस ट्रायझोलो [ ४, ३-ए ] (१, ४) बेन्झोडायझेपाइन. |
| ४५ | एथक्लोर्व्हीनोल | .. .... | एथिल—२—क्लोरोक्विनाईल एथिनिलकार्बिनॉल |

** अनुक्रमांक ३० व ५१ (अल्प्राझोलम आणि हालाझेपाम) हे वगळण्यात आल्याचे समजण्यात यावे (९ जून १९८७ रोजी व तेव्हापासून) पहा, त्या दिनांकाचा आयआरएफ. मंत्रालय. क्रमांक ६६४/२१/८७अफू—(कृपया इंग्रजी पृष्ठे १२८, १५५ व १५६ पहावीत.)

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ४६ | एथिनामेट | .. .... | १—एथिनिलसायक्लोहेक्झानॉलकार्बामेट |
| ४७ | एथिललोप्लाझेपेट | .. .... | एथिल—७ क्लोरो—५ (ओ—फ्लुरोफिनाईल)—२. ३—डिहायड्रो—२ ऑक्झो—१ एच—१; ४—बेन्झोसियाझेपाइन-३—कार्बोक्सिलेट. |
| ४८ | फ्लूडियाझेपाम | .. .... | ७—क्लोरो—५—(ओ—फ्लूरोफिनाईल)—१, ३—डिहायड्रो—१—मेथिल—२ एच—१, ४—बेन्झोडायझेपाइन—२—एक. |
| ४९ | फ्लूनायट्रायझेपाम | .. .... | ५—(ओ—फ्लुरोफिनाईल)—१, ३—डिहायड्रो—१,—मेथिल—७—नायट्रे—२ एच—१, ४—बेन्झोडायझेपाइन—२—एक. |
| ५० | फ्लूराझेपाम | .. .... | ७-क्लोरो—१—[ २—(डायएथिलॅमिनो) एथिल ]—५—(ओ-फ्ल्यूरोफिनाईल), १, ३—डिहायड्रो—२ एच—१, ४—बेन्झोडायझेपाइन—२—एक. |
| *५१ | हालाझेपाम | .. .... | ७—क्लोरो—१, ३—डिहायड्रो—५—फिनाईल—१—(२, २, २—ट्रायफ्ल्युरोएथिल)—२एच—१—४—बेन्झोडायझेपान—२—एक. |
| ५२ | हॅलोक्झॅझोलम | .. .... | १०—ब्रोमो—११ बी—(ओ—फ्ल्युरोफिनाईल)—२, ३, ७, ११ बी टेट्राहायड्रोऑक्सॅझोलो— [ ३, २—डी ] [१, ४ ]—बेन्झोडायझेपाइन ६ (५ एच)—एक. |
| ५३ | केटॅझोलम | .. .... | ११—क्लोरो—८, १२ बी—डिहायड्रो—२, ८—डायमेथिल—१२ बी—फिनाईल—४ एच—(१, ३)—ऑक्सॅझीनो—(३, २—डी) [१, ४] बेन्झोडायझेपाइन—४, ७ (६ एच)—डायोन. |
| ५४ | लेफेटामाईन | .. | एसपीए .. | (—)—१—डायमेथिलअमिनो—१, २—डायफिनाईलइथेन. |
| ५५ | लोप्राझोलम | .. .... | ६—(ओ-क्लोरोफिनाईल)—२, ४—डिहायड्रो—२ [ ४ मेथिल—१ पीपेराझीनाईल—१—मेथिलिन ] ८—नायट्रो—१ एच-इमिडाझो [१, ४] बेन्झोडायझेपाइन—१ एक. |
| ५६ | लोराझेपाम | .. .... | ७—क्लोरो—५ (ओ-क्लोरोफिनाईल)—१, ३—डिहायड्रे—३१—मेथिल—२एच—१, ४—बेन्झोडायझेपाइन—२—एक. |
| ५७ | लॉर्मेटायझेपाम | .. .... | ७—क्लोरो—५—(ओ-क्लोरोफिनाईल)—१, ३—डिहायड्रो—३—हायड्रॉक्सी—१—मेथिल—२ एच—१, ४—बेन्झोडायझेपाइन—२—एक. |
| ५८ | मॅझिन्डॉल | | ५—(पी-क्लोरोफिनाईल) २, ५—डिहायड्रो—३ एच—इमिडाझो [ २, १—ए ] आयसोइन्डॉल—५—ओएल. |
| ५९ | मेडाझेपम | .. .... | ७-क्लोरो—२, ३ डिहायड्रो—१—मेथिल—५—फिनाईल—१, एच—१, ४—बेन्झोडायझेपाइन. |
| ६० | मेप्रोबामेट | .. .... | २—मेथिल—२—प्रॉपिल—१, ३—प्रॉपिनिडीऑल डायकार्बामेट. |
| ६१ | मेथिलफिनोबार्बिटल | .... | ५—एथिल—१—मेथिल—५ फिनाईलबार्बिटयुरिक ॲसिड. |

* अनुक्रमांक ३० व ५१ (अल्प्राझोलम आणि हालझेपाम) हे वगळण्यात झाल्याचे समजण्यात यावे (९ जून १९८७ रोजी व तेव्हापासून).पहा त्या दिनांकाचा आय.आर.एफ. मंत्रालय, क्रमांक ६६४/२१/८७अफू. (कृपया इंग्रजी पृष्ठे १२८, १५५ व १५६ पहावीत.)

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ६२ | मेथायप्रिलॉन | .. .... | ३, ३—डायएथिल—५, मिथाईल—२, ४—पायपेरिडाइन-डायोन. |
| ६३ | निमेटाझेपाम | .. .... | १, ३ डायहायड्रो १—मिथाईल ७—नायट्रो—५ फिनाईल—२ एच १, ४ बेन्झोडायझेपाइन—२—एक. |
| ६४ | नायट्राझेपाम | .. .... | १, ३—डायहायड्रो-७, नायट्रो—५—फिनाईल—२ एच—१, ४—बेन्झोडायझेपाइन—२—एक. |
| ६५ | नॉरडाझेपाम | .. .... | ७—क्लोरो—१, ३—डायहायड्रो—५—फिनाईल—१ (२ एच) —१, ४—बेन्झोडायझेपाइन—२—एक. |
| ६६ | ऑक्साझेपाम | .. .... | ७ क्लोरो—१, ३ डायहायड्रो—३—हायड्रोक्सी—५ फिनाईल —१, (२ एच)—१, ४—बेन्झोडायझेपाइन—२—एक. |
| ६७ | ऑक्साझोलम | .. .... | १०-क्लोरो—२, ३, ७, ११—बी-टेट्राहायड्रो—२—मिथाईल—११ बी-फिनाईल—ऑक्झॉझोलो [ ३, २-डी ] [ १, ४ ]—बेन्झोडायझेपीन—६ (५ एच)—एक. |
| ६८ | फोनडायमेट्रझाइन | .. .... | (+)—(२५, ३५) ३, ४—डायमिथाईल—२—फिनाईलमॉर्फोलाइन. |
| ६९ | फेनोबार्बिटाल | .. .... | ५—एथिल—५ फिनाईलबर्बिट्युरीक ॲसिड. |
| ७० | फेंटर्माइन | .. .... | अल्फा. अल्फा-५—डायमिथाइलफेनिथायलामाईन. |
| ७१ | पिनाझेपाम | .. .... | ७—क्लोरो—१, ३—डायहायड्रो—५—फिनाईल—१—(२—प्रॉपीनाईल)—२ एच—१, ४—बेन्झोडायझेपिन—२—एक. |
| ७२ | प्रिप्राडॉल | .. .... | १, १—डायफिनाईल—१—(२—पिपरिडील)—मेथानॉल. |
| ७३ | प्राझेपाम | .. .... | ७—क्लोरो—१—(सायक्लोप्रॉपिलमेथील)—१, ३—डायहायड्रो —५—फिनाईल—१—२ एच-१, ४—बेन्झोडायझेपिन —२—एक. |
| ७४ | टेमाझेपाम | .. .... | ७—क्लोरो—१—३—डायहायड्रो—३—हायड्रॉक्सी—१—मेथिल—५—फिनाईल १—(२ एच) १, ४—बेन्झोडायझेपिन—२—एक. |
| ७५ | टेट्राझेपाम | .. .... | ७—क्लोरो—५ (सायक्लोझेन—१—वायएल)-१, ३—डायहायड्रो-१—मेथिल—१—२ एच—१, ४—बेन्झोडायझेपिन—२—एक. |
| ७६ | ट्रायझोलम | .. .... | ८-क्लोरो—६ (ओ-क्लोरोफिनाईल)—१—मेथिल—४ एच-एस-ट्रायझोलो (४, ३-ए) (१, ४) बेन्झोडायझेपिन. |
| ७७ | वरीलपासून बनविलेले क्षार आणि सिद्ध पदार्थ. | | |

# THE NARCOTIC DRUGS AND PSYCHOTROPIC SUBSTANCES ACT, 1985

## अंमली औषधिद्रव्ये व मन:प्रभावी पदार्थ अधिनियम, १९८५

### इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| abetment | अपप्रेरणा | [Sec. 29 (m.n.)] |
| addict | व्यसनी | [Sec. 2] |
| addiction | आसक्ती | [Sec. 39(*1*)] |
| Additional Sessions Judge | अपर सत्र न्यायाधीश | [Sec. 36(*3*)] |
| adulterated | भेसळयुक्त | [Sec. 9 (*2*) (*d*)] |
| Appellate Tribunal | अपिलीय न्यायाधिकरण | [Sec. 68(*n*) m.n.] |
| arrest | अटक | [Sec. 42 (*1*) (*d*)] |
| authorisation | प्राधिकारपत्र | [Sec. 23] |
| bail and bonds | जामीन व बंधपत्रे | [Sec. 36 (*a*)] |
| burden of proof | शाबितीचा भार | [Sec. 68 (*j*)] |
| Cannabis (hemp) | कॅनाबिस (भांग) | [Sec. 2 (*iii*)] |
| central excise | केंद्रीय उत्पादन शुल्क | [Sec. 41 (*2*)] |
| charas | चरस | [Sec. 2 (*iii*) (*a*)] |
| coagulated juice of opium poppy | अफूच्या बोंडांचा साकळित रस | [Sec. 2 (*xv*) (*a*)] |
| coca derivaties | १. कोकासाधित पदार्थ | [Sec. 2 (*xi*)(*a*)] |
| | २. कोकाजन्य पदार्थ | [Sec. 2 (*iv*)] |
| collector of customs | सीमाशुल्क समाहारक | [Sec. 68 (m)] |
| commercial quantity | वाणिज्यिक प्रमाण | [Sec. 2 (*vii*) (*a*)] |
| commissions | आयोगपत्रे | [Sec. 68 (*R*)(*e*)] |
| concealment | लपवणूक | [Sec. 68B (*d*)] |
| concentrated preparation. | तीव्र सिद्धपदार्थ | [Sec. 2 (*iii*) (*a*)] |
| condition of licence | लायसनची शर्त | [Sec. 20] |
| confiscate | जप्त करणे | [Sec. 9 (*2*) (g)] |
| congnizable and non bailable | दखलपात्र व बिनजमिनी | [Sec. 37 (m.n.)] |
| consultative committee | सल्लागार समिती | [Sec. 6 (*1*)] |
| contravention | व्यतिक्रमण | [Sec. 15 (m.n.)] |
| contributor | अशंदाता | [Sec. 68 (*L*)] |
| controlled delivery | नियंत्रित माल सुपूर्दगी | [Sec. 2(*vii*)(*b*)] |
| court of session | सत्र न्यायालय | [Sec. 36 (*c*) ] |
| criminal conspiracy | दंडनीय कट | [Sec. 29 (m.n.)] |
| criminal jurisdiction | फौजदारी अधिकारिता | [Sec. 31 (*3*)] |
| crude and purified | कच्ची किंवा शुद्ध | [Sec. 2 (*iii*) (*a*)] |
| culpable mental state | सदोष मानसिक अवस्था | [Sec. 35 (m.n.)] |
| deaddiction | आसक्ती घालविणे | [Sec. 39 (*1*)] |
| death penalty | मृत्युदंड | [Sec. 31A (m.n.)] |
| declaration | घोषणा | [Sec. 68*P*] |
| detain | अटकावणे | [Sec. 42(*1*)(*d*)] |
| detention | स्थानबद्धता | [Sec. 36A (*1*) (*b*)] |
| detoxification | निर्विषीकरण | [Sec. 39(*1*)] |
| Director General of Narcotics Control Bureau | अंमली पदार्थ नियंत्रण केंद्राचा महासंचालक | [Sec. 50 (*a*)] |
| distress | अटकावणी | [Sec. 11 (m.n.)] |

| | | |
|---|---|---|
| embezzlement of opium | अफूचा अपहार | [Sec. 19] |
| empower | अधिकार प्रदान करणे | [Sec. 10(2)(*a*)] |
| enhanced punishment | वाढीव शिक्षा | [Sec. 31 (m.n.)] |
| extract of cocaleaf | कोका पानाचा कोणताही अर्क | [Sec. 2 (*v*)] |
| fact | वस्तुस्थिती | [Sec. 35 (Expl.)] |
| fine | द्रव्यदंड | [Sec. 30 (proviso)] |
| flavouring agent | स्वादकारक | [Sec. 13 (m.n.)] |
| flowering and fruiting tops | फुले किंवा फळे आलेले बोंड | [Sec. (2) (*iii*) (*b*)] |
| forfeiture | सरकारजमा करणे | [Long title] |
| ganja | गांजा | [Sec. 2 (*iii*)(*b*)] |
| genus | प्रजाती | [Sec. 2 (*iv*)] |
| governing body | नियामक मंडळ | [Sec. 7A(*3*)] |
| horticultural purposes | बागायती प्रयोजने | [Sec. 14] |
| illegal import | अवैधरीत्या आयात | [Sec. 23] |
| illicit traffic | निषिद्ध व्यापार | [[Long title] |
| immunity | उन्मुक्ती | [Sec. 64 (m.n.)] |
| International Conventions | आंतरराष्ट्रीय अभिसंधी | [Long title] |
| investigation | अन्वेषण | [Sec. 36A (4)] |
| judgement | न्यायनिर्णय | [Sec. 19] |
| Judicial Magistrate | न्यायिक दंडाधिकारी | [Sec. 36A (*1*)(*b*)] |
| legal obligation | क़ायदेशीर आबंधन | [Sec. 68 (*b*)(*k*)] |
| licensee | अनुज्ञप्तिधारक | [Sec. 26] |
| lineal ascendant or descendant | वंशपरंपरागत पूर्वज वा वंशज | [Sec. 68 (*i*) (*4*)] |
| Magistrate | दंडाधिकारी | [Sec. 36A (1) (*b*)] |
| maker | निर्माता | [Sec. 9(1)(*v*)] |
| manufactured drug | निर्मित औषधिद्रव्य | [Sec. 2 (*xi*)] |
| manufacturing chemists | निर्माणक रसायनशास्त्रज्ञ | [Sec. 9(*1*)(*iv*)] |
| medicinal opium | औषधी अफू | [Sec. 2 (*xvi*) (*a*)] |
| Narcotics Commissioner | अंमली औषधिद्रव्य आयुक्त | [Sec. 2 (*xiii*)] |
| natural or synthetic | नैसर्गिक किंवा संश्लिष्ट | [Sec. 2 (*xxiii*)] |
| offences triable by special court | विशेष न्यायालयांकडून संपरीक्षा करण्यायोग्य अपराध | [Sec. 36 A] |
| opium | अफू | [Sec. 2 (*xv*)] |
| opium derivative | अफूजन्य पदार्थ | [Sec. 2 (*xvi*)] |
| opium poppy | अफूचे झाड | [Sec. 2 (*xvii*] |
| physical state | भौतिक अवस्था | [Sec. 2 (*xx*)] |
| poppy straw | ख़सखशीचे गवत | [Sec. 2 (*xiv*)] |
| poppy straw concentrate | खसखशीच्या गवताचे सत्व | [Sec. 2 (*xi*)(*a*)] |
| power | शक्ती | [Sec. 4 (*3*)] |
| Permit | परवाना | [Sec. 9 (m.n.)] |
| premises | १. वास्तू | [Sec. 25] |
| | २. परिवास्तू | [Sec. 68 (*x*) (*b*)] |
| preparation | सिद्धपदार्थ | [Sec. 2 (*20*)] |

| | | |
|---|---|---|
| prepared opium | सिद्ध केलेली अफू | [Sec. 2 (16) (*b*)] |
| preponderance of probability | संभावतेची बलवत्तरता | [Sec. 35 (*2*)]. |
| probation | परिवीक्षा | [Sec. 39 (m.n.)] |
| public place | सार्वजनिक ठिकाण | [Sec. 43 (Expl.)] |
| public prosecutor | सरकारी अभियोक्ता | [Sec. 36 (*c*)] |
| record | अभिलेख | [Sec. 68(t)(*6*)] |
| rectification | परिशोधन | [Sec. 68 (*v*)] |
| register | नोंदवही | [Sec. 68(o)(*6*)] |
| relevancy of statements | निवेदनाची सुसंबद्धता | [Sec. 53(a)(m.n.)] |
| resin | राळ | [Sec. 2 (3) (*a*)] |
| revenue intelligence | महसूल गुप्तवार्ता | [Sec. 41 (*2*)] |
| rigorious imprisonment | सश्रम कारावास | [Sec. 15] |
| search | झडती | [Sec. 42 (*1*) (*d*)] |
| seizure | ताब्यात घेणे | [Sec. 42(*1*) (*c*)] |
| sentence trial | शिक्षादेश | [Sec. 32 *a*] |
| sessions judge | सत्र न्यायाधीश | [Sec. 36 (*2*) (Expl.)] |
| small quantity | अल्प प्रमाण | [Sec. 2 (*23*)(*a*)] |
| species of papaver | पॅपावर जातीची | [Sec. 2 (*17*) (*b*)] |
| speedy trial | शीघ्र संपरीक्षा | [Sec. 36 (*1*)] |
| spouse | विवाहसाथी | [Sec. 68 (*b*)(1)(*5*)] |
| sureties | प्रतिभूती | [Sec. 39 (*1* )] |
| surrender | अभ्यर्पित | [Sec. 68(*z*) (*1*)] |
| permit | परवाना देणे | [Sec. 9 (m.n.)] |
| tranship | वाहनांतरण | [Sec. 8 (*c*)] |
| transhipment | | [Sec. 23 (m.n.)] |
| vexatious entry | तापदायक प्रवेश | [Sec. 58 (m.n. )] |
| warrant | अधिपत्र | [Sec. 41 (*3*)] |
| without previous authorisation | पूर्वप्राधिकारपत्राविना | [Sec. 24] |

# अंमली औषधिद्रव्ये व मन:प्रभावी पदार्थ अधिनियम, १९८५

# THE NARCOTIC DRUGS AND PSYCHOTROPIC SUBSTANCES ACT, 1985

## मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अटक | arrest | [कलम ४२ (१) (घ)] |
| अटकावणे | detain | [कलम ४२(१)(घ)] |
| अटकावणी | distress | [कलम ११ (समासटीप)] |
| अपप्रेरणा | abetment | [कलम २९ (समासटीप)] |
| अपर सत्र न्यायाधीश | Additional Sessions Judge | [कलम ३६(३)] |
| अपिलिय न्यायाधिकरण | Appellate Tribunal | [कलम ६८(ढ) समासटीप] |
| अभ्यर्पित | surrender | [कलम ६८(य) (१)] |
| अभिलेख | records | [कलम ६८(न)(६)] |
| अधिपत्र | warrant | [कलम ४१ (३)] |
| अन्वेषण | investigation | [कलम ३६क (४)] |
| अनुज्ञप्तिधारक | licensee | [कलम २६] |
| अफू | opium | [कलम २ (पंधरा)] |
| अफूचा अपहार | embezzlement of opium | [कलम १९] |
| अफूच्या बोंडांचा साकळीत | coagulated juice of opium | [कलम २ (पंधरा) (क)] |
| अफूचे झाड | opium poppy | [कलम २ (सतरा] |
| रस | poppy | |
| अफूजन्य पदार्थ | opium derivatives | [कलम २ (सोळा)] |
| अधिकार प्रदान करणे | empower | [कलम १०(२)(क)] |
| अवैधरीत्या आयात | illegal import | [कलम २३] |
| आंतरराष्ट्रीय अभिसंधी | International Conventions | [पूर्ण शीर्षक] |
| आसक्ती | addiction | [कलम ३९ (एक)] |
| आसक्ती घालविणे | deaddiction | [कलम ३९ (१)] |
| आयोगपत्र | commissions | [कलम ६८ (द)(ड.)] |
| औषधी अफू | medicinal opium | [कलम २ (सोळा (क)] |
| अंमली औषधिद्रव्य आयुक्त | Narcotics Commissioner | [कलम २ (तेरा)] |
| अंमली पदार्थ नियंत्रण | Director General of Narcotics | [कलम ५० (क)] |
| केंद्राचा महासंचालक | Control Bureau | |
| अशंदाता | Contributor | [कलम ६८ (ठ)] |
| उन्मुक्ती | immunity | [कलम ६४ (समासटीप)] |
| कच्ची किंवा शुद्ध | Crude or purified | [कलम २ (तीन) (क)] |
| कायदेशीर आबंधने | Legal obligation | [कलम ६८ (ख)(ट)] |
| कॅनाबिस (भांग) | cannabis (hemp) | [कलम २ (तीन)] |
| केंद्रीय उत्पादन शुल्क | central excise | [कलम ४१ (२)] |
| कोकाजन्य पदार्थ | coca derivative | [कलम २ (चार)] |
| कोका पानाचा अर्क | extract of cocaleaf | [कलम २ (पाच)] |
| कोकासाधित पदार्थ | coca derivatics | [कलम २ (अकरा)(क)] |

| | | |
|---|---|---|
| खसखशीचे गवत | poppy straw | [कलम २ (चौदा)] |
| खसखशीच्या गवताचे सत्व | poppy straw concentrate | [कलम २ (अकरा)(क)] |
| गांजा | ganja | [कलम २ (तीन)(ख)] |
| घोषणा | declaration | [कलम ६८ (त)] |
| चरस | charas | [कलम २ (तीन) (क)] |
| जप्त करणे | confiscate | [कलम ९ (२) (छ)] |
| जामीन व बंधपत्र | bail and bond | [कलम ३६ (क)] |
| झडती | search | [कलम ४२ (१) (घ)] |
| तापदायक प्रवेश | vexatious entry | [कलम ५८ (समासटीप)] |
| तीव्र सिद्धपदार्थ | concentrated preparation | [कलम २ (तीन) (क)] |
| निर्माता | maker | [कलम ९(१)(पाच)] |
| दखलपात्र व बिनजामिनी | congnizable and non bailable | [कलम ३७ (समासटीप)] |
| दंडाधिकारी | Magistrate | [कलम ३६क (१) (ख)] |
| दंडनीय कट | criminal conspiracy | [कलम २९ (समासटीप)] |
| द्रव्यदंड | fine | [कलम ३० (परंतुके)] |
| निर्माणक रसायनशास्त्रज्ञ | manufacturing chemists | [कलम ९(१)(चार)] |
| नियामक मंडळ | governing body | [कलम ७क(३)] |
| नियंत्रित माल सुपूर्दगी | controlled delivery | [कलम २(सात)(ख)] |
| निवेदनाची सुसंबद्धता | relevancy of statements | [कलम ५३(क)(समासटीप)] |
| निर्मित औषधिद्रव्य | manufactured drug | [कलम २ (अकरा)] |
| निर्विषीकरण | detoxification | [कलम ३९(१)] |
| निषिद्ध व्यापार | illicit traffic | [पूर्ण शीर्ष] |
| नोंदवही | register | [कलम ६८(ण)(६)] |
| नैसर्गिक किंवा संश्लिष्ट | natural or synthetic | [कलम २ (तेवीस)] |
| न्यायनिर्णय | judgement | [कलम १९] |
| न्यायिक दंडाधिकारी | Judicial Magistrate | [कलम ३६क (१)(ख)] |
| परवाना देणे | to permit | [कलम ९ (समासटीप)] |
| परिवास्तू | premises | [कलम ६८ (भ) (ख)] |
| परिवीक्षा | probation | [कलम ३९ (समासटीप)] |
| परिशोधन | rectification | [कलम ६८ (फ)] |
| पॅपावर जातीची | species of papaver | [कलम २९ (सतरा) (ख)] |
| पूर्वप्राधिकारपत्र | previous authorisation | [कलम २४] |
| प्रजाती | genus | [कलम २ (चार)] |
| प्रतिभूती | surety | [कलम ३९ (१)] |
| प्राधिकारपत्र | authorisation | [कलम २३] |
| फुले किंवा फळे आलेले बोंड | flowering and fruiting tops | [कलम (२) (तीन) (ख)] |
| फौजदारी अधिकारिता | criminal jurisdiction | [कलम ३१ (३)] |
| बागायती प्रयोजने | horticultural purposes | [कलम १४] |
| भेसळयुक्त | adulterated | [कलम ९ (२) (घ)] |
| भौतिक अवस्था | physical state | [कलम २ (वीस)] |
| महसूल गुप्तवार्ता | revenue intelligence | [कलम ४१ (२)] |
| मृत्युदंड | Death penality | [कलम ३१क (समासटीप)] |
| राळ | resin | [कलम २ (तीन) (क)] |
| लपवणूक | concealment | [कलम ६८ (घ)] |

| | | |
|---|---|---|
| लायसनची शर्त | condition of licence | [कलम २०] |
| वस्तुस्थिती | fact | [कलम ३५ (स्पष्टीकरण)] |
| वाढीव शिक्षा | enhanced punishment | [कलम ३१ (समासटीप)] |
| वाणिज्यिक प्रमाण | commercial quantity | [कलम २ (सात) (क)] |
| वास्तू | premises | [कलम २५] |
| वाहनांतरण | 1. tranship | [कलम ८ (ग)] |
| | 2. transhipment | [कलम २३ (समासटीप)] |
| विवाहसाथी | spouse | [कलम ६८ (ख) (एक) (५)] |
| विशेष न्यायालयांकडून संपरीक्षायोग्य अपराध | offences triable by special court | [कलम ३६ क] |
| वंशपरंपरागत पूर्वज वा वंशज | lineal ascendant or descendant | [कलम ६८ (एक) (४)] |
| व्यतिक्रमण | contravention | [कलम १५ (समासटीप)] |
| व्यसनी | addict | [कलम २] |
| शक्ती | power | [कलम ४ (३)] |
| शाबितीचा भार | burden of proof | [कलम ६८ (ञ)] |
| शिक्षादेश | sentence | [कलम ३२ क] |
| शीघ्र संपरीक्षा | speedy trial | [कलम ३६ (१)] |
| सक्तीने ताब्यात घेणे | seizure | [कलम ४२(१) (ग)] |
| सत्र न्यायाधीश | sessions judge | [कलम ३६ (२) (स्पष्टीकरण)] |
| सत्र न्यायालय | court of session | [कलम ३६ ग ] |
| सदोष मानसिक अवस्था | culpable mental state | [कलम ३५ (समासटीप)] |
| सरकारजमा होणे | forfeiture | [पूर्ण शीर्षक] |
| सरकारी अभियोक्ता | public prosecutor | [कलम ३६ (ग)] |
| सल्लागार समिती | consultative committee | [कलम ६ (१)] |
| सश्रम कारावास | rigorous imprisonment | [कलम १५] |
| सार्वजनिक ठिकाण | public place | [कलम ४३ (स्पष्टीकरण)] |
| स्थानबद्धता | detention | [कलम ३६क (१) (ख)] |
| स्वादकारक | flavouring agent | [कलम १३ (समासटीप)] |
| सिद्ध केलेली अफू | prepared opium | [कलम २ (सोळा) (ख) ] |
| सिद्ध पदार्थ | preparation | [कलम २ (वीस)] |
| सीमाशुल्क समाहारक | collector of customs | [कलम ६८ (ड)] |
| संभाव्यतेची बलवत्तरता | preponderance of probability | [कलम ३५ (२)]. |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई